शनिवार । २२ डिसेंबर १९७९ । ७५ पैसे

# माणूस

## लोकशाहीचा नंदादीप विझू नये म्हणून!

खासदार रामभाऊ म्हाळगी



**पुण्यातले तीन ज्योतिषी काय म्हणतात ?**

–संध्याकाळचे पुणे

–दि. बा. मोकाशी

# आवाहन

रा. का. म्हाळगी, एम्. ए., एल्एल्. बी.

ठाणे लोकसभा मतदारसंघ, कार्यालय
जांभळी नाका, ठाणे ४०० ६०१

दि. १-१२-१९७९

सप्रेम नमस्कार, विनंती विशेष.

आपल्या क्षेत्रातील एक मान्यवर व्यक्ती म्हणून मुद्दाम आपणास हे पत्र लिहीत आहे.

१९७७ च्या मार्चमध्ये 'हुकूमशाही विरुद्ध लोकशाही' या अपूर्ण लढ्यात आपण बहुमोल मत देऊन लोकसभेत आपला प्रतिनिधी म्हणून मला काम करण्याची संधी दिलीत; हा ऋणानुबंधाचा धागा घेऊनच या व्यक्तिगत पत्राचा प्रपंच करीत आहे.

लोकसभेत अखंड पाच वर्षे काम करण्याची उमेद मी बाळगून होतो देश व प्रदेश पातळीवरील विषयांबरोबरच ठाणे लोकसभा मतदार संघातील जनजिव्हाळ्याचे प्रश्न सोडविणे व शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा हिरीरीने पाठपुरावा करणे, असाही संकेत मनात मी योजिला होता त्यातील काही बाबतीत यश आले. काही यशस्वी होण्याच्या मार्गावर असतानाच लोकसभा विसर्जित झाली ! या अडीच वर्षांच्या कामाचे एक संक्षिप्त प्रतिवृत्त लवकरच प्रसिद्ध होत आहे. तरी परंतु साठ महिन्यांचे काम केवळ अठ्ठावीस महिन्यात कसे पूर्ण होणार !

आता पुन्हा निवडणुका घोषित झाल्या आहेत. पूर्वी आखलेल्या पण अपूर्ण राहिलेल्या योजना पूर्ण करणे व मागच्या अनुभवावरून अधिक उमेदीने सफलतेचा टप्पा गाठणे, यासाठी आपले सहाय्य हवे आहे. जसे मागच्या वेळी दिलेत, तसेच. किंबहुना थोडे जास्तच ! आपण आपल्या क्षेत्रात बराच काळ जागरुकतेने समाजसेवा करीत आहात. म्हणून आपल्या शब्दाला मोल आहे. आपली मदत मला बहुमोलाची ठरणार आहे.

ठाणे तालुका व शहर, डोंबिवली, कल्याण शहर तालुका, अंबरनाथ, उल्हासनगर शहर व तालुका, मुरबाड तालुका व शहापूर तालुक्यातील ४५ गावे अशा भौगोलिक क्षेत्राचा व सुमारे ९ लाख स्त्री-पुरुष मतदार असलेला हा विशाल मतदारसंघ आहे. या सर्व मतदारांना मी व माझे सहकारी पुढील केवळ दीड महिन्याच्या काळात कसे भेटू शकणार ? त्यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे.

निवडणूक प्रचार मोहिमेसाठी निधीसह किती विविध प्रकारच्या साधनांची जरुरी असते, याची आपणास कल्पना आहे. त्याचा तपशील मी लिहीत नाही. स्थानिक जनतापार्टी कार्यालयाशी आपण कृपया संपर्क साधावा. मतदार संघातील निवडणूक प्रचार मोहीम समर्थपणे व प्रभावीपणे कशी चालवावी याबद्दल काही आपल्या कल्पना असणारच. आपल्या सूचना वरील पत्त्यावर लवकर कळविल्यास मला त्याचा फार उपयोग होईल.

गेल्या अडीच वर्षांच्या काळात माझ्या हातून झालेल्या कामातून सामाजिक कार्याबद्दलच्या माझ्या धारणा आपणास विदीत झाल्या असतील. 'उमेदवार जनता पार्टीचा पण लोकप्रतिनिधी सर्व पक्षीयांचा व आम जनतेचा' हे सूत्र मी लक्षात ठेवलेले आहे. ध्येयनिष्ठा, निस्वार्थी लोकसेवा, वचनपूर्ती, चारित्र्य, शिस्त, संयम व बंधुत्व या लोकप्रतिनिधींच्या प्राथमिक गुणांची जोपासना करण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी, स्थिर शासनासाठी, समाजाच्या सर्व स्तरातील, विशेषतः तळातील माणसाच्या उद्धारासाठी माझा प्रयत्न राहिला आहे, आणि सदैव राहील.

आपली प्रत्यक्ष भेट घेण्याची माझी इच्छा आहे. पाहू या, कसे जमते ते !

हे पत्र आपल्या मित्रांना दाखवावे. आपल्या कुटुंबियांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आपला, रा. का. म्हाळगी

## स्वातंत्र्याचे गान

"लोकशाहीचा नंदादीप विझू देता कामा नये, स्वातंत्र्याचा झेंडा पडू देता कामा नये. जगातल्या अनेक राष्ट्रांत तानाशाही आहे. पण त्यामुळे कोणतेच प्रश्न सुटलेले नाहीत. फक्त प्रश्न न सुटल्यास तक्रार करण्यासाठी तोंड उघडण्यासही बंदी झालेली आहे. दोन वर्षांपूर्वी हा सारा भारत एक महाप्रचंड जेलखाना बनला होता. तशी दुरवस्था कधीच येऊ देता कामा नये. समृद्धी आणि स्वातंत्र्य ही दोन्हीही आम्हाला हवीत. एकावाचून दुसऱ्याला काहीच अर्थ नसतो. हा भारत समृद्धही होईल आणि कोणतीही किंमत देऊन स्वातंत्र्यही टिकवील, लोकशाहीचे प्राणपणाने रक्षण करील, अशी ग्वाही पुन्हा एकदा साऱ्या विश्वाला देण्यासाठी ही निवडणूक आहे. जनतेच्या मनातील सारे सद्भाव यावेळी साकार होतील असा आमचा विश्वास आहे. हुकूमशाही आणि गद्दारी यांचा कायमचा बंदोबस्त करण्याची, त्या दोन्ही संकटांशी समर्थ मुकाबला करून आपले सार्वभौमत्व टिकविण्याची शक्ती भारतीय जनतेला आहे याचा प्रत्यय पुन्हा एकदा देऊ या. स्वातंत्र्याचे गान पुन्हा एकदा मुक्तकंठाने गाऊ या !"

—अटलबिहारी वाजपेयी

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : तिसावा
२२ डिसेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे


संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९



# शुभास्ते पंथानः सन्तु

" श्री. अरुण दाते गात होते–

**भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी**
**अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहाणी**

त्या संध्याकाळी अरुण दाते जीव ओतून गायले. काही अद्यापि मैफलीत न म्हटलेली गाणीही त्यांनी म्हटली. मी म्हटले, ' अगदी अढीमधले आंबे चाखावेत तसे हे झाले.' तबल्यावर दात्यांच्या धाकट्या बंधूचा मुलायम हात पडत होता आणि पेटीवर होते रसाळ वाणीचे व. पु. काळे. बैठकीतली सारी मंडळी अरुणचे शब्द व त्याचे सूर यानी तृप्त होऊन डोलत होती. बैठक संपली तेव्हा उपाहाराच्या वेळी मी एका मित्राच्या तरुण कन्येला विचारले– ' गाणं आवडलं ?' ब्लू जीन्स व स्वेटर घातलेली ती मुलगी म्हणाली, ' आय लाइक्ड दि म्युझिक बट कुड नॉट अंडरस्टँड दि वर्ड्स ' (मला सूर आवडले, पण शब्द समजले नाहीत. तिने सरळ पण खरे ते सांगितले होते. भातुकलीचा खेळ काय, राजा आणि राणी काय, अर्ध्यावर सपलेला डाव काय – आणि अढीतल्या आंब्याची गोडी काय– तिला सगळेच अपरिचित ! बरे कन्या कोणाची ? तर पुण्यातल्याच आमच्या एका मित्राची. "

" दुसरी एक अशीच मुलगी आणि तीसुद्धा एका महाराष्ट्रीय, अस्सल सदाशिवपेठी, पुणेरी मित्राची कन्या. भारी हौशी गृहस्थ दरोबस्त सगळे मराठी लेखक – लेखिका, गायक-गायिका त्याच्या मित्रपरिवारात सहज बसतील एवढा विस्तृत लोकसंग्रह असलेला. आपल्या मुलाना मराठी यावे, मराठी संस्कार त्याच्यावर व्हावेत, यासाठी धडपडणारा. त्यानीच मला सांगितलेली ही व्यथा : म्हणाले, ' मी मुलीला सागत होतो लोकमान्याबद्दल, महात्माजीबद्दल, तर ती बालसुलभ विस्मयतेने म्हणाली, ' व्हॉट फनी ! नेम्स महात्मा गाधी, लोकमान्य तिलक ! हू वेअर दे, एनी वे ? (महात्मा गाधी ! लोकमान्य टिळक ! कसली चमत्कारिक नावं ही ! होती तरी कोण ही माणसं ? ) आणि नानासाहेब, इतकं शरमिंद वाटलं मला ! "

' तमसा तीरावरून ' या नानासाहेब गोरे यांच्या लंडनहून लिहिलेल्या प्रवास वर्णनातील हा एक अनुभव आहे. तिकडे अमेरिकेत ' रूट्स ' सारखी प्रचंड कादंबरी नीग्रो समाजाला आपल्या मूळ अस्तित्वाची ओळख करून देण्यासाठी लिहिली जात आहे, तिच्या लाखावारी आवृत्त्या हातोहात संपत आहेत. आणि इकडे, भारतात आधुनिकीकरणाच्या, आर्थिक विकासाच्या, पुरोगामीपणाच्या नादात आपले मूळ अस्तित्वच विसरले जाण्याचा, परंपरेचा धागा तुटण्याचा धोका उत्पन्न झालेला आहे. मुस्लिम समाज राष्ट्रीय प्रवाहात जेव्हा सामील व्हायचा असेल तेव्हा होवो. आपल्या पुढच्या पिढयाच या प्रवाहापासून अलग होत आहेत, भारतीयत्वाच्या प्रवाहापासून वंचित राहात आहेत. हा जीवनरस त्याना कोण पुरवणार ?

समाज पुढे जातो तो जीवनरसाच्या अस्तित्वामुळे. परंपरेच्या आधुनिकीकरणामुळे हे घडते. परंपरा आणि आधुनिकता यांची जोड विस्कटली, की वर नानासाहेब गोरे यांना आपली व्यथा सागणाऱ्या मित्राची अवस्था सगळ्या समाजाचीच होऊन बसते. आपल्याच देशात आपल्यावर शरमिंदे होण्याची पाळी येते. आपल्याच पुढच्या पिढ्या, आपली मुलेबाळे विचारू लागतील– ' महात्मा गाधी ! लोकमान्य टिळक ! कसली चमत्कारिक नावं ही ! फनी नेम्स ! होती तरी कोण ही माणसं ?'

हे सास्कृतिक उजाडपण, हा राष्ट्रीय संस्काराचा ऱ्हास, हा जीवनरसाचा अभाव नको असेल तर संघासारख्या संघटनाकडे आपण नव्या दृष्टिकोनातून पाहायला हवे आहे. अशा संस्था नष्ट करण्याचा, त्यांच्यावर सतत विषारी टीकेचा भडीमार करून वातावरण दूषित करण्याचा वेडेपणा यापुढे तरी कमी व्हायला हवा. अशा संस्थाशी नवे संवाद सुरू केले पाहिजेत. नवभारताच्या उभारणीत त्यांचा आधार कसा घेता येईल या दृष्टीने विचारविनिमय, देवाणघेवाण व्हायला हवी. नाही तर उद्या असाही प्रश्न विचारण्याची पाळी आपल्यावर येईल, की स्वराज्य तरी हवे होते कशासाठी ? टिळक-गाधी काय फक्त गोरा साहेब घालवून काळ्या साहेबाचे राज्य आणण्यासाठी झगडले होते का ?

असा संवाद उभयपक्षी व्हावा, वाढावा यादृष्टीने संघपरिवारातली जी असंख्य मडळी, गेली कित्येक वर्षे कार्यरत आहेत त्यातलेच रामभाऊ म्हाळगी हे एक ठळक नाव.

संपूर्ण संघाने घडवले असे हे एक व्यक्तिमत्त्व. मूर्तिमंत शिस्त. राष्ट्रासाठी कणाकणाने, क्षणाक्षणाने झिजत राहण्याची प्रेरणा.

त्यानी राजकीय क्षेत्र निवडले. त्यासाठी प्रथम जनसंघ – जनसंघाकडून जनता पक्षाकडे ... स्वार्थासाठी या वाटचालीतले एक पाऊल कधी इकडे तिकडे पडले नाही.

जनता पक्षाच्या फाटाफुटीच्यावेळी लोकसभेच्या सेंट्रल हॉलला अक्षरशः शेअरबाजाराचे स्वरूप आलेले होते. आज हा फुटला, कालचा तो तिकडचा आज इकडे आला. हा निघाला आहे. याचा भाव हा... नवीन अफवा... पुन्हा कोंडाळी जमून त्यावर चर्वितचरण, पण म्हाळगी मात्र या कोंडाळ्यात कधी दिसले नाहीत. त्याचा मुक्काम पलीकडेच असलेल्या लोकसभा ग्रंथालयात; ठराविक वेळी ठराविक ठिकाणी म्हाळगी असणार म्हणजे असणार. पक्षाने टाकलेल्या जबाबदाऱ्या, मतदारसंघातली कामे याकडे या धामधुमीच्या काळातही त्याचे पूर्ण लक्ष होते. कुठेही हे करत असताना त्यांना संघ-

जनसंघ आडवा आला नाही, दुहेरी निष्ठेचा सवाल उपस्थित झाला नाही. त्यानी आपले संघस्वयंसेवकत्व कधी लपवलेही नाही किंवा उगाच मिरवलेही नाही. दिल्लीतला क्षण न् क्षण स्फोटक असताना रामभाऊ या दरम्यान ठाण्यातल्या आपल्या मतदारसघातही एक धावता दौरा करून आले व दिल्ली-तल्या घडामोडीची त्यानी आपल्या मित्रमंडळीना नीट कल्पना दिली.

२८ महिन्यात एकही परदेशवारी नाही !

रामभाऊ पुण्याचे या विभागावरचे आपले लक्ष ढळू न देता त्यानी ठाणे विभागातही जनता पक्षाची बांधणी व्यवस्थित केली. नवे कार्यकर्ते जोडले. तेथील समस्याना वाचा फोडली. आपल्या मतदारसंघातले गाव न् गाव गेल्याच महिन्यात हिंडून आलेला, निवडणुकीतील विजयानंतर पुन्हा आपल्या मतदाराना वारंवार भेटणारा दुसरा कुणी खासदार जनता पक्षातही असेल की नाही शंकाच आहे.

मतदारसंघही चमत्कारिक. आदिवासी गावापासून आधुनिक कारखानदारीची वाढ असलेला. कुणाच्या पासपोर्टच्या अडचणी, कुणाचे शेतीचे प्रश्न, बेडूक शेतीला उपयुक्त आहेत म्हणून त्यांच्या निर्यातीवर बंदी घालावी या मागणीसाठी एक परिषदही या काळात जनता पक्षातर्फे आयोजित करण्यात आलेली होती. या २८ महिन्यांत म्हाळगीना आलेल्या व त्यांनी दिलेल्या पत्राची, प्रश्नोत्तरांची व निवेदनाची संख्या पाहिल्यावर थक्क व्हायला होते. मोजली तर ही संख्या पंचवीस हजार तरी होते. शिवाय शेकडो भेटीगाठी. महिन्यातला निदान आठवडा तरी रामभाऊंनी ठाणे मतदारसंघात घालवलेला आहे. लोकसभेतली हजेरी पूर्ण. अगदी गणिती भाषेत सागायचे तर ८८ टक्के.

'उमेदवार जनता पक्षाचा असला तरी प्रतिनिधी सर्वांचा' ही म्हाळगीची भूमिका सर्व लोकप्रतिनिधीना मार्गदर्शक ठरणारी आहे. परवाच त्यानी माणूस प्रतिनिधीशी बोलताना पुन्हा सागितले, 'पक्षाची शिस्त अलबत पाळावी. पण प्रश्नाची सोडवणूक करताना पक्षाभिनिवेश कशाला हवा ? हा काँग्रेसवाला, तो जनतावाला, हा शिवसेनावाला, तो कम्युनिस्ट असा विचार लोकप्रतिनिधीनी करता कामा नये. या निर्माण झालेल्या राजकीय जाती तोडून टाकल्या पाहिजेत.'

'शॉर्टकटने मिळते ते शॉर्टकटनेच जाते हे लक्षात घेऊन शाश्वत मार्गच अनुसरायला हवा. या राजकारणापायी ग्रामीण भागात आज दुफळ्या पडून एकात्मता दुभंगते आहे. हे अतिशय धोकादायक आहे. क्षुद्र राजकारणापायी आपण माणुसकीला पारखे होणार काय ? हा खरा सवाल आहे. राजकारणापायी वैर निर्माण व्हावे हे मला मान्य नाही. कोणताही पक्ष आमचा शत्रू नाही. स्पर्धक जरूर असेल; पण त्यासाठी विचाराच आदान-प्रदान करता येते. हेव्यादाव्याची भाषा उपयोगाची नाही. निवडणुका येतील आणि जातील, एक पक्ष सत्तेवर येईल आणि जाईल पण समाज चिरंतन राहणार आहे तो एकत्वाच्या सूत्रात कसा गुंफला जाईल याची लोकप्रतिनिधीनीच काळजी वहायला हवी.'

निवडणुकीची धामधूम (शिस्तबद्ध!) चालू असल्यामुळे रामभाऊशी फार वेळ काही बोलता आले नाही. पण २-३ विषयांवर त्यानी व्यक्त केलेल्या परखड विचाराची नोंद घ्यायला हवी. चव्हाणाच्या भूमिकेवर तर त्यानी हल्लाच चढवला. ते म्हणाले : 'चरणसिंग हे फुटिराचे प्रतिनिधी आहेत यशवंतराव चव्हाण यानी सरकारात सहभागी होऊन फुटिरतेला साथ दिली आहे. चोरी करणारा व त्याला साथ देणारा दोघेही सारखेच दोषी आहेत. म्हणून चव्हाणांची हुकुमशाही विरोधी लढा, ही लढाई नसून केवळ बढाई आहे. गेल्या निवडणुकीत हुकुमशाहीचा पाडाव झाला. आगामी निवडणुकीत तिचे पूर्ण उच्चाटन होईल.'

राजकारणी आयाराम गयाराम प्रवृत्तीचा जनतेला उबग आला आहे. असे किती दिवस चालायचे ? व त्यावर उपाय कोणता ? यावर रामभाऊंनी नि.संदिग्धपणे सागितले की, 'पक्षातरविरोधी समर्थ लोकमत बनविणे त्यासाठी आवश्यक आहे. पक्षांतर बंदी विधेयक मांडण्याचे 'जनता पक्षाने आश्वासन दिले आहेच; परंतु मी स्वत: निवडून आल्यास लोकसभेच्या पहिल्या कामकाजी अधिवेशनात त्यासंबंधीचे खासगी विधेयक मांडून त्याबाबतचे, कर्तव्य बजावण्याचे ठरविले आहे'

ठाणे लोकसभा मतदारसंघात, कल्याण वगैरे भागात मुस्लिम मतदार खूप आहेत म्हाळगीचा सघ-जनसंघ आडवा येणार का ? शिवाय इमाम इंदिरेला मिळाला आहे. म्हणून म्हाळगीना यासंबधीही विचारले. त्यांनी मुस्लिम समाजातील तरुण नेतृत्व जनता पक्षाच्या बाजूने उभे आहे असा निर्वाळा दिला. इमामचे धर्मकारण मानू, राजकारण मानणार नाही, असे दिल्लीत खुद्द जामा मशिदीतही इमामला सुनावले जात आहे. याचे पडसाद कल्याण-भिवंडीत उमटणार नाहीत असे कसे होईल ?

कुठलाही उमेदवार मतदारसंघातले सगळे प्रश्न तर कधीच सोडवू शकत नसतो. पण त्याची प्रश्नाची जाण अचूक असावी लागते. अग्रक्रम निश्चित ठरावे लागतात. याबाबत रामभाऊंचे धोरण म्हणजे जनता पक्षाच्या एकूण कार्यक्रमांची आपल्या मतदारसघापुरती अंमलबजावणी असेच म्हणावे लागेल. तरी पण एकदा पुन्हा उजळणी झालेली बरी. रामभाऊंनी ती अशी केली –

'ठाणे लोकसभा मतदार सघ हा महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकाचा मतदारसंघ आहे. (८,८९,६६० मतदार) भौगोलिकदृष्टचाही तो विस्तृत असल्याने समस्याही खूप व विविध प्रकारच्या आहेत ग्रामीण भागातील पाणीपुरवठयाचा प्रश्न निकडीचा आहे. खेडेगावातून महिलांना डोकीवर घागरी, हंडे, कळश्या, लोटचा अशा एकावर एक पिरॅमिडप्रमाणे रचून पाण्यासाठी वणवण करावी लागते. काँग्रेसने ग्रामीण महिलांवर गेल्या ३० वर्षांत हा प्रश्न न सोडवून मोठा अन्यायच केला आहे. इंदिरा गांधीच्या तथाकथित सुस्थिर राज्यातही १० वर्षांत फक्त ३ हजार गावानाच पाणी पुरविले गेले. जनता राज्यात मात्र गेल्या दोन वर्षांच्या काळात ४५ हजार खेडेगावांना पाणीपुरवठा केला गेला. हा फरक लक्षात घेण्यासारखा आहे.'

'ग्रामीण भागात रोजगाराचा प्रश्नही तीव्र आहे. ठाणे जिल्ह्यात जिल्हा उद्योग केन्द्राची स्थापना करून जनता राजवटीने प्रगतीचे पाऊल निर्धाराने पुढे टाकले आहेच. त्याद्वारा जिल्ह्यात पुढील तीन वर्षांच्या काळात सुमारे २० हजार बेकार तरुणांना उपजीविकेची स्वतंत्र साधने व रोजगार उपलब्ध होऊ शकेल. त्यादृष्टीने आमचा आराखडा तयार आहे.'

'शहरी भागात उपनगरी रेल्वे व एस. टी वाहतूक ही जटिल समस्या आहे. या मतदारसघात कामगाराची सख्या लाखोंनी आहे. त्याना जा-ये करण्यासाठी सुलभ वाहतूक व त्याच्या निवासाची सोय हे त्यांना भेडसावणारे प्रश्न सोडविणे या विषयाना मी अग्रक्रम दिला आहे'

यासाठी रामभाऊंनी पुन्हा लोकसभेत जाणे आवश्यक आहे.

रामभाऊ !

शुभास्ते पंथानः सन्तु ! □

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

## ज्योतिषी म्हणतात – ‘ हुकुमशाही अशक्य ’

जर कुणाला हुकुमशाही येणार व लोकशाही बुडणार अशी भीती वाटत असली तर ती त्यांनी सोडावी. ग्रहांनी हुकुमशाही येत नसल्याचा व लोकशाहीच राहणार असल्याचा निर्वाळा दिला आहे.

पुण्यातील दोन प्रसिद्ध व एक अप्रसिद्ध अशा तीन ज्योतिषांबरोबर कधी संध्याकाळ तर कधी सकाळ घालवून त्यांनी सांगितलेल्या ग्रहयोगांवरून मी हे सांगत आहे. त्यांच्याकडे जाण्यापूर्वी मनात आले की, ज्योतिषाकडे गेलो तर आपले हसे होईल का ? पण संकटकाली सर्व उपायांबरोबर ज्योतिषाकडे जाण्याचा उपाय करावयाचा ही प्रथा फार प्राचीन आहे. अश्म युगात आज शिकार मिळेल की नाही हे पाहण्याचे ठोकताळे असलेच पाहिजेत. वेदकाली गाय हरवली की, ती सापडेल की नाही हे पाहण्यासाठी ठोकताळे होते. ज्ञानेश्वरांनीहीं ‘ पैल तो गे काऊ कोकताहे’ या अभंगात पाहुणे पंढरीराय घरी येण्याचा ठोकताळा सांगितला आहे. या सर्वाहून ताजे उदाहरण बुद्धिवंतांना पटलेल्या ‘ सायकल थीफ ’ या इटालियन चित्रपटाचे आहे. चोरीस गेलेली सायकल शोधण्याची जीवापाड धडपड करीत असता नायक ज्योतिषाकडे जाऊन येतो. या एका लहान प्रसंगाने नायकाच्या जगण्याच्या धडपडीतले सबंध कारुण्य आपल्यापुढे राहून आपले हृदय तुटते.

तेव्हा संकटकाली इतर प्रयत्नांत ज्योतिषाकडे जाऊन येण्याची ही प्राचीन प्रथा पाळून मी ज्योतिषाकडे गेलो, यात हरण्याजोगे तर नाहीच उलट तसे जावे लागावे यात देशातील फाटाफुटीने ओढवलेल्या परिस्थितीतले कारुण्य लक्षात येऊन हृदये तुटावीत असे मला वाटते.

□

भविष्य विचारण्यास मी तीन संध्याकाळी तीन ज्योतिषांकडे गेलो. पैकी दोन पुण्यातील प्रसिद्ध ज्योतिषी होते व एक अप्रसिद्ध. दोन प्रसिद्ध ज्योतिषी म्हणजे श्री. श्री. के. केळकर व श्री. व. दा. भट. केळकर हे पन्नाशीतले गृहस्थ आहेत. गेली तीस–एक वर्षांचा त्यांचा अभ्यास आहे. ते इलस्ट्रेटेड विकलीत भविष्य लिहितात. विविध ठिकाणी त्यांचे लेख येतात. विविध क्षेत्रातले लोक त्यांच्याकडे भविष्य पहाण्यास येतात. परदेशातूनसुद्धा त्यांना विचारणा होते. इंग्रजीतून भविष्य लिहिणारे बहुधा मराठीतले ते पहिले ज्योतिषी असावेत, प्रमुख ज्योतिषात ते मोडतात.

श्री. व. दा. भट हेही प्रसिद्ध आहेत. त्यांची ज्योतिषशास्त्रावरची पुस्तके प्रसिद्ध आहेत. ‘ पंचमस्थान ’ हे त्यांचे ताजे पुस्तक होय. हेही ठिकठिकाणी लेख लिहितात. हे दोन्ही ज्योतिषी वृत्तीने आधुनिक आहेत. तिसऱ्या ज्योतिषाने नाव उघड करण्यास मना केली आहे. प्रसिद्धी नको म्हणून. त्याचे ग्रंथ नाहीत. ज्योतिष हा व्यवसाय नाही. त्याला खगोल शास्त्राचा छंद आहे व त्याचा त्या शास्त्राचा अभ्यास चांगला आहे. मित्रमंडळीत गम्मत म्हणून भविष्य सांगावयाचे इतकेच. इंदिरा गांधीं या सत्तेच्या ऐन भरात असता ( आणीबाणी जेव्हा नुकतीच सुरू झाली ) त्याने पुढे अमक्या साली व अमक्या महिन्यात इंदिरा गांधी सत्तेवर रहात नाहीत असे सांगितले होते. त्यावेळी ते आम्हा सर्वांना खोटे वाटले पण नंतर तसेच झाले. त्याचे दुसरे भविष्य होते की, त्यावेळी रक्तहीन क्रान्ति होईल. त्याच्या मेदिनी भविष्याकडे म्हणूनच माझे लक्ष गेले. या वेळी त्यालाही विचारावयाचे ठरविले.

राष्ट्राच्या ज्योतिषाला मेदिनी ज्योतिष म्हणतात. तिघांनाही मी मेदिनीची व्याख्या विचारली होती. तिघांच्या व्याख्यामधून ‘ पृथ्वीवरील चराचराचे भविष्य ’ अशी सुटसुटीत व्याख्या मी काढली. यामधे भूकंप, पाऊस, थंडी वगैरे निसर्ग, लोक व लोकप्रतिनिधी या सर्वांचे भविष्य येते.

लोकात जसा निवडणुकीविषयी कमी उत्साह आहे तसा या तिन्ही ज्योतिषातही दिसला. निवडणुकीचे निकाल काय होतील हे सांगण्याचा तिघांनाही फारसा उत्साह नव्हता. अमुक एका उमेदवाराचे सांगावयाचे तर सर्व उमेदवारांच्या पत्रिका पुढे हव्यात. त्या मिळत नाहीत. अशा अर्थाचे तिघेही म्हणाले, केळकरांनी सांगितले की, निवडणुका पक्षनिहाय असल्यामुळे त्यांत वैयक्तिक पक्षाच्या पत्रिकेचे महत्त्व जास्त; पण आता काँग्रेसपक्षाची जी पत्रिका आहे ती आय. ची धरायची की यू. ची की आणखी तिसऱ्या काँग्रेसची ? मग कोणत्याही पक्षाची पत्रिका चांगली निघाली नाही की, आम्ही संमिश्र मंत्रिमंडळ येणार म्हणून सांगतो आहोतच.

निवडणुकीबद्दल तिघेही बोलले नाहीत तरी काही प्रमुख व्यक्तींच्याबाबत तिघांनीही भविष्य वर्तवली. इंदिरा गांधी यांचा अस्त झालाय असे तिघांचेही मत पडले. केळकरांचं म्हणणं असं की, इंदिरा गांधी इमरजन्सीच्या वेळी जशा होत्या तशाच आधीही होत्या. आधी त्यांचे ग्रह जोरात असल्यानं तशाच वागूनही त्यांना भयंकर लोकप्रियता लाभली. पण ग्रह फिरताच त्या इमरजन्सी वाईट

ठरून खाली आल्या. त्याचे चांगले ग्रहमान असता त्यांनी इमरजन्सी लादली असती तर ती लोकानी आनदानं चालवून घेतली असती.

व. दा. भट याच्या मते १९७६–७७ लाच इंदिरा गाधी याचा अस्त झाला. सध्या त्याच्या पत्रिकेत दशमेश मंगळावरून गुरूचे भ्रमण होत आहे. त्यामुळे इंदिरा गाधी लोकप्रिय आहेत वगैरे वाटते आहे. चित्रपट सृष्टीतील नटाचा मळ फॉर्म गेला तरी तो काही चित्रपटात काम करीत राहतो तसेच त्याचे होणार. त्याच्या कुंडलीत नोव्हेंबर १९८० नंतर शनीची रवीची अंतर्दशा सुरू झाल्यावर संपूर्ण चित्र पालटेल. त्याचा अस्त झाल्याचा प्रत्यय येईल.

तिसऱ्या अनाम ज्योतिषाच्या मतेही इंदिरा गाधीना यापुढे शून्य चान्सेस आहेत. केळकरांप्रमाणेच त्याचे मत आहे. बाई वाईट. पण ग्रह चांगले होते. ७०।७१।७२ यावर्षी बाईंच्या दशमात शनी होता तो राशीच्या पचमात होता. या सुयोगानं बाई पुढे आल्या, त्या काळात भारताची प्रतिमा त्यांनी उज्ज्वल केली. पण शनी व्ययात जाताच त्यांनी इंदिराबाईंना समूळ नष्ट केले. त्यांनी चरणसिंग पुढे येणार नाहीत असे सांगितले, यशवंतराव चव्हाण याना ऑक्टोबर महिन्याच्या आसपास पुष्कळ चान्सेस आहेत. निवडून आल्यानंतर यशवंतरावाचा ग्रुप आपला पक्ष सोडील किंवा मित्रपक्षाशी युती करून राज्य करील. हे अनामक ज्योतिषी इंदिराबाईंचे सिंह लग्न मानतात. ◘

भारताची रास मकर धरली जाते. मकर रासच का या प्रश्नाला व. दा. भट म्हणाले, भारतीयाचे गुणधर्म हे मकर राशीचे आहेत संथपणा, चिवटपणा, पुराणमतवादित्व, स्थिरता व तत्त्वज्ञपणा असे ते गुणधर्म आहेत व ते जुळतात. केळकर म्हणाले, टॉलेमीने दुसऱ्या शतकात भारताची मकर रास ठरविली. राणीच्या जाहीरनाम्याच्या दिवशीचे ग्रह, मकरलग्न मांडून पत्रिकेत घातले, आज तेच चालू आहे.

आपण देशाची चिंता करतो. म्हणजे दूरगामी बुद्धीनं आपण आपली व आपल्या पुढीलांची चिंता करतो. ते दूरगामी धोरण नसलेली मंडळी जास्त झाली की देशात आजच्यासारखा अनागोंदी कारभार सुरू होतो. देशातील परिस्थितीबद्दलचे हे आपले विवेचन झाले; पण ज्योतिषी लोक वेगळ्या भाषेत ही गोष्ट सागतात. मी तिघा ज्योतिषांना आजच्या बेदिलीबद्दल प्रश्न विचारला. श्री. के. केळकर म्हणाले, शनी अष्टमात आला की, माणसाची डोकी फिरतात अस्थिरता येते व अटळ अशा वाईट गोष्टी घडतात. (गेली अडीच वर्षे भारताच्या अष्टमात शनी होता) श्री. व. दा. भट म्हणाले, १९७४ साली हर्षल तुळेत गेला. भाडणे व बेदिली सुरू झाली. तो तिथे असेपर्यंत हेच गोंधळ चालू राहणार. १९७५ साली शनीहर्षल केन्द्रयोग झाला. त्या वेळी रोग बाहेर आला. ७५–७६–७७ साली शनी कर्केत होता तेव्हा समाजपुरुषाचं जवळजवळ कंबरडं मोडलं.

ज्योतिषी लोक ग्रहाच्या दृष्टीने घटना सागत असता ग्रहयोग सागणे हे अटळ असते. हे योग सागण्याचे टाळून भविष्य सागा असे त्यांना सांगून उपयोग नसतो. पण प्रत्येक पंडित हेच करीत असतो. आपल्या सागण्याच्या पुष्ट्यर्थ मेकॉले, ह्यूम वगैरेंचे उतारे विद्वान देतात ते आपणास वाचावेच लागतात. शिवाय माझ्या असे लक्षात आले आहे की, आपण शास्त्राला धरून भविष्य सागतो आहोत हे प्रत्येक ज्योतिषाला पटवावयाचे असते. फक्त काही ज्योतिषी त्याचा इतका अतिरेक करतात की, त्याच्या भविष्याची एक ओळ आधीच्या पंचवीस ओळीच्या ग्रहयोगात हरवते.

लेखकात किंवा कवीमध्ये जसे उथळ खोल प्रकार असतात तसे ज्योतिषातही असतात. गंडे दोरे देणारा किंवा नवससायास करावयास सागणारा ज्योतिषी 'पॉप्युलर' तऱ्हेच्या ज्योतिषात बसतो. अशा एखाद्या ज्योतिषाने भारताच्या लोकशाहीला दृष्ट लागली आहे असे म्हणून भारतमातेच्या गळ्यात घालण्यास गंडा तयार केला तरी मला आश्चर्य वाटणार नाही किंवा प्रत्येक भारतीयाने हातात काळा दोरा बांधावा अशी चळवळ त्याने सुरू केली तरी नवल वाटणार नाही.

पण हे ज्योतिषी त्यातले नव्हेत. हे पंडित ज्योतिषी आहेत. ते शास्त्र सोडणार नाहीत. त्यांनी थोडेसे ग्रहयोग सांगितले तर आपण सहन केले पाहिजेत. एवढ्याशा त्रासाने जर आपणास राष्ट्राचे भविष्य कळत असेल तर तो त्रास काहीच नव्हे. देशाचे भविष्य कळण्याचा काही उपयोग होतो का हेही मी त्याना विचारले. उपयोग होतो असे तिघाचे मत आले. श्री. के. केळकर म्हणाले की, भविष्यातून निश्चित काळजी घेता येईल. चीनमध्ये ७४ साली भूकप झाला तेव्हा ज्योतिषी सांगत असून का ऐकले नाही अशी सरकारकडे विचारणा झाली. असे कळले की पुढची दोन वर्षे दुष्काळीची आहेत तर आतापासून धान्य साठविता येईल किंवा दुसऱ्या काळज्या घेता येतील. लढाई होण्याचा सभव आहे असे कळले तर ती तयारी करता येईल. आणि समजा तसे झाले नाही तर तयारी फुकट जात नाही. इन्शुरन्स करतो ते माणूस मरावा म्हणून का ? माणूस राहिला तर इन्शुरन्सचे हप्ते वाया गेले असे आपण म्हणतो का ? प्लॅनिंग कमिशनमध्ये एक जाणता ज्योतिषी बसवायलाही हरकत नाही. जाणत्या ज्योतिष्यांनी एकत्र बसून निर्णय घ्यावेत व सरकारला कळवावे ◘

माझा एक प्रश्न होता की, आपण ७९ सालात उभे आहोत. या मागील दहा वर्षीतल्या घटना ज्योतिषशास्त्र दृष्ट्या उलगडून दाखविता येतील का ? तेव्हा व. दा. भट म्हणाले, ज्योतिषशास्त्र दृष्ट्या मागील घटना पूर्ण कळतात कारण त्याला नामानिधान देता येते. पण भविष्यातले इतके तपशीलवार सांगता येणार नाही. कोणता कालखड कसा आहे या संबंधीच्या मनांत सामान्य माणूस व ज्योतिषी यात पुष्कळदा अतर पडते. आता हा काळ बेदिलीचा वाटतो पण माझ्या मते ज्योतिष शास्त्र दृष्ट्या १९७६-७७ पासून सुरू झालेल्या कालखंडास जुन्याची मोडतोड व नव्याची घडण घडविणारा कालखंड असेच म्हणावे लागेल. आमच्या अनामिक ज्योतिषाच्या मताने येते आठ महिने भारतास वाईट जातील. श्री. केळकरांना १९७७ ते ८२ मध्ये एकही मोठा पुढारी दिसत नाही. व. दा. भट म्हणाले, आगामी तीन चार वर्षे ही स्टॉप-गॅप नेतृत्वाची आहेत. म्हणजे जुन्याचा अस्त व नव्याचा उदय या कालातील आहेत. १९८४ सालापर्यंत जुने नेतृत्व संपूर्णपणे

पडद्याआड जाणार हे निश्चित. श्री. के. केळकर म्हणाले १९८३ नंतर भारताला खरा मातबर पुढारी मिळेल.

एकूण १९८२ नंतरचा काळ तिघाही ज्योतिषाना हुरूपेचा वाटत आहे. अनामिक ज्योतिषाच्या मते येते आठ महिने सोडले तर ८०।८१ ही वर्षे बरी जातीलच, पण ८२ ते ८७ हा काळ अतिशय सुदर जाईल. ८५ सालच्या निवडणुकीत भारतीय जनता असे पक्ष निवडून देईल की, भारत प्रगतिपथावर राहील. व. दा. भट याचे मते 'सर्व गोष्टीचा साकल्याने विचार करिता १९९२ ते ९९ या कालखंडात भारताचा व सामाजिक व राजकीयदृष्टया संपूर्ण चेहरामोहरा बदलणाऱ्या घटना घडतील आज आपणाला जे नाटयपूर्ण वेगवान असे राजकीय व सामाजिक बदल व्हावेसे वाटतात ते या कालखंडात होतील. १९९० ते ९९ याकालात मोठे बदल होतील. २००१ सालामध्ये भारतीय लोक खरे एनलाइटन्ड झालेले दिसतील.

भारतात हुकुमशाही येईल का हा प्रश्न तिघाना मी पुन्हा पुन्हा मध्ये मध्ये विचारत होतो पण कोणत्याही–असावध क्षणीही–त्याचे उत्तर 'हुकूमशाही येईल' असे आले नाही. तिघानी एक मातबर पुढारी होणार आहे असे म्हटले. श्री. के. केळकर म्हणाले 'तो हुकूमशहासारखा जोरदार असेल पण लोकशाही जाणार नाही.' व. दा. भट म्हणाले '१९९४/९५ या साली डिक्टेटरची शक्यता आहे. पण डिक्टेटरपेक्षा तो खंबीर नेतृत्वाचा पुढारी असे म्हणणे योग्य होईल. त्याच्या अंगी डिटेक्टरचा ठामपणा असेल. त्यावेळच्या ग्रहमानाप्रमाणे या पुढाऱ्याचा येताना चेहरा वेगळा असणार व जाताना वेगळा असणार.' अनामिक ज्योतिषी म्हणाले 'भारतात पुढील पन्नास वर्षे तरी हुकूमशाही खात्रीने येत नाही. पुढचे मात्र सागता येत नाही. त्यानंतर हुकूमशाही आली तर ती ऐच्छिक असेल.'

जागतिकदृष्टया महत्त्वाचा असा पेट्रोलचा प्रश्नही विचारला होता. तिघाचेही उत्तर मला वाटले होते की, आपणास गाडी-घोडयाचा आश्रय घ्यावा लागेल असे येईल. तिघाचेही उत्तर पर्यायी इंधन निघेल असे आले.

१९८० च्या पुढचा काळ सागताना बरेच वेळा सामाजिक प्रगतीचा उल्लेख आला होता अस्पृश्याच्या चळवळीचे काय होणार हे साहजिकच मनात आले व दा. भट म्हणाले, पुढचा काळ सामाजिक सुधारणाचाच आहे. १९९० पासून समाजाची पुनर्बांधणी सुरू होईल. ती दहा वर्षे चालेल. २००१ पर्यंत, अस्पृश्याचा प्रश्न राहणार नाही. अनामिक ज्योतिषी म्हणाले, अस्पृश्यता नष्ट होईल व त्याबरोबर अस्पृश्यांच्या खास सवलती १९८५ सालापासून कमी होतील. मुसलमानाच्या बाबतीत त्यांचा माजोरपणा तसाच राहील. पण त्याच्यात खूप सत्यशोधक निर्माण होतील. मुसलमानाना भारताच्या कायद्याप्रमाणे इतरासारखे कायदे लागू होतील.

□

या तीनही ज्योतिषानी हुकूमशाही येणार नाही हे एकमुखाने सागितले. तीनही ज्योतिषानी १९८२ नंतरचा काळ चांगला आहे म्हटले. या तीनही ज्योतिषांनी नवे पुढारीपण येईल असे वर्तवले. या तिघानीही सामाजिक सुधारणांचा हा काळ आहे. (म्हणजे १९८२ पुढचा) असे सूचित केले. २००१ या सालापर्यंत भारताचा उत्कर्षकाळ तिघानीही वर्तवला.

या तिघाना मी वेगवेगळा भेटलो व एकास दुसऱ्याने काय सांगितले याची शब्दानेही कल्पना येऊन दिली नव्हती.

एकूण काळ आशादायक आहे. तेव्हा आता हताश होण्याचे कारण नाही. सायकल थीफ या चित्रपटाचा नायक जसा ज्योतिषाकडे सायकल सापडेल का म्हणून विचारण्यास गेला, तसा मीही आपणा सर्वांच्या शंका, भीती, नैराश्य घेऊन या ज्योतिषाकडे गेलो. त्यांनी एकमुखाने आशा दाखवली आहे. आता पुढचे काम आपले आहे. □


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

| | |
|---|---|
| १ : मोठी माणसं (भाग १ व २) : (व्यक्तिचित्रे) संपादक : बाळ सामंत | रु. १६ रु. प्रत्येकी |
| २ : खुशमस्करी : (विनोदी कथा) : बाळ सामंत | रु. १६/– |
| ३ : रानझरी : (कादंबरी) : नयना आचार्य | रु. १५/– |
| ४ : ओली माती : (कादबरी) : गुरुनाथ नाईक | रु. १६/– |
| ५ : बारा लाखात जगाची सफर : रमेश मंत्री | रु. १५/– |
| ६ : देवचाफा : (कथासंग्रह) : विद्याधर पुडलीक | रु. २०/– |

– ENGLISH –

| | |
|---|---|
| 1 : Doctor In The Nest : (Humourous novel) : Richard Gordon | Rs, 25/– |
| 2 : Walk Proud : (Picture Story) : Evan Hunter | $ 1·95 |
| 3 : Scruples : (Bestseller–novel) : Judith Krantz | |
| 4 : The Indian Call–Girls : Dr. Promilla Kapur | Rs. 14/– |

* It is time the Government realised that for a flourishing democracy, people must be literate and fed constantly with information. (Indian Express 2–9–1979)

We do our little bit to disseminate information with our clipping service !!

दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०

बगाड ( ३ )

# ग्रामीण जनतेसाठी

–बघ्या

पुणे विद्यापीठाच्या विज्ञान विभागाचे अधिपती, आमचे ज्येष्ठ आणि गुरुतुल्य प्राध्यापक, मा. रा. भिडे याच्याविषयी आम्हाला जी आपुलकी वाटते ती शब्दात व्यक्त करणे केवळ अशक्य आहे. त्रिखंडात कीर्ती पोचलेले जे हाताच्या बोटावर मोजता येण्याजोगे भारतीय शास्त्रज्ञ आहेत त्यात त्याचा समावेश होतो. आता या विधानाला आधार काय आहे आणि अशाच स्वरूपाचे वाक्य आम्ही आजपर्यंत सात हजार तीनशे एकूणसत्तर शास्त्रज्ञाविषयी उच्चारले आहे त्याची वाट काय, असा खवचट प्रश्न आमचे दुसरे ज्येष्ठ आणि गुरुतुल्य मित्र अण्णासाहेब उपस्थित करतील हे आम्ही जाणतो. प्रा. भिडे यांच्या त्रिखंडकीर्तीचे रहस्य आम्हाला माहीत नाही. पण हा दोष माधवरावजीचा नसून इतर अनेक विषयांप्रमाणे विज्ञान विषयातही प्रगाढ अज्ञानी असणाऱ्या आमच्या स्वत.चाच आहे.

थोरांची कार्ये, त्या कार्याची जी फळे मिळतात त्यावरून अनुमानावी लागतात असे कालीदासाने म्हटले आहे. प्रा. भिडे यांच्या कीर्तीचा आधार आम्हाला सापडला नसला तरी त्या कीर्तीची जी फळे त्यांच्या पदरात पडली आहेत व हस्तेपरहस्ते किंवा योगायोगाने अगर योजनेने विद्यापीठात चाखावयास मिळत आहेत त्यावरून त्या कीर्तीचे अस्तित्व अनुमानता येते. प्रा. भिडे यानी भरवलेले आणि देशपरदेशीच्या शास्त्रज्ञानी आपल्या उपस्थितीने भूषविलेले परिसंवाद, राष्ट्रीय व परराष्ट्रीय संस्थांकडून केवळ त्यांच्या शब्दाखातर मिळालेली अनुदाने आणि त्याचे सतत चाललेले देशातील व दूर देशातील प्रवास यांची झडती घेतली तरी आमच्या सारख्या सामान्य मनुष्याची अंगुली दातातली आपोआप जाते; आणि डॉक्टरसाहेबांच्या कीर्तीचा पाया शोधण्याच्या भानगडीत न पडता त्यांचे गोडवे गाण्यातच तो गुग होतो. ही किमया हीच प्राध्यापक-महोदयाच्या विख्यातीस कारणीभूत असेल, असेही म्हणता येईल. असो.

इतक्या उच्चस्तरावर वावरत असताही तळीच्या समाजाला ते विसरलेले नाहीत ही लक्षणीय गोष्ट आहे. हस्तीदंती मनोऱ्याच्या सगळ्यात वरच्या मजल्यावर आपल्या शास्त्रज्ञानाच्या कोशात नवीन शोधाचे पंख फुटतील अशा अपेक्षेने आमचे शास्त्रज्ञ सुरवंटाप्रमाणे पडलेले असतात. अशा वरकड विद्वानांपैकी भिडेसाहेब नव्हेत. विद्यापीठ आणि भोवतालचा समाज याच्यात सतत संबंध असला पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. म्हणूनच विज्ञान विभागाचे अधिपती म्हणून नेमणूक झाल्याबरोबर त्यांनी पहिली गोष्ट केली ती अशी की, ते मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे सभासद झाले. कोणत्याही सस्थेचे सभासदत्व केवळ नियमाप्रमाणे मिरवणे भिड्यासारख्या सत्त्वशील माणसाला मानवणारे नव्हे. त्यांनी लागलीच 'टीचिंग एड कॉर्पोरेशन' नावाचा स्वत.चा व्यवसाय सुरू केला. अर्थात् या सर्व गोष्टी ते विद्यापीठाच्या भल्यासाठीच करत होते. समाजात व्यवसाय वाढले पाहिजेत आणि आदर्श व्यवसाय कसा करावा हे विद्यापीठाच्या शिक्षकांनी उदाहरणाने लोकांना दाखवून दिले पाहिजे. पण पुणे विद्यापीठातील क्षुद्र विचाराच्या आणि परदेशातील नवीन उपक्रमाशी तोडओळखही नसलेल्या लोकांनी कुजबूज करून वाईट वातावरण निर्माण केले. भिड्यानी उद्वेगानी स्वत.च व्यवसाय बंद केला.

## कॉलेज डेव्हलपमेंट कौन्सिल

सुदैवाने गेल्या वर्षभरात विद्यापीठात प्रतिगामी आणि समाजपराङ्मुख गटाचा पाडाव झाला आहे. श्री. नीलकंठ चिंतामण जोशी इत्यादींच्या गतिमान, पुरोगामी आणि उपक्रमशील नेतृत्वाखाली प्रगतीवादी विचार झुजारपणे पुढे सरसावत आहेत. त्यामुळे प्राध्यापक भिडे याच्या उपक्रमामागील तत्वाकडे अधिक मोकळेपणाने विद्यापीठ पाहू शकले. ते तत्त्व म्हणजे विद्यापीठ आणि समाज यातील दुरावा नाहीसा झाला पाहिजे. त्या दृष्टीने एक इवलेसे पाऊल म्हणजे विद्यापीठ व महाविद्यालये यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले 'कॉलेज डेव्हलपमेंट कौन्सिल'.

या कौन्सिलच्या अधिपतित्वासाठी भिड्याखेरीज दुसरा लोकशाहीवृत्तीचा, मनमिळावू, कार्यक्षम, उपक्रमशील आणि उत्साही मनुष्य विद्यापीठाकडे नव्हता. हे काम भिड्यांनी गरीब खेडूत जनतेची सेवा करण्याची सधी मिळणार या अपेक्षेने स्वीकारले. आता हे काम नीट करता यावे यासाठी विद्यापीठाकडे त्यानी काही माफक मागण्या केल्या. त्या अशा :

१. माझी नेमणूक तीन वर्षांसाठी केलेली आहे; त्याऐवजी ती चार वर्षांसाठी करण्यात यावी.

२ नैमित्तिक खर्चासाठी मला दरमहा १५,०००/– रुपये दिले जावेत.

३ विविध अलौन्सेसखेरीज रु. २,५००/– द. म. मला पगार द्यावा. याशिवाय विविध विकास कार्यक्रम आखण्यासाठी व ते पार पाडण्यासाठी द म. रु. ५००/–मला द्यावेत.

४ : ड्रायव्हरसह एक वहान पुरविण्यात यावे.

५ : मी हे पद स्वीकारीत असलो तरी 'प्रोफेसर ऑफ फिजिक्स, पुणे विद्यापीठ' ही उपाधी यापुढेही लावण्यास परवानगी असावी.

६ · माझ्या कार्यालयात एक व निवासस्थानी एक असे दोन फोन्स मला विद्यापीठाच्या खर्चाने देण्यात यावेत.

## चंद्रयुगातील ग्रामविकास

अण्णासाहेब, तुम्ही बोट कशाला वर करत आहा ? असं, असं, तुम्हाला मला थाबवून स्वत.ला बोलायचं आहे अजीबात बोलू नका. तुमचे सर्व आक्षेप आम्हाला अथपासून इतिपर्यंत माहीत आहेत. भिड्यांच्या ग्रामीण जनतेच्या विकासाच्या सर्व कल्पना चूक असून त्याना स्वत.चे हित फक्त पाहायचे आहे. महात्मा गाधी, विनोबाजी, अण्णासाहेब सहस्रबुद्धे आणि अण्णासाहेब पटवर्धन इत्यादी ग्रामीण विकासासाठी आयुष्य खर्च करणारी माणसं कोठे मोटारी आणि फोनसाठी अडून राहिली

होती किंवा स्वतःला तीन-चार हजार रुपये पगार घेत होती, असच तुम्ही विचारणार की नाही ?

ग्रामीण जनतेच्या सेवेसंबंधीची खाडेकरांच्या कादंबऱ्यात शोभणारी तुमची कल्पना आम्हाला साफ नामंजूर आहे. त्यागाची दाढदुखी तोडात वागवल्यानेच सेवेला व्रताची प्रतिष्ठा लाभते हे बुरसटलेले तत्त्व झाले. खेड्यातील जनतेचा उद्धार करण्यासाठी तिचा विश्वास संपादन केला पाहिजे आणि त्यासाठी त्यांच्यापैकीच एक होऊन राहिले पाहिजे हे म्हणणे वरवर खरे भासले तरी त्याची तार्किक परिणती गवळ्याने गोठ्यात राहिले पाहिजे किंवा पोल्ट्रीच्या मॅनेजरने खुराड्यात राहिले पाहिजे असे म्हणण्यात होईल, हे तुम्ही ध्यानात घ्या. ज्यांना ग्रामवासियांच्या *विकासासाठी ठोस काही करायचे नसते;* मात्र आपण झिजतो आहोत अशा आत्मवंचनेत मश्गुल राहावयाचे असते, अशा मंडळींनी ग्रामसेवकाचे तुमच्या मनात असलेले गबाळे चित्र रंगवलेले आहे.

आज खेड्यात घरोघरी चहा प्यायला जातो. गरिबातला गरीब माणूससुद्धा चहा प्यायल्याखेरीज राहत नाही. आता हा चहा ज्यानी खेड्यात पोहोचवला ते ब्रुकबॉंडचे आणि लिप्टनचे एजंट काय पायी हिंडत होते आणि नंगे फकीर बनून राहात होते ? मळ्या-मळ्यात आज तेलाचे पंप आहेत ते पंप विकणारे चागले टेरीलिनच्या पॅंटस् घालून आणि खाद्यावर ट्रान्झिस्टर वाजवीत जीपमधून शेतावर जातात. ग्रामीण जनतेचा खरा विकास या चहाच्या विक्रेत्यांनी, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हजूनी आणि पंप-ट्रान्झिस्टर्स-फटफटया विकणाऱ्यानी केला आहे. प्रा. माधवरावजी भिडे हेही आधुनिक ज्ञानाचे प्रसारक आहेत. मग चहा कंपन्याच्या मार्केटिंग डिव्हिजनच्या हेडला असणाऱ्या सुखसोयी त्याना का नसाव्यात !

प्रा. भिड्यांच्या पत्रामागील ही भूमिका तुम्ही मोकळ्या मनाने एकदा तपासा. जीर्ण, प्रतिगामी आणि दारिद्र्याच्या सावटात जोपासलेली तुमची कोती वृत्ती तुम्हाला हे करू देत नसेल तर प्रा. भिडे तुमच्यासाठी एखादे ब्रेन स्टॉर्मिंग सेशन स्वित्झर्लंडमधल्या तारांकित हॉटेलातील सुसज्ज कॉन्फरन्स रुममध्ये भरवतील. मग तुम्हाला कळून चुकेल की, आधुनिकीकरणाला पर्याय नाही. खेड्याचा खरा विकास तेव्हाच होईल की, जेव्हा तेथील जनता उपभोगवादाच्या चालू प्रवाहात ओढली जाईल. तसे व्हायचे असेल तर प्रा. भिड्यासारख्या आधुनिक ज्ञानाच्या बाह्यतम परिघावर तरंगणाऱ्या व्यक्ती त्यांच्यापर्यंत पोचल्या पाहिजेत. मग त्याना मोटार, फोन, भत्ते, मुदतवाढी दिल्या पाहिजेत. चंद्रयुगातील ग्रामविकासासाठी या गोष्टी अपरिहार्य आणि निर्विकल्प आहेत. □

# निवडणुका

## लोकदलाचे आडमुठे धोरण

वा. दा. रानडे

गेल्या अंकात काही संकेताबद्दल लिहिताना एका संकेताबद्दल लिहावयाचे राहिले. एका उमेदवाराने एकाच जागेसाठी उभे रहावयाचे हा संकेत आपण रूढ करायला हवा. श्रीमती इंदिरा गाधी रायबरेली व मेडक अशा दोन मतदारसंघातून निवडणूक लढवीत आहेत. *रायबरेलीतून निवडून येण्याची खात्री* वाटत नाही म्हणून आंध्रमधील मेडक ही दुसरी सुरक्षित जागा त्यांनी निवडली हे उघड आहे. रायबरेलीतूनच पुनः निवडून येण्याचा आणि १९७७ च्या पराभवाचा कलंक धुवून काढण्याचा त्याचा आटोकाट प्रयत्न राहणार पण विजयाची खात्री नाही आणि लोकसभेवर तर निवडून यावयाचे आहे म्हणून मेडकमधून उभे राहण्याचे त्यानी ठरविले. मी पराभूत झाले तरी चालेल पण रायबरेली या माझ्या मतदार संघातूनच मी निवडणूक लढवीन, दुसरीकडे उभी राहणार नाही अशी भूमिका घेण्याचे धैर्य त्यांनी का दाखविले नाही ? लोकसभेवर त्यांना निवडून तर यावयाचेच आहे आणि पराभवाचा धोका पत्करावयाचा नाही म्हणून रायबरेलीच्या जोडीला मेडकमधून त्या उभ्या आहेत. दोन्ही जागावर त्या निवडून आल्या 'तर पहा उत्तर-दक्षिण दोन्ही भागातील जनतेचा माझ्यावर विश्वास आहे, अशी आपली प्रतिमा त्याना निर्माण करता येईल पण एका उमेदवाराने दोन किंवा अधिक ठिकाणी उभे राहणे हा पायंडाच अनिष्ट आहे दोन ठिकाणचे प्रतिनिधित्व जर एकव्यक्ती करू शकत नाही तर तिने दोन जागा कशासाठी लढवावयाच्या ? दोन्ही ठिकाणी विजयी झाल्यावर तिला एक जागा सोडावीच लागणार आणि तेथे पुनः निवडणूक घ्यावी लागणार ? निवडणूक खर्चाचा हा भुर्दंड कशासाठी ? उमेदवाराला *एकापेक्षा अधिक जागासाठी* उभे राहता येणार नाही अशी दुरुस्ती निवडणूक कायद्यातच करायला हवी आणि अशी दुरुस्ती होईपर्यंत राजकीय पक्षांनीच हा सकेत पाळायला हवा. पण राजकीय पक्षात त्यावर एकमत होण्याची शक्यता दिसत नाही. किंवा त्यादृष्टीने कोणी विचारही करीत असल्याचे दिसत नाही.

इंदिरा गांधीविरुद्ध दोन्ही ठिकाणी जोरदार लढत तर द्यावयास हवीच. मेडक हा 'सुरक्षित मतदार संघ, असल्याने तेथे लढत देणे अधिक कठीण आहे. तेव्हा रायबरेलीवर अधिक शक्ती केंद्रित करायला हवी. लोकदलाने जनतापक्षाशी समझोता न करता दोन्ही ठिकाणी आपले उमेदवार उभे केले आहेत. या दोन पक्षाची मने दिभा-

गली जाण्याचा फायदा इंदिरा गांधीनाच मिळणार आहे. लोकदलाच्या आपल्या बळाबद्दल अवास्तव कल्पना आहेत. आमचाच उमेदवार इंदिरा काँग्रेस व जनता या दोघाचाही पराभव करून निवडून येईल असे लोकदलाचे नेते म्हणत आहेत व जनता उमेदवारानेच माघार घ्यायला हवी असे सुचवीत आहेत. आंध्रमध्ये तर त्यांच्या पक्षाला काहीही स्थान नाही मग मेडकमध्ये उमेदवार त्यानी कशासाठी उभा केला? गेल्या वेळी रायबरेलीमध्ये राजनारायण निवडून आले ते भालोदचे म्हणून नव्हेत तर जनता पक्षातल्या सर्व घटकानी त्याच्या विजयासाठी आपले बळ एकवटले होते. तेव्हा स्वत:च्या सामर्थ्याबद्दल भलते अंदाज बांधण्यात लोकदलाचे नेते आत्मवंचना तर करीत आहेतच पण लोकशाहीवादी शक्तीची हानी करीत आहेत.

उत्तरप्रदेश हे भारताचे सर्वात मोठे राज्य. लोकसभेवर त्याच्या ८५ जागा आहेत. या राज्याने देशाला तीन पंतप्रधान आणि एक हंगामी पंतप्रधान दिला. मोरारजीभाईंच्या राजवटीचा दोन वर्षांचा काळ सोडला तर तर बाकी सर्व काळ उत्तर प्रदेशात ज्याचे राज्य त्याच्याच हाती दिल्लीची सत्ता असे नेहनी घडत आलेले आहे. त्यामुळेच तेथल्या निवडणुकाना महत्व आले आहे देशातले हे सर्वात मोठे राज्य आणि तेथे उमेदवारही सर्वात जास्त आहेत. ८५ जागांसाठी १००३ उमेदवारात लढत आहे. १९७७ मध्ये फक्त ४४३ उमेदवार उभे होते. सबंध देशाचेच नव्हे तर जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या रायबरेलीमध्ये २६ उमेदवारात लढत असून त्यापैकी २३ अपक्ष आहेत. श्रीमती इंदिरा गांधी विरुद्ध राजमाता विजयाराजे शिंदे यांच्यातच खरा सामना आहे. लोकदलाने नियोजन खात्याचे राज्यमंत्री महिपालसिंग शास्त्री याना उभे केले नसते तर तो अधिक चुरशीचा झाला असता. अमेठीमध्ये ११ उमेदवारात लढत आहे संजय गांधीचा गेल्या वेळी पराभव करणारे रवींद्र प्रतापसिंग जनतातर्फे उभे आहेतच पण लोकदलानेही उमेदवार उभा केल्याने मते विभागली जाण्याची शक्यता आहे.

१९७१ ची निवडणूक इंदिरा लाटेमुळे तर १९७७ ची निवडणूक इंदिराविरोधी जनतालाटेमुळे गाजली. इंदिरा गांधीचे बळ वाढत असल्याचे दिसत असले तरी यावेळी कोणत्याच बाजूने जोरदार लाट आहे असे म्हणता येणार नाही. यावेळच्या निवडणुकाची तुलना १९६७ च्या निवडणुकांशी काहीशी करता येईल. १९६७ मध्ये काँग्रेसने ८५ पैकी ४८ जागा जिंकल्या होत्या व मते ३३·०४ टक्के मिळविली होती. १९७१ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या जागा ७३ पर्यंत वाढल्या व मते ४८·५६ टक्के मिळाली होती. म्हणजे इंदिरालाटेच्या काळातसुद्धा उत्तर प्रदेशातील बहुमत काँग्रेसविरोधीच होते. १९७७ मध्ये काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही तरी त्या पक्षाने २५ टक्के मते मिळविली होती हे लक्षात घेतले पाहिजे. आता १९७९ चा कौल काय राहील? १९७१ एवढे तर नाहीच पण १९६७ एवढे यशही इंदिरा काँग्रेसला मिळण्याची शक्यता नाही. पण १९७७ एवढा मोठा पराभवही तिचा होणार नाही साधारणपणे तीस टक्के मते व २५ ते ३० जागा इंदिरा काँग्रेस मिळविण्याची शक्यता आहे आणि हे यश मुख्यत: इंदिरा काँग्रेसविरोधी मते विभागली गेल्याने मिळण्याचा संभव आहे. १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेसने जिंकलेल्या ४८ जागापैकी ४३ जागा पन्नास टक्क्यापेक्षा कमी मतानी जिंकल्या होत्या. विरोधी पक्षाची आघाडी किंवा युती असती तर यापैकी बऱ्याच जागा ते मिळवू शकले असते. यंदाच्या निवडणुकीत ८५ पैकी ८४ जागासाठी इंदिरा काँग्रेस, जनता व लोकदल यांच्यात तिरंगी लढत आहे. जनता पक्ष आणि लोकदल यांच्यात मते विभागली गेली तर इंदिरा काँग्रेसला त्याचा फायदा मिळणार हे उघड आहे तसे होऊ द्यावयाचे नाही. इंदिरा काँग्रेसला मते द्यावयाची नाहीत, तशीच जनता पक्ष फोडणाऱ्या लोकदलालाही द्यावयाची नाहीत हा निर्धार मतदार कितपत दाखवितात यावर निवडणुकीचे भवितव्य ठरणार आहे.

रायबरेलीमध्ये १९६७ च्या निवडणुकीत इंदिरा गांधीनी प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवारापेक्षा ९१ हजाराची आघाडी मिळविली होती. १९७१ मध्ये राजनारायण याच्याविरुद्ध हीच आघाडी आणखी वीस हजार मतानी वाढली त्याच राजनारायणानी १९७७ मध्ये इंदिरा गांधीचा ५५ हजार मतानी पराभव केला पण यावेळी त्यांना विजयाची खात्री वाटत नाही म्हणूनच ते तेथून उभे नाहीत. इंदिरा विरोधी मत विभागले न जाता विजयाराजेंच्या मागे एकवटले तरच चुरशीच्या लढतीची शक्यता आहे. १९६७ मध्ये इंदिरा गांधीविरुद्ध राजकीय पक्षापैकी फक्त कम्युनिस्ट उमेदवार उभा होता त्याला चौथ्या-पाचव्या क्रमाकाची मते मिळाली. १९७१ व १९७७ मध्ये राजनारायण यांच्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्रमुख पक्षाचा उमेदवार त्यांच्याविरुद्ध उभा नव्हता. इंदिराविरोधी वातावरण तेथे अजून कितपत तीव्र आहे याचा निर्णय यावेळी लागावयाचा आहे. जून १९७७ च्या विधानसभा निवडणुकात रायबरेली लोकसभा मतदारसंघाच्या कक्षेत येणाऱ्या बहुसंख्य जागा काँग्रेसने जिंकल्या, यावरून लोकमत काँग्रेसकडे झुकण्याचा निष्कर्ष काढला जातो पण व्यक्तिश: इंदिरा गांधीविरुद्ध ते अजून कितपत तीव्र आहे याचा कौल यावेळी लागावयाचा आहे. □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# निवडणुका, सद्यःस्थिती आणि आपले विचारवंत-साहित्यिक

## मुलाखती

शब्दांकन : सतीश कामत, राजा दीक्षित

## आमच्या एरंडवणा भागात आम्ही कामाला सुरुवातही केलेली आहे.

### प्रा. अ. भि. शहा

विचारस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य यांची मुख्य गरज साहित्यिक-विचारवंतांनाच असते. त्यामुळे त्यांनी जरी समाजाचा विचार केला नाही तरी स्वतःच्या हिताच्या दृष्टीने सुद्धा महत्त्वाच्या राजकीय घडामोडींबद्दल भूमिका घेणे त्यांना क्रमप्राप्तच आहे असं माझं मत आहे.

'समाजातील कोणत्याही सार्वजनिक प्रश्नाबाबत विचारवंतांकडून नेहमीच निष्पक्षपाती भूमिकेची अपेक्षा असते. कारण त्यांना त्यांच्या व्यवसायाची अशी एक शिस्त असते, वरवरच्या स्वरूपावर भाळून न जाता मूलगामी विचार करण्याची सवय असते. त्यामुळे कोणत्याही सार्वजनिक प्रश्नाचा सांगोपांग विचार करून विचारवंतांनी स्वतःची भूमिका स्पष्ट केली पाहिजे. त्यातही जे धोरणविषयक प्रश्न असतील, देशाच्या आर्थिक किंवा शैक्षणिक समस्यांचा विचार असेल तेव्हा विचारवंतांचा उपयोग होऊ शकेल, पण माणसाचे मन उमजून घेण्याची प्रतिभा साहित्यिकांना असते. त्यामुळे समाजाची गती यासारखे प्रश्न साहित्यिक किंवा तत्त्वज्ञानी जास्त चांगल्या तऱ्हेने हाताळू शकतील असं मला वाटतं. साहित्यिकांचं हे काम आहे आणि ते त्यांनी सातत्याने केलं पाहिजे.

'साहित्य किंवा कलानिर्मिती हेच साहित्यिकांचं कार्यसर्वस्व असतं हे म्हणणं मला संकुचित वाटतं, चूक वाटतं, ढोंगीपणाचं वाटतं. कारण आपली साहित्यनिर्मिती प्रकाशात आणण्यासाठी यांच्या समाजाकडूनही काही अपेक्षा असतातच. समाजाकडून अनेक प्रकारच्या सेवाही साहित्यिक-कलावंत घेत असतात. त्यामुळे ते समाजाचंही काही तरी देणं लागत असतातच.'

'आज काही साहित्यिक असं म्हणताना दिसतात की, येत्या निवडणुकीत काही करावेसे वाटतच नाहीं, काही मूडच येत नाही. ही प्रतिक्रियाही चूक आहे असं मला वाटतं. कारण आज प्रश्न आवडी-निवडीचा नाही, आवश्यकतेचा आहे. येत्या निवडणुकीचा संदर्भ १९७७ पेक्षा वेगळा आहे हे मला मान्य आहे पण गेल्या निवडणुकीतील धोका अजून कायमच आहे. इंदिरा गांधींचा धोकाही अजून नाहीसा झालेला नाही. निष्ठांचं केंद्र कमकुवत झालं, नष्ट झालं तर कदाचित लष्करी सत्ता येईल, परकीय सत्ताही साधतील. तेव्हा हे सर्व धोके टाळण्यासाठी साहित्यिक-विचारवंतांनी पुन्हा एकवार येत्या निबडणुकीत सहभागी होण्याची आवश्यकता आहे. काही वेळा असं होतं की हे सर्जनशील कलाकार स्वतःवरच निहायत खूष असतात. थोडीशी आत्मप्रेमी-narcissistic-वृत्ती त्यांच्यामध्ये असते. त्यामुळे मग ते माझा मूडच नाही, कोणाला मत द्यावंसं वाटतच नाही असं काही तरी म्हणायला लागतात. पण हे योग्य नाही. साहित्यिकांनीही पुन्हा एकवार कंबर कसून उभे राहण्याची आज आवश्यकता आहे. कारण त्यांच्या बोलण्या-लिहिण्याचा एक निराळाच प्रभाव जनसामान्यांवर पडत असतो आणि त्याचा उपयोग साहित्यिकांनी करून घेतला पाहिजे.

'याच संदर्भात आणखी एक मुद्दा स्पष्ट करावासा वाटतो.

समाजात प्रत्येकाला दोन पातळ्यांवर स्वतःच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. स्वतःच्या व्यवसायाची निष्ठा, व्यवसायाची बांधिलकी प्रत्येकालाच असते. पण त्याच बरोबर समाजातील एक नागरिक म्हणून काही जबाबदारी समाजात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर येत असते. आणि ही जबाबदारी जशी गृहिणीला असते तशीच ती शास्त्रज्ञालाही असते. कारण कोणतीही व्यक्ती मूलतः नागरिक असतो. हे नागरिकत्व जर नष्ट झालं तर काहीच उरणार नाही. म्हणून प्रत्येकाने या दोन्हीही जबाबदाऱ्या सातत्याने व कसोशीनं पार पाडणं आवश्यक असतं.

'येत्या निवडणुकीबद्दल माझी स्वतःची भूमिका स्पष्ट आहे. मी जनता पक्षाला पाठिंबा देणार आहे. कारण मी माझ्या दुष्मनांचा क्रम लावला आहे. इंदिरा कॉंग्रेस हा माझा पहिल्या क्रमांकाचा दुष्मन आहे. जनता पक्षाचा कोणी उमेदवार पुण्यात उभा राहिला नसता तर मी अरस कॉंग्रेसच्या उमेदवाराला मतं दिलं असतं, लोकदलाच्या उमेदवाराला मतं दिलं असतं. नानासाहेब गोऱ्याऐवजी नानाजी देशमुख पुण्यातून उभे राहिले असते तर त्यांना मी मत दिलं असतं. कारण 'इंदिरा विरोध' हे माझ्या भूमिकेचे मुख्य सूत्र आहे. आता जनता पक्षाचं मुस्लिमधार्जिणं धोरण मला मान्य नाही, त्या बाबतीत मी त्या पक्षाच्या नेत्यांशी भांडेनही पण मतही त्यांनाच देईन. कारण जनता पक्ष जर सत्तेवर आला तर मला किमान मतपरिवर्तन करण्याची तरी संधी मिळू शकेल. शेवटी निवड 'चांगलं आणि वाईट' यातून करायची नसते तर 'वाईट आणि कमी वाईट' यातून करायची असते. चोरामध्येसुद्धा काही प्रतवारी असतेच की!

'कोणताच उमेदवार लायक वाटला नाही तर मतदानावर बहिष्कार टाकण्याची सूचनाही मला मान्य नाही. कारण दोघा-चौघांनी अशा तऱ्हेने बहिष्कार टाकण्यामुळे निवडणूक थांबवता येत नाही त्यातून नकळत अनिष्ट शक्तींना वाव मिळतो. मतदानावर बहिष्कार टाकण्यामागे मी 'नालायक' उमेदवारास मत देण्याच्या पापात सहभागी होणार नाही, हा जो व्यक्तिकेंद्रित दृष्टिकोण असतो तो दृष्टिकोण मला योग्य वाटत नाही. शिवाय कोणाचीही लायकी ठरवणं अवघडच असतं. त्यामुळे मी असे म्हणेन की, आपण काही निकष निश्चित करावेत आणि ते निकष लावले असता जो उमेदवार सगळ्यात कमी नापास होईल त्याला मत द्यावं. पण मतदानच न करण्याचा एकांतिक मार्ग मला मंजूर नाही.

'जनतेमधील हा आळस, औदासीन्य जावं म्हणून आम्ही प्रयत्नही करत आहोत. त्याच दृष्टीने न्या. वि. अ. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाहीसंवर्धक समन्वय समितीची स्थापना आम्ही केली आहे. एरंडवणा भागात या समितीचं काम सुरू झालेलं आहे आणि मी स्वतःही त्यामध्ये यथाशक्ती भाग घेत आहे. समितीचे संयोजक सागतील तिथे जाऊन सामान्य जनतेमध्ये जागृतीचं कार्य करत आहेत.' ●

# माझा मुख्य भर गटागटांमध्ये जाऊन चर्चा करण्यावर असेल....

## डॉ. विद्याधर पुंडलिक

डॉ. विद्याधर पुंडलिक आजचे एक नामवंत साहित्यिक आणि पुणे विद्यापीठातील समाजशास्त्राचे प्राध्यापक आणीबाणी-नंतरच्या निवडणुकांत त्यांनी हुकूमशाहीविरोधी भूमिकेतून जनता पक्षाचा प्रचार केलेला. नुकताच 'सकाळ'मध्ये संघ, जनसंघ, सेवादल, समाजवादी या विषयांवर पुंडलिक-पाध्ये वाद गाजलेला. तेव्हा मुलाखतीच्या विषयावर त्यांच्याशी बोलणे महत्त्वाचे होते. बोलण्याची त्यांची एक ठराविक पद्धत आहे. ते अगदी शांतपणे आणि सौम्यपणे विचार मांडतात मधेच थोडं थांबून चष्म्यामागे चमकणारे डोळे मिटतात. क्षणभर विचार करतात. आणि मग पुन्हा किंचित नाकात बोलू लागतात. बोलण्यात पुरेशी तळमळ आणि गांभीर्य.

'सकाळ'मधल्या डॉ. पुंडलिकांच्या एका विधानापासूनच मुलाखतीला सुरुवात केली—

**"सध्याच्या राजकीय परिस्थितीबद्दल आपल्याला काय वाटते? 'या परिस्थितीमुळे मी सुन्न आणि थक्क झालो आहे' असे जे आपण 'सकाळ'मधील लेखात म्हणता ते कशामुळे?"**

"मी खिन्न आणि थक्क झालो. कारण प्रथमच असं जाणवलं की, ही आपत्ती कुठेतरी सांस्कृतिक आणि नैतिक आहे. केवळ राजकारणापुरतीच ती मर्यादित नाही. शेवटी राजकारण हा एक क्रूर खेळ आहे, हे मान्य आहे. तरीही असं राजकारण खेळलं जाऊ नये की, 'Politics is the last resort of the scoundrels' असं जे म्हणतात ते सिद्ध व्हावं! पूर्वीसुद्धा नेहरू-पटेल यांचे तीव्र मतभेद होते; पण ज्या पद्धतीने आज चरणसिंग जगजीवनराम यांच्यावर किंवा राजनारायण सुरेशकुमारवर टीका करतात, तसे ते नव्हते. नेहरू-पटेल यांच्या पत्रात एकमेकांविषयी अनेक प्रकारे आणि मूलभूत स्वरूपाचे मतभेद व्यक्त झालेले आहेत; पण त्यांनी एकमेकांना सांभाळूनही घेतले. ते दिवस आज राहिले नसले, तरी राजकारणाला इतके अनैतिक स्वरूप येईल असे वाटले नव्हते. गांधी नेहरूंपर्यंत जी सभ्यता पाळली जात होती, ती आता दिसत नाही. ह्या विनाशाची गतीही प्रचंड आहे!

"दुसरा भाग असा की, मी स्वातंत्र्यपूर्व काळातील पिढीतला आहे. राजकीय ध्येयवादाला तेव्हा एक सांस्कृतिक बैठक होती. व्यापक अशा सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे राजकारण्याला अंग होते. अशा वातावरणात मी वाढलो जुने नेते निश्चित, ठाशीव बोलताहेत असे वाटत असे त्यांच्या बोलण्यामागे काहीएक भरभक्कम विचारसरणी होती. आता तेव्हाचा ध्येयवाद संपुष्टात येण्याचे एक स्पष्टीकरण असे दिले जाते की, या ध्येयवादाचे दिवस आता संपले!

हे पटत नाही. आपल्या अत्यंत गरीब आणि विषमताप्रधान देशात ध्येयवादाचा लोप ही गोष्ट नैसर्गिक मानली जावी, हेच मला अतिशय अनैसर्गिक वाटते ! आघाडयाचे राजकारण हे एकच वास्तव आज राजकारणात उरावे याची मला अतिशय खत वाटते. तेही चालले असते, पण त्याचा पाया अकार्यक्षमता हाच आहे आणि तो डगमगता आहे !",

**"ह्या परिस्थितीची आपल्या दृष्टीने कारणे कोणती ? समाजशास्त्राचे एक प्राध्यापक या नात्याने आपल्याला असे वाटत नाही का, की ह्या स्थितीला आपली समाजव्यवस्था कारणीभूत आहे ? ह्या परिस्थितींची जबाबदारी विशिष्ट व्यक्तींवर टाकता येईल का? विचारवंत आणि तज्ज्ञ यांच्या उदासीनतेमुळे ह्या परिस्थितीला हातभारच लागलाय असे म्हणता येईल का ?"**

"हे सगळं दुखणं समाजव्यवस्थेत लपलेलं आहे हे खरं आहे. ह्या दुर्दशेचं उत्तर काही प्रमाणात तरी समाजव्यवस्थेत शोधता येईल. भारतीय समाजव्यवस्थेचं सर्वांत अपूर्व वैशिष्टय म्हणजे कमालीची गटनिष्ठता. अत्यंत फुटीर किंवा विविध प्रकारच्या तुकडयातुकडयांत विखुरलेला असा हा समाज आहे. इतके विविध प्रकारचे गट असलेला दुसरा समाज जगात कोणताही नाही! ह्या गटांना छेदून जाईल असा व्यापक स्वरूपाचा ध्येयवाद आणि तो साकार करणारा राज्यकर्त्यांचा वर्ग आपल्याकडे नाही. तत्वतः हा राजकीय ध्येयवाद समाजवाद किंवा राष्ट्रवाद ह्या स्वरूपात नेहमी मांडला जातो. पण त्यासाठी लागणारे एकवटलेले सामर्थ्य आपल्या राजकारणात नाही. इथे राजकीय आणि आर्थिक शक्ती एकवटत (मोबिलाइझ होत) नाहीत. कारण आपले राजकारण गटजीवनात अडकलेले आहे. तडजोडी, समझोते या मार्गाने राजकारण चाललेले आहे. ते चालणे अपरिहार्य आहे, पण त्यात कुठे हुशारी आणि तडफ नाही. आहे तो नुसता स्वार्थ !'

'समाजव्यवस्थेबरोबरच व्यक्ती, त्यांची गटबाजी आणि नेतृत्व ही कारणे आहेतच. अलीगढ विद्यापीठाबाबत कोणताही पक्ष चोख भूमिका घेऊ शकत नाही. इमामकडे कोणत्याही राजकीय नेत्याने जाऊ नये हा संकेत आपल्याकडे का रूढ होत नाही ? हे एक दुष्ट चक्र आहे. सत्तेवाचून राजकारण नाही आणि सत्तेच्या खेळात तत्त्वशून्य तडजोडी कराव्या लागतात ! पण ह्याला लक्ष्मणरेषा का घातली जात नाही ? ठाम निर्णयांखेरीज हा अधःपात टाळता येणार नाही. आज साम्यवाद्यांनासुद्धा या जातीय, प्रादेशिक अन् भाषिक गटनिष्ठतेपुढे शरण जावे लागते ! निखळ आर्थिक पायावर आणि वर्गसंघर्षावर ह्या चळवळी सुद्धा उभ्या राहू शकल्या नाहीत. म्हणूनच एकेकाळचे 'कुलक' आणि प्रतिगामी चरणसिंग आज कम्युनिस्टांच्या दृष्टीने एका महिन्यात पुरोगामी ठरतात !

"आपल्याकडे प्रतिभाशाली नेतृत्वाचा अभाव आहे. विचारप्रणाली ( ideology ) आणि डावपेच ( strategy ) यांचा तोल साधणारं, मिश्रण करणारं नेतृत्व आपल्याकडे नाही. नेहरूंचे व्यक्तिमत्त्व केवळ ध्येयवादी नव्हते, तर फार सूक्ष्म रीतीने डावपेच आखणारेही होते. त्यांच्या आतरराष्ट्रीय राजकारणात एक मोठी विचारसरणी, तारतम्य आणि डावपेचाचा मिलाफ दिसतो. पण आज त्याचा अभाव आहे. इंदिरा गांधी स्ट्रॅटेजिस्ट आहेत, पण त्यांना विचारप्रणालीचे सोयरसुतक नाही ! तर समाजवादी आणि जनसंघीयाजवळ वैचारिक पीळ आहे, पण डावपेचाचा अभाव आहे ! आपल्या नेतृत्वात कार्यक्षमतेचाही अभाव आहे. ते नोकरशाहीची चौकट फोडून जाऊ शकत नाही.

"सध्याची जी 'दुसरी आणीबाणी' आहे ती पहिलीपेक्षा भयंकर आहे. कारण पहिल्या आणीबाणीत निदान आम्हाला काहीतरी ध्येय होतं. भविष्यात कशासाठी लढायचं याची जाणीव होती. पण आता राजकीय ध्येयच अनिश्चिततेच्या धुक्यात हरवल आहे. सर्वांत भयकर गोष्ट म्हणजे आर्थिक विकासाच्या क्षेत्रात एक कमालीची दिशाशून्यता आलेली आहे. आणीबाणीत निदान अशी दिशाशून्यता तरी नव्हती. मन निराश झालेले होते, पण खचलेले नव्हते. आज मात्र कमालीची दिशाशून्यता आहे आणि तिचे एक प्रकारचे बौद्धिक समर्थन सुरू झालेले आहे ! आघाडयाचे राजकारण केवळ निवडणुकापुरते असून त्यातून ध्रुवीकरण होईल अशी गेल्या दहा वर्षांची घोषणा होती. पण तसे काही झाले नाही. अगदी डावेसुद्धा आपापसात फुटलेले आहेत. आज पुन्हा निवडणुकानतर ध्रुवीकरणाची भाषा केली जाते ! पण खरं म्हणजे घटकवादातून आज कोणीही सुटत नाही, अगदी जनसंघसुद्धा ! हा घटकवाद आणि चरणसिंग-गटाची महत्वाकांक्षा आजच्या परिस्थितीला कारणीभूत आहे. चरणसिंग आणि 'फोडक' समाजवादी हे माझ्या दृष्टीने आरोपी क्रमांक एक आहेत ! आजच्या राजकारणापाठीमागे प्रामाणिक, तत्त्वनिष्ठ विचारसरणीचा अनिवार्य संघर्ष नाही. तसं असतं तर बरं झालं असतं, पण ते दिसत नाही.

'हिंदू जातीयवाद आणि मुस्लिम जातीयवाद याकडे आपण एकाच भूमिकेतून बघितले पाहिजे. पण ते न करता मुस्लिम आणि ख्रिश्चन याचा आज अनुनय चालला आहे. वास्तविक हे प्रश्न आणि निधर्मीपणाचा प्रश्न काही नवीन नाहीत. पण ते आधुनिकीकरणाच्या संदर्भात महत्त्वाचे आहेत. ह्या प्रश्नाच्या बाबतीत सरकारच्या कार्याला काही मर्यादा पडतात. एका व्यापक सास्कृतिक प्रक्रियेतून हे प्रश्न सुटू शकतील. आज आर्थिक विकास हा जीवनमरणाचा लढा झाला आहे आणि जर आर्थिकविकास झाला नाही, जर हा प्रश्न येत्या दोन दशकात सोडवला गेला नाही, तर समाज व राष्ट्र म्हणून आपले अस्तित्व धोक्यात येईल, हे लक्षात घ्यायला हवे. तेव्हा अर्थविकासाच्या प्रश्नाकडे लक्ष दिले जाऊ नये आणि जातीयवादाचे डावपेच खेळले जावेत हे दुर्दैव आहे. फोडक समाजवाद्यांचा राग येतो तो यामुळेच. पहिले काय, दुसरे काय, याचा विवेक इतका कसा निसटून जातो ?

'मला आपल्या नेतृत्वाची उंची इतर अविकसित राष्ट्रांतील नेतृत्वापेक्षा आजपर्यंत कधी खिटी वाटली नव्हती. पण गेल्या पाच वर्षांत मात्र नेतृत्वाची पातळी फार खाली आली आहे ! वास्तविक जनता पक्षाचे सरकार चागले होते. वैयक्तिक माणसे पाहिली तर १९५० नंतरचे नेहरू सरकार सोडता जनताचे सरकारच उत्कृष्ट होते. बुद्धिमत्ता, चारित्र्य, ध्येयवाद ह्या दृष्टीने चांगले असे नेते जनता पक्षाकडे होते. पण असे असूनही हे सगळे पुन्हा नष्ट झाले. पहिले काय आणि दुसरे काय हा विवेक पूर्णपणे सुटत गेला ! यानेही मी सुन्न झालोय.

'विचारवंत आणि तज्ज्ञ हे चांगलेच उदासीन आहेत. आपल्या लोकशाहीच्या उभारणीच्या दृष्टीने गतकाळात काही चांगल्या कल्पना मांडल्या गेल्या होत्या. उदा० मानवेंद्रनाथ रॉय याची खालून वर पिरॅमिडप्रमाणे लोकशाही बांधत नेण्याची कल्पना किंवा जयप्रकाशांची दक्षता समित्यांची कल्पना. पण अशा कल्पनाबाबतही विचारवंत उदासीन राहिले. झपाट्याने बिघडलेल्या परिस्थिती-प्रमाणेच विचारवंत आणि तज्ज्ञ याची संवेदनाशून्य वृत्तीही चिंतेचीच गोष्ट आहे. क्रियाशीलता तर सोडा, पण कमीत कमी याबाबतची संवेदनाशीलता का जावी ? वास्तविक लोकशाही हा अखंड पहारा आहे, पापणीसुद्धा मिटू न देता करायचा पहारा आहे. त्यातून सामान्य माणसं रोजच्या जीवनात भरडली गेल्याने उदासीन असतातच. पण म्हणूनच एका दृष्टीने विचारवंतांचे हे संवेदनाशून्य औदासिन्य अक्षम्य मानले पाहिजे.'

**'सध्याच्या परिस्थितीत, विशेषत: निवडणुकीबाबत तुमची काही विशिष्ट भूमिका आहे का ? गेल्या निवडणुकीत तुम्ही जनता पक्षाचा प्रचार केला होतात. आज तुम्हाला भ्रमनिरास झाल्यासारखे वाटत नाही का ?'**

'पूर्णपणे भ्रमनिरास झाल्यासारखे काही मला वाटत नाही. कारण जनता पक्षाच्या कामगिरीतील काही गोष्टी मी उल्लेखनीय मानतो. लोकशाहीची प्रस्थापना जनता पक्षाने केलीच. जनता पक्षाच्या कामगिरीबद्दल बोलायचे तर जॉर्ज फर्नांडिस याचे लोक-सभेतील भाषण पुरेसे आहे ! आज असलेल्या आघाड्यांत जनता पक्षाची आघाडी टिकावी असे वाटते. कारण या देशाचे राजकारण आणि अर्थकारण दिवसेंदिवस डाव्या अंगानेच जाणे अपरिहार्य आहे, याची प्रचीती आलेले लोक आणि ज्यांच्याजवळ चारित्र्य, उत्तम संघटना आणि शिस्त आहे असे परिवर्तनशील लोक या आघाडीत एकत्र आलेले आहेत. आज जनसंघसुद्धा बदलतोय यात काहीही शंका नाही ! आता आपण उजवे राहू शकत नाही ही जाणीव जनसंघातही हळूहळू पण निश्चितपणे येत चाललेली आहे आणि राज्यकर्ते व स्थानिक-प्रादेशिक कार्यकर्त्यांचा सच यात दुवा हवा हे आता सगळ्यांना कळून चुकले आहे. तेव्हा सध्याचे राजकारण हे काही केवळ पुस्तकी सिद्धांतांनी समजून घेता येणार नाही. पक्ष बदलत चाललेले आहेत आणि आपण त्याचा जास्तीत जास्त फायदा घेतला पाहिजे.

'त्यातल्या त्यात चांगल्या आणि खरोखरच बदलत चाललेल्या जनता पक्षाला पाठिंबा द्यायला हवा. मी या पक्षाचा जमेल तेवढा प्रचार करणार आहे. अर्थात मी काही मोठ्या सभा गाजवणारा वक्ता नव्हे. त्यामुळे माझा मुख्य भर गटागटामध्ये जाऊन प्रचार करण्यावर असेल. विशेषत: ख्रिश्चन आणि मुस्लिम यांच्याशी या निमित्ताने मला बोलता आले तर मला बरं वाटेल. तडजोडवादी राजकारणाचा भयानकपणा अल्पसंख्यांकांनाही पटवून दिला पाहिजे. राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहाशी समरस होऊनच स्वत:ची अस्मिता टिकवणे हे योग्य आहे. अस्मिता म्हणजे फुटीरपणा नव्हे. अल्पसंख्यांकांना प्यादी म्हणून वापरले जाते. हे सगळं त्यांच्याशी बोलायला हवं असं मला वाटतं.'

# जनता पक्षाच्या सर्वच गोष्टींशी मी सहमत नसलो तरी...

## डॉ. सत्यरंजन साठे

आजच्या राजकीय परिस्थितीमुळे आज जो तो व्यथित झालाय. पुण्याच्या लॉ कॉलेजचे प्राचार्य श्री. सत्यरंजन साठे यांच्याशी बोलताना मात्र तसे जाणवले नाही. आजच्या परिस्थितीतल्या संकटांची स्पष्ट जाणीव असली तरी खचलेपणाच्या भावनेचा माग-मूसही नाही. एकूणच उल्हसित व्यक्तिमत्त्व. बोलण्यात आत्मविश्वास. प्रश्नाचे चट्कन मिळणारे उत्तर. विचार कुठेतरी ठाम आणि सच्चे.

प्राचार्य साठ्यांची मुलाखत घेण्यापूर्वी सरदार, पाध्ये, पुंडलिक वगैरेंच्या मुलाखती घेऊन झालेल्या होत्या. त्यामुळे प्रश्न अगदी कसे जिभेवर नाचत होते. आजच्या राजकीय परिस्थितीबद्दलचे आपले मत ? आपण व्यथित झाला आहात काय ?...ह्या परिस्थितीची कारणे ?.. विचारवंतांची उदासीनता आणि जबाबदारी...वगैरे प्रश्न. सुदैव एवढेच की प्रश्नांना या मंडळींकडून मिळणाऱ्या उत्तरा-मध्ये थोडातरी वेगळेपणा होता. प्रत्येकाची प्रश्नाकडे बघण्याची दृष्टी वेगळी, प्रत्येकाचा एखादा तरी नवा आणि चांगला मुद्दा, प्रत्येकाची वेगवेगळी मांडणी...

तर प्राचार्य साठ्यांचं म्हणणं असं,

'ही अतिशय अवघड अशी परिस्थिती आहे. गोंधळाची परिस्थिती आहे. सध्या कसोटीचाच काळ आहे. पण मी अजिबात व्यथित झालेलो नाही. कारण माणसाला जसं आयुष्यात बऱ्या, वाईट सर्वच प्रसंगांना तोंड द्यावं लागतं, तसंच देशाचं किंवा समाजाचंही आहे ! समाजाला अशा विशिष्ट कालखंडातून जावंच लागतं. आपण आज-पर्यंत फार प्रोटेक्टेड राहिलेलो आहोत. त्यातून बाहेर पडून परिपक्व होण्याचा हा काळ आहे. तेव्हा व्यथित होण्यापेक्षा जास्त धैर्याने ह्या परिस्थितीला सामोरे जाऊन येथे प्रबोधन चालू ठेवायला हवे. लोकशिक्षण व्हायला हवे. आपण राजकारण्यांना दोष देतो, पण ते वाईट आहेत, कारण आपण वाईट आहोत !

नेहरूंच्या राजकारणात एकच महत्त्वाचा पक्ष होता. विरोधी पक्ष त्याला पूरक वागत. ते दबाव गट म्हणून काम करत. नेहरूंचे धोरण विरोधी पक्षालाही बरोबर घेऊन जाण्याचे होते. रजनी कोठारी यांनी अशा राजकारणाचे वर्णन 'कॉन्सेन्ससचे पॉलिटिक्स' असे केले आहे. भारतासारख्या पक्ष–परंपरा नसलेल्या देशात असे राजकारण उपयोगी पडते. पण इंदिरा गांधींच्या राजकारणापासून असे राज-कारण संपले. त्याला संघर्षात्मक स्वरूप आले. इंदिरा गांधींनी आपली धाडसी, पुरोगामी, जहाल अशी प्रतिमा तयार केली. गरिबी हटावसारख्या घोषणा दिल्या. मात्र एकतर त्यांच्याकडे खऱ्या अर्थाने कार्यक्रम नव्हता आणि दुसरे म्हणजे त्यांच्या पदरी कल्पक लोकही नव्हते. शिवाय जुना काँग्रेस पक्ष फुटून नवा आला, तेथून राष्ट्री-

साधू राजकारण सुरू झाले आत्ताच्या कालखंडात मोठ्या पक्षाची जागा घेणारा तसाच पक्ष वा गट तयार होत नाही आहे. सध्या नव्या घडणीची अवस्था आहे. आणि आत्ता प्रश्न तर खूप मोठे आहेत.

सध्या दोन गट हुकूमशाहीला अनुकूल आहेत. उजव्या प्रवृत्तीच्या भांडवलदार किंवा श्रीमंत लोकांना हुकूमशाही आवडते. तर दुसरा काही मूर्ख मध्यमवर्गीयाचा पलायनवादी वर्गही हुकूमशाहीला अनुकूल आहे. ह्या वर्गाला स्वत:ला कष्ट करायला नकोत. दंगे, संप ह्याचा त्रास त्याला नको असतो. सगळे कसे आयते मिळावे असे मानणारा हा वर्ग असतो. हिंदी सिनेमात जेव्हा अमिताभ बच्चन गुंडाना ठोकून काढतो तेव्हा हा वर्ग टाळ्या पिटत असतो. हा अमिताभ खरा नाही हे त्यांना समजत नाही. इंदिरा गांधीना स्थिर सरकार देता येईल असे मानणे हे असेच चुकीचे आहे.

संघर्ष तयार झाल्यावर ते सोडवण्याची पुरेशी क्षमता आमच्याकडे नाही. तशी असेल तर संघर्षही उपकारक ठरतात. पण येथे मात्र ते वाढवून त्यांचे राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न केला जातो. सध्याची मराठवाड्यातील दलित चळवळ मात्र मला आशादायक वाटते. कारण ती पक्षानी सुरू केलेली नाही. पक्ष काय म्हणतात याचा ती विचार करत नाही. उलट ह्या चळवळीने पक्षाची पंचाईत करून टाकलेली आहे! अशा रीतीने पक्षपद्धतीच्या बाहेर काही शक्ती निर्माण व्हायला हव्यात. त्यातून नवे नेतृत्व तयार व्हायला हवे. काही नेमक्या समस्याना त्याने हात घालायला हवा. हा लढा कार्यक्रमाधिष्ठित असावा. राजकीय डावपेच हे संधीसाधू असतात. ते नैतिक धडे देऊन जाणार नाहीत. त्यासाठी ज्यात लोकांचा खूप सहभाग आहे अशी लोकशाही (पार्टिसिपेटरी डेमॉक्रसी) निर्माण व्हायला हवी. लोक त्यात ओढले जायला हवेत आणि त्यांचा दबाव निर्माण व्हायला हवा.

धर्मनिरपेक्षतेच्या प्रश्नावर आपल्या विचारवंतानी ठामपणे काही तरी बोलायला हवे. एकीकडे मुस्लिम सर्वंकषतावाद आणि दुसरीकडे त्याविरुद्धचा हिंदू पुनरुज्जीवनवाद यातून आपल्या लोकशाहीवर आघात झालेले आहेत. पण याविरुद्ध कोणी बोलत नाही. आमचे राजकीय नेते एकीकडे धर्मनिरपेक्षतेच्या गप्पा मारतात आणि दुसरीकडे निवडणुकीपूर्वी देवळात जातात. हे सुद्धा महात्मा गांधींप्रमाणे श्रद्धेने केलेले नसते, तर लोकानुनयासाठी केलेले असते.

आपल्याकडच्या विचारवंताचा वर्ग हा उदासीन आहे हे नक्कीच. अर्थात महाराष्ट्रात तुलनेने परिस्थिती बरी आहे! पुरोगामी चळवळींना वेळोवेळी येथे आधार मिळत गेलेला आहे. विचारवंतांचा विचार करताना त्याचे दोन वर्ग लक्षात घ्यायला हवेत. त्यातला पहिला वर्ग आहे डॉक्टर, वकील वगैरे सधन मध्यमवर्गीयाचा. अर्थात अशा लोकाना विचारवंत मानले जाते हे दुर्दैव आहे! बुद्धिवाद हा शेवटी मनाचा गुणधर्म आहे अर्थात बुद्धिवाद हा फारसा आपल्या भारतीय परंपरेचा भाग राहिलेला नाही. विद्यापीठीय स्तरावरचे आमचे प्राध्यापक आज आपल्याच राजकारणात गुतलेले दिसतात! एखाद्या प्राचार्याने, 'यावर्षी कोणती चागली पुस्तके वाचली?' असे विचारले तर ज्याना ग्रंथालयाकडे धाव घ्यावी लागते, असे अनेक प्राध्यापक आहेत! विचारवंताचा दुसरा वर्ग चिंतन आणि लेखन करणाऱ्यांचा आहे. त्याच्यात असहायतेची भावना आलेली आहे. त्याला संघटित करून आत्मविश्वास द्यायला हवाय. अर्थात् हे काम जयप्रकाशामुळे थोडेसे झाले होते. या वर्गातील काही लोक धंदेवाईक असतात. ते सामाजिक संदर्भ समजावून घेत नाहीत आणि निव्वळ तांत्रिक पद्धतीचे लिखाण करतात. हे लिखाण समाजाशी नेऊन भिडवणे महत्त्वाचे आहे. तरच त्याच्या ज्ञानाला किंमत आहे. भीती न बाळगता बोलणारे लोक फार थोडे आहेत. त्याचा आणि तरुणाचा संपर्क वाढला तर काही मार्ग निघू शकेल. बऱ्याच विचारवंतांमध्ये विचारांची स्पष्टताच नसते. विचारवंताना सोप्या भाषेत लोकांना सागता आले पाहिजे. विचारवंतांची बांधिलकी मी मानतो. पण ती मूल्याशी असली पाहिजे. त्यानी मूल्याचे प्रचारक बनले पाहिजे. अगदी बहुमताच्या विरोधाचीसुद्धा पर्वा न करता विचार मांडणे आवश्यक आहे.

मुख्य म्हणजे पक्षीय चौकटीच्या बाहेर जाऊन सामाजिक बदल घडवायला हवेत. कारण हे राजकारण्याकडून घडणार नाही. धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय अशा मूल्याला आपण महत्त्व देत नाही. समाजवाद हा मूलत: माणसाकडे बघण्याचा दृष्टिकोण आहे हे लक्षात घेतले जात नाही. आपला समाज अजूनही सरंजामशाही समाज आहे. धड तो भांडवलशाही समाजही बनलेला नाही. इंदिरा गांधीची लेबल लावण्याची पद्धत, किंवा कमलापती त्रिपाठीसारखे नेते ही सरंजामशाहीचीच लक्षणं आहेत. धर्मनिरपेक्षतेसाठी सामाजिक प्रबोधन व्हायला हवे. धर्म म्हणजे कर्मकांड नसून तो त्याहून काहीतरी वरचा आहे, हे आज विसरलं गेलंय. राजा राममोहन रॉय ते मानवेंद्रनाथ रॉय अशी प्रबोधन चळवळ संपून अष्टविनायकाच्या रागेत आमचे तरुण उभे राहू लागलेत, याची मला सगळ्यात भीती वाटते. पूर्वीचे पुढारी बुद्धिवादीही होते. सावरकर कितीही आक्रमक हिंदुत्वनिष्ठ असले तरी हिंदू धर्मावर जोरदार आघातही त्यांनी केले. म. फुले यानी जातीवर किती आघात केले हे आपल्याला माहिती आहे. पण एकंदरीत आपल्याकडे सामाजिक सुधारणांवर पुरेसे लक्ष दिले गेले नाही. तसे झाले असते तर आजची स्थिती उद्भवली नसती. इंग्रज येथून अजून २०-२५ वर्षे गेले नसते तर बरे झाले असते!" आपल्या देशात लोकशाहीबद्दल पुरेसे प्रबोधन झालेले नाही. आपल्याकडे लोकशाही संस्था आहेत, पण लोकशाही संस्कृती नाही. २५ जूननतर दुसऱ्या दिवशी सामसूम का होती? या सगळ्याला आपण आणि आपली सामाजिक स्थिती कारणीभूत आहे. एका इंग्रज विचारवताने अशा अर्थाचे उद्गार काढले होते की, 'हिटलर जर्मनीतच निर्माण होऊ शकला, इंग्लंडमध्ये नाही. कारण आमच्याकडे आम्ही त्याला वेड्याच्या इस्पितळात टाकले असते!' तेव्हा देशाच्या संस्कृतीवर देशाचे नेतृत्व अवलंबून असते. आजच्या परिस्थितीला नुसते काही व्यक्तीनाच जबाबदार धरणे योग्य नाही. अगदी इंदिरा गांधीनासुद्धा. कारण अमुक एक खलनायक आहे असे म्हणणे म्हणजे प्रश्न जादा सोपा करणे आहे. ते काही योग्य नव्हे.

आजच्या परिस्थितीची मुळे 'कल्याणकारी राज्य' ह्या कल्पनेतही आहेत. कल्याण सगळ्याना हवे, पण त्यागाची तयारी नाही! पूर्वी लोक त्यागाला तयार असत; पण आज ते धंदेवाईक बनलेले आहेत. कामगार चळवळीचीही हीच शोकांतिका आहे. ही चळवळ

पगारवाढीसाठी असते; पण राजकीय व्यवस्थेशी ती खऱ्या अर्थाने निगडित नसते."

"आजच्या परिस्थीत तुम्ही काही विशिष्ट भूमिका घेणार का? कोणत्या राजकीय पक्षाचा प्रचार करणार का?" ह्या प्रश्नाला उत्तर देताना प्राचार्य साठे म्हणाले,

"मी एका शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखपदी आहे. त्यामुळे असे काही करणार नाही. संस्थेच्या प्रमुखपदी नसतो तर कदाचित प्रचार केलाही असता. माझी सहानुभूती म्हणाल, तर जनता पक्षाकडेच आहे. अर्थात त्यांच्या सर्वच गोष्टीशी मी सहमत नाही; पण जनता पक्षासारखा दुसरा पक्ष आज नाही. त्यातल्या त्यात चांगला पक्ष तोच आहे. निराशेने कोणालाच मत द्यायचे नाही अशी भूमिका मी घेणार नाही."

# इतरांप्रमाणेच साहित्यिकाचाही राजकारणाशी अपरिहार्यपणे संबंध येतोच...

## श्री. ज. जोशी

'आज-काल निवडणुकीच्या संदर्भातच नव्हे तर कोणत्याही राजकीय-सामाजिक प्रश्नाच्या बाबतीत मराठी साहित्यिक निश्चित भूमिका घेत नाहीत. स्पष्ट बोलायचं तर तशा भूमिका घ्यायला ते घाबरतात. गांधीवधानंतर महाराष्ट्रातल्या मध्यम वर्गामध्ये जे भीतीचं वातावरण पसरले त्यातून मराठी साहित्यिकाचीही सुटका झालेली नाही. अजूनही त्या घबराटीचा फार मोठा परिणाम त्यांच्या मनावर आहे. थोडक्यात, साहित्यिक हा मिडल क्लास मेंटॅलिटीचा भित्रा मनुष्य असतो. म्हणूनच परवाच्या 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये वा. ल. कुलकर्णींचं 'जनता पक्षाला मत द्या' असं आवाहन करणारं पत्र वाचलं आणि लगेच त्यांचं अभिनंदन केलं. कारण इतर साहित्यिकानी न दाखवलेलं धारिष्टच त्यानी दाखवलं आहे. खरं म्हणजे आज अशी वेळ आली आहे की, प्रत्येक साहित्यिकाने पुढं आलं पाहिजे, सध्याच्या राजकीय परिस्थितीवरील आपली मतं, विचार, भूमिका स्पष्ट केल्या पाहिजेत. पण हे होणार नाही.

'साहित्यिक हा फक्त समाजाचा मनोरंजनकर्ता अशी भावना आज सर्वत्र दिसते. एखाद्या नाटक कादंबरीवर अश्लीलतेबद्दल वादंग उठले की, ही सर्व मंडळी चवताळून त्या लेखकाची बाजू घेऊन उभी राहतील. लांबलचक पत्रकं काढतील. भित्र्या नादान लोकांच्या सह्याही गोळा करतील. पण आत्तासारख्या कसोटीच्या क्षणी मात्र कच खातील.

'साहित्यिकांचा राजकारणाशी काहीही संबंध नसतो हे म्हणणं चुकीचं आहे. समाजातील इतर सर्वांप्रमाणेच साहित्यिकाचाही राजकारणाशी अपरिहार्यपणे संबंध येत असतो. पण साहित्यिकाला सरकारी बक्षिसांची चिंता असते. काही निश्चित राजकीय भूमिका घेतली तर बक्षिसावर त्याचा काही परिणाम होईल की काय, अशी भीती त्याच्या मनात असते. त्यामुळे मग तो तोंड मिटून गप्प राहणंच अधिक पसंत करतो. खरं म्हणजे सामान्याला अवगत नसलेली आविष्काराची कला साहित्यिकाजवळ असते. पण शब्दसृष्टीच्या ईश्वराला न शोभणारी लाचार, धंदेवाईक अवस्था त्याला या कलेचा, स्वातंत्र्याचा वापर करू देत नाही. मराठी साहित्यातील फक्त पु. ल. देशपांडे आणि दुर्गाबाई भागवतानी हे धारिष्टय दाखवलं. ही परिस्थिती बदलली पाहिजे. जास्तीत जास्त साहित्यिक अन्यायाविरुद्ध, बेबंदशाहीविरुद्ध लढण्यासाठी उभे राहिले पाहिजेत. आज केवळ कलाकृती निर्माण करून भागणार नाही, त्याला कृतिशीलतेचीही जोड आज आवश्यक आहे.

'स्वातंत्र्यपूर्व काळातील साहित्यिकांमध्ये राष्ट्रवादाची जाण होती. साने गुरुजीसारखे साहित्यिक त्याच्या परीने कृतीही करत होते. मामा वरेरकरांसारखे लेखक त्यासाठी नाटकाचा माध्यम म्हणून वापर करत. जे काहीच करत नव्हते त्याना न करण्याबद्दल किमान खंत तरी वाटत होती. आता तसं काही राहिलेलच नाही. आताही साहित्यिक सांगतो की, माझ्या लिखाणातूनच मी बोलतो. पण यांचं लिखाण तरी काय दर्जाचं असतं? सेक्स, अश्लीलता, मूळ नसलेलं मध्यमवर्गीय वातावरण यातून आजचा साहित्यिक वर येतच नाही.

'माझं तर असं स्पष्ट मत आहे की, प्रत्येक साहित्यिकाने केव्हा ना केव्हा, कुठल्या ना कुठल्या तरी राजकीय आखाड्यात घुमलंच पाहिजे. कारण कसदार लिखाणासाठी साहित्यिकाला आवश्यक असणारी विचाराची साखळी राजकीय तत्त्वज्ञानातूनच निर्माण होते. जो अशा प्रकारच्या कोणत्याच देवळात जात नाही व तपश्चर्या करत नाही त्याला ही बैठक प्राप्त होऊच शकत नाही.

'मला आठवतं, आम्ही जेव्हा कॉलेजात होतो तेव्हा एकदा कॉ. डांग्यांना भेटायला गेलो आणि सांगितलं की, आमची साहित्यिक बनण्याची इच्छा आहे आणि त्यासाठी समाजाच्या खालच्या थरातील जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा आहे. त्या वेळी कम्युनिस्ट पक्षातर्फे 'क्रांती' हे वर्तमानपत्र चालवलं जात असे. डांग्यानी सांगितलं की, 'तुम्ही या वर्तमानपत्राचा एकेक गठ्ठा घ्या आणि झोपडपट्ट्यामधून, चौकात उभं राहून विका.' प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा कल्पनेने झपाटलेले आम्ही तरुण सुमारे महिनाभर 'क्रांती'चे गठ्ठे विकत हिंडत होतो. पण शेवटी लक्षात असं आलं की, कितीही प्रयत्न केला तरी जात किंवा वर्गाची बंधनं ओलांडता येत नाहीत. त्यामुळे मग आम्ही तो नाद सोडून दिला.

'पूर्वीच्या काळी गांधीवादी, समाजवादी, कम्युनिस्ट या सर्वांनीच साहित्यिकाची 'केडर्स' निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे साहित्यिकांच्या अनुभवाची क्षितिजं थोडी तरी वाढली. हल्लीचे राजकीय पुढारी मात्र स्वत:ला काही तरी विशेष समजत असावेत. त्यामुळे ते साहित्यिकांना अशा दृष्टिकोनातून जवळ करत नाहीत. थोड्या-फार प्रमाणात निवडणुकाच्या काळात कवींना बोलावलं जातं; पण राजकीय तत्त्वज्ञानातून लेखक घडविण्याचा प्रयत्न आज जवळ जवळ होतच नाही. अर्थात आता राजकीय तत्त्वज्ञानावरचा

विश्वास उडाला आहे, हेही मान्य केलं पाहिजे. राजकीय पक्षाव्यतिरिक्त पूर्वी दि. के. बेडेकर, गो. बा. सरदार, गं. वा. गाडगीळ, नानासाहेब गोरे, आचार्य जावडेकर यांची 'अॅकॅडेमिक सर्कल्स' चालत असत. त्यातूनही माणसं घडवली जात. आज तसंही कुठे फारसं होताना दिसत नाही.

'येत्या लोकसभा निवडणुकीबद्दल बोलायचं तर ही संपूर्णपणे 'जातीयवादी निवडणूक' आहे राजकीय पक्षानी आपले जाहीरनामे प्रसिद्ध केले आहेत; पण लग्नाआधी वाजंत्री वाजवण्याच्या फॅशनप्रमाणे हल्ली या जाहीरनाम्याचं स्वरूप झालं आहे. कोणीच ते फारसे गंभीरपणे घेत नाही. या राजकारण्यांनी प्रत्येक गोष्टीची चव घालवली आहे. राजकारण म्हणजे पोरखेळ झाला आहे आम्ही कॉलेजात असताना तत्त्वासाठी शारीरिक पातळीवर येऊनही मारामाऱ्या होत असत. आता सगळेच गांधीवादी, सगळेच समाजवादी आणि सगळेचजण धर्मनिरपेक्षही! जॉर्ज फर्नांडिस, मधु लिमये यांच्यासारख्यांनी सामान्य जनतेच्या लोकशाहीवरील आणि राजकीय नेत्यावरील विश्वासाची हत्या केली आहे. त्या मानाने नानासाहेब गोरे, मधु दंडवते किंवा जनसंघीय नेते अजूनही पाय रोखून उभे आहेत आणि तेवढीच आशा शिल्लक राहिली आहे.'

पुण्यात नानासाहेब गोरे आणि विठ्ठलराव गाडगीळांमध्ये लढत होणार आहे; पण खरं तर विठ्ठलराव–नानासाहेब मॅच होऊच शकत नाहीत. गोरे उत्तम साहित्यिक आहेत. शिवरामपंतांची छाया असलेली सुबोध शैली त्यांच्याजवळ आहे, ज्या काळात लोक सत्तेकडे धावत सुटले होते त्या काळात त्यांनी राजवस्त्राचा अतिशय सहजपणे त्याग केला. त्या मानाने विठ्ठलरावांजवळ 'काकासाहेबांचा मुलगा' यापलीकडे फारशी काहीच पुण्याई नाही. काकासाहेबांचेच मुद्दे आणि टर्मिनॉलॉजी ते अजूनही वापरत असतात.

'मी स्वत: मात्र या निवडणुकीत फारसं काही करू शकणार नाही. अर्थात आता नानासाहेब गोरे असल्यामुळे मतदानाला जाईनच, पण त्यापलीकडे फारसं काही जमणार नाही. एकंदर परिस्थितीही अशी बनली आहे की तुमच्या माझ्या बोलण्यामुळे किंवा लिहिण्यामुळे त्यात किती फरक पडेल याबद्दल साशंकता वाटते, माझ्या सुरुवातीच्या बोलण्याशी हे थोडे विसंगत वाटेल; पण मला तरी त्यातून सध्या मार्ग दिसत नाही. आज एकूण चिखलच इतका झाला आहे की, सामान्य माणसाच्या हातात फारसं काही उरलेलं नाही.' ●

## स्वायत्तता आणि बांधिलकी या दोन्ही परस्परावलंबी गोष्टी आहेत.

### प्रा. राम बापट

'कोणत्याही महत्त्वाच्या राजकीय-सामाजिक चळवळीत आपलं मत स्पष्टपणे मांडणं हा साहित्यिक विचारवंताच्या कार्याचा एक आवश्यक भाग आहे असं मी मानतो. विशेषत: भारतासारख्या मागासलेल्या देशात बुद्धिवादी वर्गाची ही एक असाधारण नैतिक जबाबदारीच असते.

'अर्थात निवडणूक प्रचारात आपण भाग घ्यायचा की नाही हे या वर्गातील प्रत्येकाने निवडणुकीच्या कार्याचं मूल्यमापन करून ठरवावं. कारण माझी संसदीय लोकशाहीवर जरी निष्ठा असली तरी निवडणुकीला अवास्तव, संदर्भहीन महत्त्व द्यायला मी तयार नाही. निवडणुका या सर्वसामान्य लोकांशी संवाद साधायच्या प्रक्रियेचा अधिकाधिक प्रभावी भाग बनल्या पाहिजेत. म्हणूनच एखाद्या विचारवंताला सध्याच्या निवडणुकीचं स्वरूप बाजारी, सवंग असं वाटलं तर या निवडणुकीकडे जाणीवपूर्वक उपेक्षेने पाहणं हाही त्याच्या कृतिशीलतेचा भाग होऊ शकेल. एरवी प्रभावी लोकजागृती करून जनआंदोलन बांधणं हे विचारवंताचं काम आहे.

'विचारवंतानी प्रत्येक निवडणुकीत भाग घेतला पाहिजे, परंतु तो भाग कोणत्याही दडपणाखाली घेतलेला नसावा. उदाहरणार्थ, आगामी निवडणूक ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहे, म्हणून साहित्यिक-विचारवंतानी तिच्यामध्ये उतरावं, हे मला मान्य नाही. कारण तसं पाहायला गेलं तर प्रत्येक निवडणूक ही ऐतिहासिक महत्त्वाचीच असते. १९७१ सालची निवडणूक 'गरिबी हटाव' या घोषणेखाली ऐतिहासिक महत्त्वाची ठरवली गेली, १९७७ साली 'आणीबाणी हटाव' हे ऐतिहासिक महत्त्वाचं कार्य ठरलं, आता पुन्हा 'एकाधिकारशाहीविरुद्ध लढा' म्हणून या निवडणुकीला ऐतिहासिक महत्त्व आहे असं सांगितलं जातंय. हे special claims मला मान्य नाहीत. हा निव्वळ डावपेचांचा भाग आहे असं मला वाटतं.

'आज काही विचारवंत असं म्हणतात की, भारतीय लोकशाहीच्या राजकारणाची प्रक्रियाच सडलेली आहे. पण मग या विचारवंतांनी हे आपापसात बोलून चालणार नाही. सर्व जनतेला हे सांगून, समजावून देऊन त्यावर काही तरी निश्चित उपायही सुचविण्याची जबाबदारी विचारवंतावर असते. अवघड परिस्थितीतून वाट काढण्याचं मार्गदर्शन त्यांच्याकडून अपेक्षित असतं. निवडणुकांकडे पाठ फिरवा, हे सांगतानाच तोंड कोणाकडे फिरवायचं हेही सांगण्याची नैतिक जबाबदारी विचारवंतानी टाकून चालणार नाही.

'साहित्य किंवा कलानिर्मितीचं कार्यही स्थल-कालाने बांधलेलं असतं हे जर लक्षात घेतलं तर कलेच्या स्वायत्ततेचा जो दावा केला जातो त्यामधील फोलपणा लक्षात येईल. कारण जोपर्यंत समाजाशी संवाद साधण्याची इच्छा आहे तोपर्यंत साहित्यिकांनी शक्यतो नेहमीच, पण किमान विशेष प्रसंगी समाजाचंही ऋण फेडलं पाहिजे. स्वायत्तता हाही अनुशासनबद्ध स्वातंत्र्याचाच एक भाग असतो, हे या संदर्भात विसरून चालणार नाही.' अर्थात प्रत्येक वेळी भूमिका घेणं म्हणजे सामाजिक बांधिलकी नाही, तर साहित्याची निर्मिती हाही सामाजिक प्रक्रियेचा एक भाग मानणं हे जास्त महत्त्वाचं आहे. समाजाशी संवाद न ठेवण्याची भूमिका दोन कारणांनी येऊ शकते. जर एखादा साहित्यिक स्वत:ला स्वयंभू मानत असेल तर त्यातून संवाद साधण्याच्या बांधिलकीतून मोकळं राहण्याची मागणी येण्याचा संभव असतो. पण ही भावना बऱ्याच वेळा खोटी असते. अन्यथा आणीबाणीत किंवा हुकूमशाहीमध्ये अशा साहित्यिकाने गुदमरण्याचंही कारण नाही. माझ्या मते हा खोटा pluralist attitude आहे. संवाद साधण्याच्या भूमिकेचं नीट आकलन न झाल्यानेही समाजाशी संवाद न साधण्याची मागणी पुढे येऊ शकते. ज्याला या दोन्ही भूमिका

समजतात तो सामाजिक बांधिलकीच्या खऱ्या कल्पनेच्या अधिक जवळ जातो, अधिक तळ गाठू शकतो

आणि अशा तऱ्हेची बांधिलकी जर आपण मानणार नसू तर स्वायत्ततेच्या कल्पनेलाही अर्थ राहणार नाही. कारण स्वायत्तता आणि बांधिलकी या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी व परस्परपूरक आहेत असं मला वाटतं. हे सगळं जाणूनही आपले साहित्यिक–विचारवंत जागे झाले नाहीत, जागरूक राहिले नाहीत तर मात्र अशी परिस्थिती निर्माण होईल की ज्यामध्ये यांच्या स्वायत्ततेचाच बळी जाईल.

' येत्या निवडणुकीतील माझी भूमिका विचाराल तर मी फारसं काही करणार नाही. गेल्या निवडणुकीत जनता पक्षाच्या प्रचारातही भाग घेतला होता, पण यावेळी मात्र तसंही काही करावंसं वाटत नाही. ' □

# नक्षलवादी आणि निवडणुका

अविनाश सहस्रबुद्धे

साधारणपणे नक्षलवादी ओळखल्या जाणाऱ्या राजकीय प्रवाहामध्ये विघटन होऊन आज अनेक लहानलहान गट त्यात अस्तित्वात आहेत. पूर्वी नक्षलवाद्यांची भूमिका तत्त्वत: निवडणुकामध्ये भाग न घेण्याची होती. आता काही गटांनी ती बदललेली आहे. तेव्हा येत्या लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात या विविध गटात कोणते मतप्रवाह आहेत ? त्याच्या चळवळीची स्थिती कुठे कुठे भक्कम आहे ? देशातल्या आजच्या तीन बड्या राजकीय शक्ती तसेच डाव्या आघाडीच्या संदर्भात त्यांची काय मतं आहेत ? असे अनेक प्रश्न साहजिकच उभे रहातात.

काही दिवसांपूर्वीच या विविध प्रश्नाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी नक्षलवादी चळवळीतले दोन प्रमुख नेते कानू सान्याल व असीम चटर्जी यांनी एक प्रेस कॉन्फरन्स कलकत्त्यात घेतली. त्यात त्यांनी सुरुवातीलाच असे जाहीर करून टाकले की, देशात इंदिरा गांधीची हुकूमशाही पुन्हा न येऊ देण्यासाठी येत्या मध्यावधी निवडणुकीत ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी व डाव्या आघाडीतील इतर पक्षांना पाठिंबा देतील. असे असूनही मा क पा (मार्क्सवादी कम्यु. पार्टी) च्या लोकपक्ष व कॉंग्रेस (अरस) गटाशी आघाडी करण्याच्या धोरणाबद्दल मात्र त्यांनी नापसंती दर्शविली. दोन्ही नेत्यानी हे स्पष्ट केले की, मा क पा व इतर डाव्या पक्षांना पाठिंबा देण्याचा निर्णय आम्ही एवढ्यासाठीच घेतला आहे की आज हे पक्ष राज्यकर्त्या वर्गाच्या जनताविरोधी व इंदिरा गांधीच्या एकाधिकारशाही-विरुद्ध उभे राहिले आहेत. कानू सान्याल आज चारू मुजुमदार नंतरचे नक्षलवादी चळवळीतले अत्यंत लोकप्रिय नेते समजले जातात व असीम चटर्जींची प्रतिमा ही प्रखर बुद्धिजीवी व लढाऊ वृत्तीच्या कार्यकर्त्याची आहे. तीन चार महिन्यापूर्वीच कानू सान्यालची तुरुंगातून सुटका झाली आहे व असीम चटर्जी आणीबाणी संपुष्टात आल्यानंतरही जवळजवळ दीड वर्षानें तुरुंगातून सुटले.

कानू सान्याल व असीम चटर्जी यानी इंदिरा गांधीच्या एकाधिकारशाहीविरोधी व निरंकुश सत्ताकांक्षेविरुद्ध जे मत नोंदवले तिचेच सार्वत्रिक पडसाद नक्षलवादी चळवळीतील तरुण कार्यकर्त्यांमध्ये आज दिसताहेत. त्यांच्या मते इंदिरा गांधीचे पुनरागमन म्हणजे पुन्हा एका अंधारयुगाची सुरवात, सर्व राजकीय पर्याय निकालात निघण्याची शक्यता व देशात पुन्हा भांडवलशाही शोषणाची सुरवात. म्हणून इंदिरा गांधीना पुन्हा सत्तेवर न येऊ देणे व हुकूमशाही प्रवृत्तीचा बिमोड करणे हे आजचे डाव्या पक्षाचे पहिले कर्तव्य आहे. त्याचं म्हणणं असं की, ज्या इंदिरा गांधी आज कायदा व सुव्यवस्थेच्या गप्पा मारत आहेत त्याच इंदिरा गांधीच्या अकरा वर्षांच्या काळात कायदा व सुव्यवस्थेची, उत्तम प्रशासनाची काय बूज राखली जात होती ? एकोणीसशे एकाहत्तर--बहात्तर मधले ते दिवस आठवा. जेव्हा कलकत्याला वस्त्या पोलिसांनी वेढल्या जायच्या व एकेका घराची झडती घेतली जायची, निरपराध लोकांना नक्षलवादी म्हणून पकडून त्यांचा छळ केला जायचा, तरुण मुलीच्या शरीरावर, नाजूक भागात जळत्या सिगरेटचे चटके दिले जायचे. बारासत (चौवीस परगणा जिल्हा) मधल्या अमानुष घटनेला लोक अजूनही विसरलेले नाहीत. तिथे एका दिवसात अकरा नक्षलवादी तरुणांची प्रेतं सापडली होती. अकरा वर्षांच्या या कारकीर्दीत कायदा व प्रशासनाचा जो नंगानाच आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहिला तो आता पुन्हा आम्हाला पहायचा नाहीये. आणीबाणीतले अत्याचार व नक्षलवाद्यांना मिळालेली क्रूर वागणूकही हे तरुण विसरलेले नाहीत. तारकुंडे समितीचा अहवालही हेच दर्शवितो की, आणीबाणीच्या काळात पोलिसांनी, पर्यायाने इंदिरा गांधीच्या सरकारने नक्षलवाद्यावर अनन्वित अत्याचार केले. त्याचे हत्याकाड केले. हजारो तरुण तुरुंगात खितपत पडले होते पकडल्या गेलेल्या तरुणांनी आपला गुन्हा कबूल करावा, ' नक्षलवादी ' असल्याचे कबूल करावे यासाठी त्यांचा अतोनात शारीरिक छळ केला गेला. छळाचे भीषण प्रकार शोधून काढले गेले. हे अत्याचार सर्व घडून गेल्याला फक्त तीन वर्षं झाली आहेत. त्याच्या आठवणी अजूनही ताज्या आहेत. तेव्हा येत्या निवडणुकीत आमची भूमिका सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे व ती म्हणजे हुकूमशाही शक्तीना पुन्हा सत्ता न काबीज करू देणे. १९७७ च्या निवडणुकीतही आम्ही एकही जागा न मागता हुकूमशाही शक्तीचा बीमोड करण्याच्या प्रयत्नात सामील झालो होतो. आमच्या दृष्टीने १९७७ च्या परिस्थितीत व आजच्या परिस्थितीत फारसा फरक नाही. फरक असलाच तर तो एवढाच की आज सत्ताधारी वर्गाचा नाकर्तेपणा १९७७ च्या तुलनेने अधिक उघडा पडला आहे.

आज नक्षलवाद्यांमध्ये इतके गट अस्तित्वात आहेत की, त्यांच्यातला प्रातिनिधिक गट कोणता हे निश्चितपणे सागणे कठीण आहे. चारू मुजुमदार व कानू सान्यालने ज्या सी. पी. आय. (एम. एल.) ची सौरेन बसु, जंगल संथाल, असीम चटर्जी, संतोष राणा, नागभूषण

पटनायक, निशीथ भट्टाचार्य, महादेव मुखर्जी इत्यादींची केंद्रीय समिती करून स्थापना केली होती तो पक्ष आज इतक्या गटात विघटित झाला आहे की, आज त्यांच्यात नेमके किती गट आहेत व कोण कोणाबरोबर आहे हे सांगणे सोपे नाही. कानू सान्याल व असीम चटर्जींनी प्रेस कॉन्फरन्समध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, सी. पी. आय. (एम. एल) असा पक्ष आता अस्तित्वातच नाही, त्याच्यातला जो शिल्लक राहिलेला गट आहे तो अजूनही आपली अराजकवादी नीती सोडायला तयार नाही. कानू सान्याल व असीम चटर्जी यानी आपल्या गटाला किंवा संघटनेला 'ऑर्गनायझिंग कमिटी फॉर को-ऑरडिनेशन ऑफ कम्युनिस्ट रेव्होल्यूशनरीज' हे नाव दिले आहे. नक्षलवाद्यांमध्ये हे जे विविध गट आहेत त्याची निवडणुकासंबंधीची भूमिका लक्षात घेता त्यांना तीन वेगवेगळ्या विभागात बसविता येईल.

### एक :

या विभागात असे गट मोडतात ज्याचा संसदीय राज्यपद्धतीवर व निवडणुकावर विश्वास नाही व चारू मुजुमदारच्या कसेही करून वर्गशत्रुला नष्ट करण्याच्या विचारसरणीबद्दल त्यांना आस्था आहे. याच्यात विनोद मित्र व निशीथ भट्टाचार्यचे गट प्रमुख आहेत. विनोद मित्र याचा गट बिहारमधील भोजपूर व प. बंगालमधल्या बांकुडा व जलपाईगुडी जिल्ह्यातील काही भागात आपला प्रभाव ठेवून आहे व निशीथ भट्टाचार्यांच्या नेतृत्वाखालील गटाने प. बंगालमधील कूचबिहार व जलपाईगुडी व मागदा जिल्ह्यातील काही भागात बरेच काम केले आहे. या दोन्ही गटाना अनुक्रमे अँटी लिन पियाओ व प्रो लिन पियाओ असेही समजले जाते. विनोद मित्रा याच्या नेतृत्वाखालील गट निवडणुकीत भाग न घेण्याचे पूर्वीचेच धोरण मानतो व या गटाने काही दिवसांपूर्वीच कलकत्त्यातील भिंतीवर सी. पी. आय. (एम्. एल्.) डब्लू. बी. एस. सी. या नावाने निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याच्या घोषणा लिहिल्या होत्या. विनोद मित्र यांच्या गटासंबंधीच चार–पाच महिन्यापूर्वी असंही ऐकण्यात आलं होतं की, हा गट पूर्वी सत्यनारायण सिंह याच्या व आता चंद्रपुल्ला रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या गटाला जाऊन मिळणार आहे.

### दोन :

या विभागात कानू सान्याल व असीम चटर्जीसारखी मंडळी मोडतात ज्याचा संसदीय राज्यपद्धतीवर विश्वास नाही परंतु 'मास पॉलिटिक्स व मास ट्रगल'ला ते आवश्यक मानतात. कानू सान्याल व असीम चटर्जी यानी त्याच्या प्रेस कॉन्फरन्समध्ये सांगितले की, आमच्या विचारप्रणालीचा प्रचार करण्यासाठी आम्ही निवडणूक माध्यमाचा उपयोग करून घेणार आहोत. त्यांचं म्हणणं असं की, सध्याच्या राजकीय परिस्थितीत निवडणुकांवर बहिष्कार टाकणे हे नकारात्मक व नुकसानकारक पाऊल ठरेल. त्यानी अशी भूमिका घेतली आहे की, डाव्या पक्षाच्या आघाडीला आम्ही मदत करू; पण लोकपक्ष–कॉंग्रेस (अरस) शी आघाडी करण्याचे डाव्या पक्षाचे धोरण आम्हाला मान्य नाही व आम्ही लोकपक्ष-कॉंग्रेसच्या उमेदवाराना पाठिंबा देणार नाही. नक्षलवादी चळवळ जेव्हा वेगाने फोफावत होती, तेव्हाच कानू सान्याल व असीम चटर्जींचे चारू मुजुमदारशी मतभेद होऊ लागले होते व हे दोघेही वर्गशत्रुच्या नावाखाली कुणाचीही हत्या करण्याच्या विरुद्ध होते. त्याच वेळी सौरेन बसुचाही चारू मुजुमदारशी पुतळे फोडण्याच्या कारवाईवरून मतभेद झाला होता. आज तर कानू सान्याल व असीम चटर्जी दोघेही चारू मुजुमदारच्या मतप्रणालीपासून पूर्ण वेगळे झाले आहेत. इतकेच नव्हे तर चारू मुजुमदारच्या विचारसरणीवर कडक टीकाही करू लागले आहेत. ती सगळी विचारसरणीच चुकीची होती असं त्याना वाटतं. याच विभागात संतोष राणासारखे लोकही आहेत ज्याचा कानू सान्याल व असीम चटर्जीशी कुठलाही संबंध नाही. परंतु निवडणुकीत भाग घेण्याची त्यांची भूमिका आहे. संतोष राणा हे प. बंगाल विधानसभेचे सदस्यही आहेत.

### तीन :

या विभागातला प्रमुख गट म्हणजे पूर्वी सत्यनारायण सिंह यांच्या व आता चंद्रपुल्ला रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली असणारा गट. महाराष्ट्रात या गटाचे सुनील दिघे हे एक नेते आहेत. महाराष्ट्रात हा गट जागा लढविणार नाहीये, परंतु भारतात इतर ठिकाणी काही निवडक जागा ते लढविणार आहेत. सुनील दिघे याचे म्हणणे असे की, निवडणुकीत भाग घेण्याचा आमचा मुख्य हेतू प्रचार करण्याचा राहील. निवडणुकांचा उपयोग करून आम्ही शेतकी क्रांतीचा कार्यक्रम, परदेशी लुटारूंचे सर्व भाडवल, कर्ज व वर्चस्व रद्द करणे, भारत–रशिया करारासारखे गुलामगिरीचे करार रद्द करणे ह्याकरता जनमत तयार करण्यासाठी प्रचार करू. प्रदीर्घ जनयुद्धाच्या मार्गाने अमेरिकन व रशियन साम्राज्यवाद आणि सरंजामशाही नष्ट केल्याशिवाय आपले प्रश्न सुटणार नाहीत हे सांगू. निवडणुकीच्या मार्गाबद्दल लोकांचा भ्रमनिरास करू. सर्व भाडवली पक्षाचेही आम्ही वस्त्रहरण करू. कम्युनिस्ट क्रांतिकारकाची शक्ती आज कमकुवत असल्याने लोकांमध्ये निवडणुकीबद्दल भ्रम आहेत व ते त्यात भाग घेतात. आम्ही वरील भूमिका माडण्यासाठी उभे रहातो, आश्वासने द्यायला नव्हे. नेहमीच व तत्वतः निवडणुकावर बहिष्कार टाकला पाहिजे ही आमची पूर्वीची भूमिका आता आम्ही सोडली आहे. हा प्रश्न स्ट्रॅटेजीचा नसून टॅक्टिक्सचा आहे असे आता आम्ही मानतो. जेथे आमचे जनतेत काम आहे तेथे आमच्या प्रभावाखालचे जनमत

अधिक पक्के करण्यासाठी आम्ही निवडणूक लढवू. जेथे काम नाही तेथे आम्ही फक्त खालील गोष्टीशी सहमत असणाऱ्या कम्युनिस्ट क्रांतिकारक उमेदवारांना पाठिंबा देणार आहोत. ( १ ) जे रशिया व अमेरिका या दोन्ही साम्राज्यवाद्यांना जनतेचे शत्रू मानतात. ( २ ) बडे भांडवलदार व बडे जमिनदार याच्या पिळवणुकीविरुद्ध झगडतात. (३) जे शेजाऱ्यांशी, विशेषतः चीनशी मैत्री करण्याच्या बाजूचे आहेत. (४) कापुचियामधील समरिनच्या बाहुले सरकारला मान्यता देण्याच्या जे विरुद्ध आहेत. ( ५ ) जे जनतेच्या लोकशाही हक्काचे रक्षण व विस्तार करण्याकरता लढतात. असा कोणी उमेदवार सापडणे असंभवनीय आहे, पण यदाकदाचित कोणी मिळालाच तर आम्ही पाठिंबा देऊ !

वरील तिन्ही विभागातील गट इंदिरा गांधीच्या हुकूमशाहीविरुद्ध मात्र एकाच मताचे आहेत कारण सगळे नक्षलवादी नेते इंदिरा गांधीचे सरकार कोसळल्यावर तुरुंगातून सुटले आहेत व त्यांना माहित आहे की, गेल्या निवडणुकीत इंदिरा गांधी निवडून आल्या असत्या तर ते आजही तुरुंगात असते व येत्या निवडणुकानंतर त्याना पुन्हा सत्ता लाभली तर हे पुन्हा तुरुंगाआड जातील. निरंकुश सत्तेची दडपशाही काय असते याचा अनुभव त्यांनी सात-आठ वर्षाच्या प्रदीर्घ काळाच्या तुरुंगवासात घेतला आहे. देशात नागरिक स्वातंत्र्य नसेल तर समाजात कसे जडत्व येते व जनतेच्या चळवळी कशा मोडीत काढल्या जातात हे त्यांना पुरतेपणी कळून चुकले आहे. दहशतवादी चळवळीतील फोलपणा आज लक्षात आलेले बहुतेक नक्षलवादी लोकशाहीचे महत्त्व समजू लागले आहेत. समाजव्यवस्थेच्या बदलाची प्रक्रिया लोकशाहीतच शक्य होऊ शकते हे त्यांच्या लक्षात येऊ लागले आहे.

ज्या नक्षलवाद्यांचा त्यांच्या पूर्वीच्याच विचारसरणीवर आजही विश्वास आहे व जे अनुभवातून धडे घ्यायलाच सुधारणावाद समजतात त्याना बाजूला केले तर उरलेल्या सर्व गटातील नक्षलवादी इंदिरा गांधीच्या एकाधिकारशाहीला विरोध करणे हे आपले पहिले कर्तव्य मानतात. कानू सान्याल व असीम चटर्जीना अशा नक्षलवादी कार्यकर्त्यांचे प्रतिनिधी जरी नाही म्हणता आले तरी अशाच्या भावनाना ते बऱ्याच प्रमाणात अभिव्यक्ती देत आहेत असे म्हणायला हरकत नाही. मा क पा शी मतभेद असूनही ते आज त्याना पाठिंबा द्यायला तयार झाले आहेत यामागचं खरं कारण हेच आहे की, मा क पा इंदिरा कॉंग्रेसच्या विरोधात ठामपणे उभी राहिली आहे. भारतीय कम्युनिस्ट पार्टीला या नेत्यांनी हुकूमशाहीचा ' विश्वासू कुत्रा ' म्हटले आहे. दोघानीही हुकूमशाही प्रवृत्तीचा पाडाव करून केन्द्रात डाव्या व लोकशाही शक्तीचे सरकार बनवण्याची कल्पनाही मांडली आहे. अशा सरकारच्या बारा कलमी कार्यक्रमात भारत-रशिया करारासहित जागतिक महाशक्तीशी झालेले व भारताच्या हिताविरुद्ध असलेले सर्व करार रद्द करण्याचे कलमही आहे जे मा क पा च्या भारत-रशियाच्या कराराला अधिक मजबूत करण्याच्या धोरणाविरुद्ध आहे.

वरील विवेचनावरून येत्या लोकसभा निवडणुकीत नक्षलवाद्यांची भूमिका काय आहे याचा काही काहीसा अंदाज येऊ शकतो. □




लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

पद्मा मेहता

# लहानांचा कणखर लढा 'मिसावास्यम्'

अहमदाबादहून निघणाऱ्या गुजराती साप्ताहिक 'साधना 'चे संपादक-एक जागृत निर्भीड पत्रकार, साहित्यकार आणि अध्यापक-श्री. पंडया यांच्या लेखणीतून सहज ओघवत्या भाषेत साकार झालेले हे मिसावृत्त, गुजरातच्या राजकीय पार्श्वभूमीवर आधारित असूनही स्थानिक घडामोडींच्या परिणामांचे वेध घेणारे.आणीबाणीतील व्यक्ती व समूहाच्या जय-पराजयाच्या स्थितीची ही अनुभवकथा आधी मुंबईच्या गुजराती दैनिक 'जनशक्ति' मधून क्रमशः प्रसिद्ध झाली.

फिलाडेल्फिया युनिव्हर्सिटीतर्फे भारतातील आणीबाणीतील साहित्यिक रचनांविषयी प्रा. पेरी एक बृहद् संदर्भग्रंथ तयार करीत आहेत. प्रस्तुत पुस्तकाला असलेल्या साहित्यिक परिमाणांमुळे त्याचाही उपयोग या ग्रंथासाठी होत आहे. प्रा. पेरी आणि मायकेल हॅन्डर्सन या पुस्तकाच्या इंग्रजी प्रकाशनासाठी प्रयत्नशील आहेत.

सर्वांनी पाहिले
राजा तर नग्न आहे
अगदीच अनावृत-
आणि तरीही टाळयांचा कडकडाट
जयजयकार चालूच राहिला
किती तरी लांबून आलेली माणसं
भीती व भूतकाळातल्या जासूसी सत्तेत
डुंबलेली-गुदमरलेली
स्वतःचा आवाज सुद्धा कोठेतरी
हरवून आली होती.
हातात भीक्षापात्र
आणि चेहऱ्यावर याचना-
निश्चित होती सर्व
कोणी खुशामत केली
कोणी चातुर्य खर्ची घातलं
आणि बाकीचे अनेक तर
शाहीवस्त्रांच्या धो धो प्रशंसेतच
हो, त्यांच्या डोळयात डोकवणारी आशंका
त्यांच्याच शब्दांना आवाहनरूप.
सर्वांना ठाऊक आहे ही गोष्ट,
पण सगळे दरबारी नव्हते
एक किशोर सुद्धा तेथे
सुंदर, निर्भीड आणि निष्पाप्-

लोककथेला अतिक्रमून
आजही राजा येऊन ठेपला आहे
राजमार्गावर
अगदी तसाच नग्न-
पण गर्दी आणि गदारोळात
कोठे तरी हरवला आहे
तो किशोर,
जगावेगळा आणि नेकदिल
कोठे निघून गेला असेल ?
कोठे तरी असेल, असेलच की
शक्य आहे त्यालाही लपविला असेल
कुठल्या तरी अंधार गुहेत
किंवा मग नदीकाठी वाळूच्या तटात.
खेळता खेळता थकून
झोपलाही असेल वृक्षाच्या सावलीत.
उठा, त्वरा करा, शोधून आणा
कसंही करून त्याला आणा
म्हणजे उभा राहील तो उन्नत मस्तकाने
नग्न राजा समोर
आणि होयबांची गर्दी चिरून विचारेल
राजा, एऽऽअरे...राजा !
तुझी वस्त्रं कुठे आहेत ?

-नरेंद्रनाथ चक्रवर्ती

आनंदबझार पत्रिकेचे मिसावासी पत्रकार श्री. गौरकिशोर घोष यांच्या संदर्भात डिसेंबर ७६ मध्ये लिहिलेले हे बंगाली काव्य. लवकरच या कवितेवर सेन्सॉरची झडप येते 'मिसावास्यम् इदम सर्वम्।' या आधुनिक दर्शनाचे विदारक आणि ओंगळ रूप उघड करणाऱ्या अशा अनेक निर्भीड किशोरांची 'मिसावास्यम्' ही कथा सुद्धा सुरू होते याच कवितेने.

## वादळाचा इशारा देणारी दीपगृहं

'सबंध देश गुदमरत होता तेव्हां गुजरातेत अजून मोकळं आकाश शिल्लक होतं.' जनता मोर्चाच्या सरकारने प्रांतीय शासनाच्या अखत्यारातले काही निर्णय घेऊन टाकले होते – राज्यात मिसाचा वापर राजकीय अटकेसाठी करावयाचा नाही. लोकांचा विचार – अभिव्यक्ती थांबवावयाची नाही, त्यामुळे जर नवीन कायद्याचा भंग होत असेल तर. 'कोर्टात खटले भरायचे आणि न्यायतंत्राचे निर्णय मान्य करायचे.' 'एवढे हे निर्णय गुजरातला स्वातंत्र्यद्वीपात पालटून टाकण्यास पुरेसे होते.' आणि म्हणूनच इतर प्रांतांच्या तुलनेने गुजरातमध्ये 'मिसापूर' बराचसा उशिरा येतो. मोर्चा पाडायला. सरकार पाडायला केंद्राला तब्बल नऊ महिने लागतात. राजकारणाचा शेअरबाजार होतो. खरेदीविक्रीचे भाव वाढतात आणि १२ मार्च १९७६ नंतर राष्ट्रपतिशासन येताच या महापुराच्या लाटा गुजरातवर देखील आदळतात. निवडणुकीच्या घोषणेनंतर हे वादळ जेव्हा शमतं तेव्हा पुस्तकाच्या शेवटी लेखक गजाबाहेर पडतात – 'मिसावास्यम्'च्या

पुसट होणाऱ्या अक्षराच्या जाणिवेबरोबरच एक भेडसावणारा यक्षप्रश्न घेऊन. मिसावास्यम्‌चे अस्तित्व हळूहळू लोप पावत आहे; पण त्याच्या प्रकृतीचे? सत्तेच्या रक्तात भिनलेल्या मिसाच्या प्रकृतीपासून सावध करणारी, तसेच आणाबाणीवरील पुस्तकं आता शिळी झाली आहेत असं म्हणणाऱ्या देशातील अनेक भावी आणीबाणीच्या वादळाचा इशारा देत राहणारी काही 'दीपगृहं' गेल्या दोन अडीच वर्षांत मोजक्याच पुस्तकांच्या रूपानं अस्तित्वात आली. 'मिसावास्यम्' हे असेच एक दीपगृह – 'वासंति'क विषाद, 'लोहकपाटा'ची पात्रं 'मुक्त' शब्दांसाठी, मृत्तिकादीपाच्या उजेडात 'आग नाही, निखारे' लढा भूमिगत पत्रांचा इत्यादि सारख्या वेधक' व सार्थ मथळ्याखाली वीस सुटसुटीत प्रकरणातून राष्ट्रव्यापी संघर्षाच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकणारे. मोर्चा सरकारचा पाडाव करण्यासाठी खेळल्या गेलेल्या डावपेचांची इत्थंभूत माहिती या पुस्तकात समजते.

लेखकाच्या कारावासाचा प्रारंभ एका पोलिस अधिकाऱ्याच्या प्रश्नाने होतो : आता काय करणार साधनेच?' दुसऱ्याच आठवड्यात निघालेला 'साधना'चा ताजा अंक याचे उत्तर घेऊन येतो. मोर्चा सरकार पडेपर्यन्तचे नऊ महिने आणि नंतरसुद्धा तब्बल चार महिने चाललेल्या शासन आणि 'साधना'मधील लढ्याची ही कहाणी 'युद्धस्य कथा'सारखी नुसती रम्य व नाट्यपूर्ण नाही तर गम्य आणि मननीयसुद्धा आहे.

## कायदेशीर लढ्याचा इतिहास

घाईघाईने बाहेर पडलेल्या सेन्सॉरशिप ऑर्डरमध्ये 'शाबूत' राहिलेली अनेक छिद्रं शोधून शासनाशी कायदेशीर लढा देत राहण्याचे काम श्री व्ही. एम. तारकुंडेसारख्या या देशातील कुशल कायदेपंडितांनी सुरू केलेले असते. अहमदाबादेत वकिली करणारे तारकुंडेंचेच एक धुरंधर सहकारी श्री. चंद्रकान्त दरूंचं संपूर्ण सहकार्य 'साधना'ला लाभते त्यानी दिलेल्या कायदेशीर लढ्याचा अत्यंत रोचक इतिहास येथे शब्दबद्ध झाला आहे. वाणी व विचारस्वातंत्र्याचा मूलभूत अधिकारासाठी सेन्सॉरच्या सत्तेला आव्हान देणारा पहिला खटला या देशात 'साधना'तर्फे भरला जातो, 'आणीबाणीचा पुनर्विचार करा' या लेखावर घातलेल्या बंदी विरुद्ध आवाज उठवून. आणि सेन्सॉरला नमते घ्यावे लागते! एक ऐतिहासिक मूल्य म्हणून श्री. दरूंनी हायकोर्टात केलेल्या त्या वेळच्या विनोदाचा काही भाग या पुस्तकाच्या शेवटी एका परिशिष्टात देण्यात आला आहे–

## कायद्याला शासनही घाबरतेच

सेन्सॉरशिपच्या कायद्यात राहूनसुद्धा आणीबाणी विरुद्ध कोणकोणत्या प्रकारे लिहिता येईल हे समजावून सांगण्यासाठी श्री. तारकुंडे यानी प्रमुख वर्तमानपत्राच्या मालकाची दिल्लीत घेतलेली सभा काही अंशी अपयशी ठरते–केवळ धैर्य कमी पडले म्हणून मोठी वर्तमानपत्रं जे करू धजत नाहीत ते लहान वर्तमानपत्रं करू शकतात. लेखकाचे 'साधना' या कायदेशीर लढ्याला परत एकदा चालना देते. सेन्सॉरशिपच्या मर्यादित राहून सुद्धा काय काय छापता येईल याचे मार्गदर्शन करणारा एक अभ्यासपूर्ण लेख श्री. दरू लिहितात. शक्य तितक्या वर्तमानपत्रातून तो प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न लेखक करीत राहतात. बऱ्याच वेळेस बडोद्याच्या 'भूमिपुत्र'चा आणीबाणीवर टीका करणारा विस्तृत अंक बाहेर पडतो. कोणत्याही प्रकारची शासकीय दखल घेतली जात नाही. कायद्याविरुद्ध जाण्याला सुरुवातीला शासन सुद्धा घाबरत असतं!

श्री. दरूंचा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर 'साधना' पुढचं पाऊल उचलते. 'आणीबाणीचा पुनर्विचार करा' या प्रखर टीका करणाऱ्या लेखाच्या रूपानं श्री. गजेंद्रगडकर व लेखक यानी लिहिलेला हा पस्तीस पानी संयुक्त लेख सेन्सॉरकडे आज्ञाधारकतेनं पाठविला जातो. अर्थातच तो रद्द होतो. श्री. दरू हायकोर्टात 'रिट' दाखल करतात. शासनाची मुदत मागत राहण्याची व्यूहरचना ही अपेक्षित असते, तोपर्यंत दुसरी फळी उघडली जाते. आणीबाणीविरुद्ध सत्याग्रह सुरू झालेला असतो. सेन्सॉरविरुद्धच्या कित्येक खटल्यात गुजरात हायकोर्ट तटस्थ निर्णय देत राहतं. न्यायालयीन स्वातंत्र्याचे वारे अजून तिथे तरी वाहत असतात. पण हे निर्णय छापायचे कोणी? गुजरातबाहेर पाठवायचे कसे? साधनाच्या स्तंभलेखातून आणि बातम्याच्या चौकटीतून हे होत राहतं. त्यानंतरचा आणखी एक किस्सा ज्याबद्दल त्या वेळी तर काही बाहेर आले नाहीच आणि नंतरही जे आले ते इतर अनेक घटनांसारखे लोककथेचे किंवा दतकथेचे वलय घेऊनच.

## सरकारच्या पोकळ धमक्या

२६ जुलै ७५ ला आणीबाणीला एक महिना पूर्ण होत असताना सबंध गुजरातभर, तालुक्या तालुक्यातून व जिल्ह्या जिल्ह्यातून मोर्चे निघतात, सभा होतात. अहमदाबादेत चाळीस-पन्नास हजारांच्या जनसमुदायासमोर मुख्य मंत्री बाबूभाई पटेल भाषण करतात. सभेच्या शेवटी तो प्रचंड मानवसागर उभा राहून स्वातंत्र्याचा संकल्प सोडतो. दिल्लीला या सर्व कार्यक्रमाची आधीच कल्पना असते. गृहमंत्री पटेलांना कळवितात. 'हे सर्व कार्यक्रम रद्द करा. रक्तपात होईल. आम्हाला मधे पडावे लागेल' या धमकीचा सरळसरळ अर्थ असतो, गुजरात, सेन्ट्रल रिझर्व्ह पोलिसाच्या ताब्यात देणे आणि ताज्याच भूतकाळातील नवनिर्माण आंदोलनानं घेतलेल्या हिंसाचारी वळणाची पुनरावृत्ती होणे. पण फासा टाकलेला असतोच, मग डावही खेळला जातो. सभा, मोर्चे, सकल्प सर्व काही सुरळीत होतं. धमकी पोकळ ठरते. बऱ्याच धमक्या अशा पोकळच असतात. धमकीला घाबरणारेच तिला खरी ठरवीत असतात याचा तो प्रत्यय! साधनेत अर्थातच हे सारे महाभारत प्रसिद्ध होतं. हे सर्व होत असताना तेरा ऑगस्ट उजाडतो. हायकोर्टात गेलेल्या रिटची शेवटची सुनावणी असते. 'आणीबाणीचा पुनर्विचार करा' हा लेख रद्द करण्याचा निर्णय सेन्सॉर मागे घेतं. यातही डावपेच असतातच, परंतु शासनाला ते खेळण्याचा अवधी मिळायच्या आतच हा लेख, अटकेत असणाऱ्या नेत्यांची नावं, फोटोग्राफस आणि सेन्सॉरची शरणागती इत्यादी सर्व बातम्यांसह साधनेचा एक जाड अंक बाहेर पडतो. पंधरा ऑगस्टच्या सभेत उत्साहाने तो वाचणारी, गर्दी पाहणारे श्री. मावळंकर नंतर लेखकाला सांगतात :

'मी बघत होतो, लोक किती उत्सुकतेनं प्रथमच मुक्त पत्रकारितेचा आनंद उपभोगत

होते.' कायद्याचा पोकळपणा उघड करणाऱ्या सेन्सॉरशिपच्या या शरणागतीमुळे 'जनसत्ता' 'जन्मभूमि', 'फूलछाप' इत्यादी वर्तमानपत्रेसुद्धा सेन्सॉरला आव्हान देतात आणि शासन काहीही करू शकत नाही. जी वर्तमानपत्रं 'असे' काही प्रसिद्ध करण्यासाठी स्वत:ला 'असमर्थ' समजतात, त्यांच्या ठायीसुद्धा ते लेख साधनेकडे पाठवून देण्यापुरती सदसद्विवेकबुद्धी जागी असते! 'संदेश' साप्ताहिकाने पाठविलेल्या ज्या लेखावर सेन्सॉर काट मारते तोच लेख 'साधना' सेन्सॉरला न विचारता प्रसिद्ध करते आणि काहीही घडत नाही! या यशामागे जितकं साधनेचं धैर्य असतं तितकीच श्री. दरूंची व्यूहरचनाही कारणीभूत असते. मुंबईच्या कायदेपंडितांच्या कायदेशीर लढ्यापेक्षा वेगळेच डावपेच दरू लेखकाला सांगत असतात: 'आधी छापून टाका. नंतर प्रेसजप्ती इत्यादी जे काही होईल त्यासाठी कोर्टात जाऊ.' तोपर्यंत लोकांना बातम्या मिळालेल्या असतात. शासनालाही मग खटले जिंकणं थोडं कठिणच जातं. जनतामोर्चा विधानसभेत असेपर्यंत न्यायतंत्र जागृत असतं आणि सेन्सॉरला त्याचा थोडातरी शह असतोच.

## सेन्सॉरशी लढा

यानंतर बाहेर पडतो साधनेचा 'लोकशाही विशेषांक.' श्री. छागलाच्या भाषणानं ऐतिहासिक ठरलेल्या अहमदाबादच्या 'नागरिक स्वातंत्र्य संमेलना'चा अहवाल आणि त्यात झालेली सर्वश्री छागला, एस्. एम्. जोशी, न्या. शाह, बॅ. तारकुंडे इत्यादी नेत्यांची भाषणं त्यात प्रसिद्ध होतात. संसदेतले उरले सुरले मूठभर विरोधी सभासद– सर्वश्री मावळंकर, धारिया, त्रिदीब चौधरी, ना. ग. गोरे वगैरे– जी भाषणं करतात, ती सेन्सॉरने दाबून टाकलेली असतात.

राज्यसभेत उमाशंकर जोशींनी 'पोमा'विरुद्ध उठविलेला आवाजही असाच दाबला जातो. लोकशाही विशेषांक ही सर्व भाषणं जशीच्या तशी छापतो. 'लोकजागरणा'च्या निमित्ताने त्याच्या पन्नास हजार प्रती तयार होत असतानाच दिल्लीहून आज्ञा सुटते: 'लोकशाही विशेषांकाचं' एक अक्षरसुद्धा सेन्सॉर केल्याशिवाय छापता येणार नाही. अंकाचे बांधणी-पाठवणी इ. उरलेलं काम अज्ञात स्थळीं हलविण्यात येते. रेल्वे-पोस्टात हळूच चौकशी केली जाते. त्यांना बहुतेक सेन्सार–साधनामध्ये चाललेल्या लढ्याची कल्पनाच नसते. चोवीस तासात जमेल इतके अंक पोस्टपार्सलने बाहेर पाठविले जातात दुसऱ्या दिवशी सेन्सारला एक साळसूद उत्तर जातं: 'ज्या दिवशी तुमची नोटीस मिळाली त्याच दिवशी अंक पाठविले गेले होते म्हणून दाखवू शकलो नाही...' आणि मग एके सकाळी 'गार्डीयन'चा वार्ताहर लिफसुलत्स येऊन उभा ठाकतो इतक्या प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा कसे काय बाहेर पडते 'साधना?' हे विचारायचे असते त्याला जाताना सांगतो 'इतकी मोठी चळवळ या देशात चालू आहे आणि दिल्लीत बसल्या बसल्या आम्हाला कळतसुद्धा नाही!'

ही चळवळसुद्धा लवकरच बंद पडणार असते राष्ट्रपतीशासनाच्या पहिल्याच आठवड्यात लंडनच्या 'गार्डन'मध्ये बातमी येते– आणि तेरा मार्च ७६ नंतर गुजरातमध्ये स्वातंत्र्यद्वीप नष्ट झालं आहे...'

## गजाआडील प्रखर साहित्य

परंतु संपादक गजाआड गेल्यानंतरही तब्बल चार महिने 'साधना' झुंज देत राहतं. गुजरात हायकोर्टचे दोन न्यायाधीश– एस. एच सेठ व जे. बी मेहता–सेन्सॉरशिप ऑर्डरच्या तीन कलमांना आणि मार्गदर्शक तत्त्वांना बेकायदेशीर ठरवतात. [नंतर या दोघांची गुजरातमधून उचलबांगडी होते] लेखकाने तुरुंगात लिहिलेला पहिला लेख या निर्णयाबद्दल असतो. हा पस्तीस-चाळीस पानी लेख अनेक टप्पे खात 'साधना' कार्यालयात पोहोचतो आणि प्रसिद्ध होतो.

मध्यंतरी एक वैयक्तिक आणीबाणीही येऊन जाते. 'दोन ओळींच्यामध्ये लपलेले बरेच काही वाचण्याची सवय नसणाऱ्यांना जेमतेम तीन-चार मिनिटांचा खुराक देणारी त्यावेळची वर्तमानपत्रं चाळत असताना एके दिवशी एक परिचित नाव लक्ष वेधून घेतं. लेखकाचे पुस्तक 'हथेलीनु आकाश' ('तळहातावरचे आकाश') १९७५ सालच्या गुजराती साहित्यातील उत्तम पुस्तकांच्या यादीत असते. त्याला राज्य सरकारचे पारितोषिक जाहीर झालेलं असतं! काही दिवसापूर्वीच तर लेखकाशी तीन महिन्याआधी केलेला लघुकथेचा एक करार आकाशवाणीने मोडलेला असतो. गुजराती चलच्चित्र पारितोषिक समितीचे सभासदत्वसुद्धा गृहखात्याने एक विशेष ठराव करून काढून घेतलेले असते. मग गजाआड टाकलेल्यांना हा पुरस्कार कशासाठी? 'या लहानशा घटनेतील वैयक्तिकपणा झटकून त्याला संघर्षाचे स्वरूप द्यावे...? का शांतपणे त्या पुरस्काराचा स्वीकार करून मोकळं व्हावे? पारितोषिक स्वीकार कदाचित मुक्तीचीही वाट...?' या दोन्ही पर्यायांचा विचार झाल्याची प्रांजळ कबुली, लेखक 'छोटीशी बाब, मोठी द्विधा' या प्रकरणात देतात. मनात कल्लोळ माजतो. हे द्वंद्व चालू असतानाच 'एकाकी रात्री आठवल्या दुर्गाताई स्वत:च्या शब्दस्वातंत्र्यासाठी सदुसष्टाव्या वर्षी बाहेर पडलेल्या वत्सलविदुषी दुर्गा भागवतांच्या प्रेरणेचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख याआधीसुद्धा येतो. कऱ्हाडच्या मराठी साहित्य संमेलनाचे पडसाद पोरबंदरच्या गुजराती साहित्य परिषदेत उमटलेले असतात, सेन्सॉर विरुद्ध केलेल्या प्रस्ताव रूपानं. या सद्भावनेला प्रतिसाद देणारं दुर्गाताईंचे मनोगतसुद्धा पुस्तकाच्या सुरुवातीला शब्दबद्ध झालं आहे.

## उन्नत मस्तकानं दिलेला लढा

त्या रात्री मग पारितोषिकाचा अस्वीकार करणारे–त्याची कारणमीमांसा देणारे एक लांब पत्र राज्यपालांना जाते. भारतातील मुक्तवृत्तपत्रकारितेच्या इतिहासातील संपादकांच्या उज्जवल परंपरेला येथे उजाळा मिळतो. शिवराम कारंथ, दुर्गा भागवत, फणीश्वरनाथ रेणू, जयवंत दळवी, मनुभाई पंचोळी इ. अनेक कलाकारांची नामावली डोळ्यापुढून सरकते.

मिसावास्यम्‌चा हा सर्ग लांबत जातो. लेखक दहा महिने तुरुंगात असतात. अशावेळी बाहेरील संघर्ष ध्वनि अविरत ठेवण्याची निकडीची गरज असते. तुरुंगाआडून 'विक्रम' या टोपण नावाखाली एक पत्रमाला सुरू होते साधनेत पहिलं पत्र बाबूभाईंना: 'बाबूभाई, अभिनंदन आणि अपेक्षासुद्धा' अपेक्षा त्याच–निखाऱ्यावर राख जमू न देण्याबद्दलच्या. दुसरं पत्र हितेंद्र देसाईंसाठी असतं: '... हितुभाई, गुजरातच्या इतिहासात फणीची एक गोष्ट आहे. वल्लभपूरच्या राजकुटुंबानं प्रधानपुत्रीला हवी असणारी फणी नाकारली. प्रधान दिल्लीला जाऊन बादशहाचं लष्कर घेऊन आले आणि वल्लभपूरचे साम्राज्य बघता बघता नष्ट झाले. मुख्यमंत्रिपदाच्या फणीचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा फणीनायकाचे काम तुम्ही करू शकाल ना?' यानंतर रसायनखात्याचे मंत्री प्रकाशचंद्र शेठींनी अहमदाबादेत घातलेला 'अपूर्व गोंधळ'सुद्धा साधनेमुळे उघडकीस येतो.

घटनेतील दुरुस्तीसंबंधीची घोषणासुद्धा याच दिवसात होते भावनगर जेलच्या 'साधना-बराकी 'त तेव्हा लेखकाबरोबर श्री. दरूसुद्धा असतात स्टेनोग्राफरची आणि इंग्रजीभाषेची सवय असलेला हा कायदेपंडित दोन दिवस सतत लिहीत राहतो—गुजरातीत ! घटना दुरुस्तीच्या विरुद्ध ऊहापोह करणारा तो लेख सेन्सॉरकडे जातो आणि 'साधना'-मध्ये दोन हप्त्यात प्रसिद्ध होतो आणि काही दिवसातच 'साधना' बंद पाडलं जातं. आणीबाणीच्या वीस महिन्यांपैकी जवळजवळ तेरा महिने उन्नत मस्तकानं जगत राहिलेलं देशातील कदाचित हे एकमेव साप्ताहिक. म्हणूनच त्याचा लढा हा स्थानिक लढ्यानं सिमित होऊ शकत नाही. त्याचे परिणाम खूप दूरगामी आहेत.

पुस्तकातल्या मधल्या चार-पाच प्रकरणाचे वर्णन साम्राज्य आणि लेखणी याच्यातले युद्धपर्व असे करता येईल. सर्व प्रांतातील लहानमोठी अनेक वर्तमानपत्रं, पुस्तकं, भूमिगतपत्रिका इत्यादींचा संपूर्ण परामर्श लेखकाने येथे घेतला आहे. प्रत्येक प्रांतातून आठ-पंधरा दिवसानी निघत असलेली बातमीपत्रं, इतर सर्व प्रांतात निश्चित पत्त्या-वर पाठविल्या जाणाऱ्या त्याच्या अनेक प्रती, मग त्या त्या भाषेत निघणाऱ्या त्या बातमी-पत्रांच्या आवृत्त्या इ. बद्दल बोलताना या प्रभावी माध्यमाची तुलना लेखक १८५७ मध्ये अझीमुल्लाखान आणि रंगो बापूजीने काढलेल्या पत्रांशी करतात. कर्नाटकच्या बातमीपत्रांच्या वक्तशीरपणांचा उल्लेख येथे आवर्जून येतो. असाच दुसरा उल्लेख आहे महाराष्ट्र व कर्नाटक मधील महिलांनी बजावलेल्या प्रशंसनीय कामगिरीचा. या सर्व बातमीपत्रातील घडामोडीची अनेक उदाहरणं 'लढा भूमिगतपत्राचा' या प्रकरणाच्या शेवटी लेखकानं दिली आहेत.

भूमिगत साहित्याच्या संदर्भात घडलेला एक मजेशीर किस्सा आठवतो. दैनिक वर्तमानपत्रात न येऊ शकणाऱ्या सत्याग्रहाच्या बातम्या छापण्यासाठी अहमदाबादेत 'सत्याग्रह समाचार' हे भूमिगतपत्र सुरू होतं. त्याच वेळेस 'कायद्याच्या चौकटीत' राहून 'साधना' देखील ह्याच बातम्या देत असतं. शेवटी एक पोलिसअधिकारी लेखकाला सांगतो : 'सत्याग्रह समाचारचे रजिस्ट्रेशनच करून टाका ना !'

साधनशुचितेचा आग्रह ज्या संघर्षात आहे त्यात भूमिगत साहित्याचे स्थान कितपत ? या प्रश्नाची बरीच चर्चा त्या दिवसात गुजरातमध्येंही होते. चळवळ चालविणाऱ्यां-जवळ एक स्पष्ट तर्क असतो. जेथे कायदाच बेकायदेशीर झाला आहे तेथे भूमिगत साहित्य बेकायदेशीर किंवा भित्रेपणाचं ठरूच शकत नाही. भूमिगत साहित्याच्या साहसासाठी ज्या राष्ट्रव्यापी तुकड्या तयार झाल्या त्यात संघर्षाचा रोमांचच होता हा आरोप खोडून काढताना लेखक पुनः पुन्हा सांगतात. 'ही प्रवृत्ती जर नसतीच तर निखारे केव्हाच थंड पडले असते. संघर्षाची धग तापत ठेवणारी एक निर्णायक शक्ती म्हणजे हे भूमिगत साहित्य !

## भूमिगत साहित्याचे जाळे

देशभर पसरलेलं या साहित्याचं जाळं आणि त्याच्या आंदोलनाच्या संचालनाचा आढावा घेताना लेखकाला रशियन साहित्याची भूमिगत प्रवृत्ती—'सेमीझदात—आठवते. भूमिगतपत्राविषयी इतकी मोलाची दुर्मिळ माहिती एकाच पुस्तकात आणि तीही एका व्यापक संदर्भाच्या चौकटीत तर्कसंगत मांडलेली क्वचितच आढळेल. लेखकाच्या सामाजिक व राजकीय जागृतीची तसेच वर्तमानपत्रातून लोकशिक्षण देणाऱ्या त्याच्या ध्येयवादाची ही पावतीच म्हणायला हवी. या निमित्ताने भूमिगतसाहित्याचा एक लघु-संदर्भग्रंथच तयार झाला आहे. परदेशातील अनेक वर्तमानपत्रं आणि तेथील भारतीयांनी इथल्या चळवळीला लावलेल्या हातभाराचे उल्लेखसुद्धा येथे सापडतात.

तसेच आणखी रोचक उल्लेख आहेत. काही साहित्यकारांबद्दलचे सुरेश जोशी, हरिन्द्र दवे इत्यादींच्या कवितेतील रूपकात्मक अभिव्यक्ती अनेकदा सेन्सॉरच्या बुद्धि-दारिद्र्यामुळे लोकांपर्यंत सहज पोचत असते. स्वातंत्र्यसंग्रामाच्या मदतीला शरदबाबूंनासुद्धा यावे लागते त्यांची 'पथेरदाबी' घेऊन 'विवेचकाच्या दृष्टीने कदाचित ती शरद-चंद्राची श्रेष्ठ कलाकृती नसेल. परंतु 'पराधीन' काळात साजऱ्या होणाऱ्या शरद-जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'गृहदाह'पेक्षा क्रांतिकारी सव्यसाचीच्या आठवणींना उजाळा देणे प्रसंगोचितच असते.' तुरुंगात मग लेखक 'पथेरदाबी'वर काही व्याख्यान देतात.

निवडणुकीच्या घोषणा होताच एका रात्रीत जन्माला आलेल्या जनता पक्षाच्या रचनेमागे लपलेल्या तीन वर्षाच्या कडू-गोड संघर्षाचा आढावा पुस्तकाच्या शेवटी येतो. राष्ट्रीय पातळीवरील एक संयुक्त पक्ष निर्माण होण्याच्या प्रक्रियेतील प्रत्यक्ष टप्पा येथे पहायला मिळतो.

तुरुंगातील दैनंदिनीची काही पानं आणि सर्वश्री वाजपेयी, अडवाणी, यदुनाथ थत्ते, रामारेड्डी, बाबुभाई पटेल, सुरेश जोशी, मनुभाई पंचोळी इत्यादींशी गजाआडून झालेल्या लेखकाच्या पत्रव्यवहाराचे परिशिष्ट घेऊन पुस्तक संपते.

## लहानांचा कणखर लढा

हे पुस्तक वाचत असताना, जवळजवळ समान निष्ठेतून लिहिल्या गेलेल्या, परंतु बरेचसे वादग्रस्त ठरलेल्या, मराठीतील हर्डीकरांच्या 'जनांचा प्रवाहो'ची आठवण अपरिहार्यच. तुरुंगातील अ, ब आणि क वर्गातली तीच ती माणसं, त्याच त्यांच्या त्या वेदना, उत्साह—निरुत्साहाचा तोच लपंडाव आणि तोच ध्येय—उल्हासही. प्रत्येक तुरुंगाला लाभलेल्या वक्त्याप्रमाणे आयोजित होणारी बौद्धिकं, तुरुंगी थाटात नेमाने साजरे होणारे राष्ट्रीय—सांस्कृतिक उत्सव, समभावी रसिकांच्या राजकीय—अराजकीय चर्चा, ज्ञानपिपासूंच्या हातात फिरत राहिलेली आणि संघर्षाचा अग्नी प्रज्वलित ठेवणारी अनेक सुंदर समयोचित पुस्तकं ( येथे बऱ्याच गुजराती पुस्तकांचा उल्लेख असला तरी काही इंग्रजी पुस्तकं तीच— उदाहरणार्थ R—Document ) थोडक्यात तीही सृष्टी येथे साकार होतेच. एक मोठा फरक मात्र जाणवतो 'मोठ्ठी' माणसं कुठे चुकली, 'मोठे' साहित्यिक कसे कमी पडले याचा ऊहापोह 'जनांचा प्रवाहो'मधे जास्त झाला आहे. याउलट 'लहान' माणसं, 'लहान' वर्तमानपत्रं, 'लहान' कोर्टातले न्यायाधीश, या सर्वांनी संघर्षाचा कणा कसा ताठ ठेवला याची प्रचीती 'मिसावास्यम्'च्या पानोपानी येते. मात्र हा भ्रामक आशावाद मुळीच नाही या पुस्तकाच्या शेवटी, तुरुंगाबाहेर पडताना लेखकाला त्रस्त करणारा प्रश्न, आणि 'जनांचा प्रवाहो'मधे उपस्थित झालेले प्रश्न फारसे वेगळे नाहीत. अमृता प्रीतम, बासू भट्टाचार्य आणि कमलेश्वरसारख्या कलाकारांना वीसकलमी प्रचाराच्या तावडीत अडकविण्यात यशपाल कपूरांना आलेलं यश लेखकाला विषण्णच करून सोडतं. परंतु तरीदेखील लहानमोठ्या सर्वभाषिक साहित्यिकानी दीर्घकाल तापत ठेवलेली निखाऱ्यांची धग अल्पकालीन आवेशाच्या ज्वालापेक्षा जास्त दाहक असू शकते हे पाहणारं, अनुभवणारं, परिपक्व, अनुभवी, स्वस्थ व्यक्तिमत्त्व या पुस्तकातून डोकावत राहतं. □

[ मिसावास्यम्— लेखक— विष्णू पंड्या प्रकाशक—आर. आर. शेठनी कंपनी पृष्ठे—२७१. मूल्य—रु. २२·५०. ]

सवाई गंधर्व पुण्यतिथी : २७ वा संगीत महोत्सव

# भीमसेन, मुनव्वरअली, रइस खाँ

अरविंद गजेंद्रगडकर

सहा डिसेंबर ! रात्री नऊ वाजता पुण्याच्या मुलीच्या भावे स्कूलकडे लोकांचा लोंढा चाललेला. रंगीबेरंगी कपडे, तोंडात पान, चेहेऱ्यावर अमाप उत्साह. कुणाच्या खांद्यावर लहान मूल. पण त्या मुलालासुद्धा नक्षीदार कुडता, रंगीत जाकीट, सुरवार असा संगीत पोषाख घालून सजवलेले. कुणाच्या हातातल्या पिशवीत सतरंजी, स्वेटर, चहाचा थर्मास असा कडक थंडीचा बंदोबस्त. कुणी तिकिटासाठी रांग लावलेली तर कुणी ओळखीच्या वशिल्यानं तसेच आत घुसण्याच्या प्रयत्नात. ( 'मी गजेंद्रगडकराचा मुलगा मला ओळखत नाही तुम्ही ?' असं सांगून पाच कॉलेजविद्यार्थी आत घुसले असं मला नंतर कळलं. माझी दोन मुलं बिच्चारी घरी हळहळत अभ्यास करीत बसली होती. ) एकूण काय. सगळं वातावरण कसं अगदी सालाबादप्रमाणे. परगावाहून आलेली मंडळी आपण संगीतापुढे इतर गोष्टी कशा तुच्छ मानतो हे पुणेकरांना पटवून देण्यात गुंतलेली. बेरकी पुणेकरही हो हो करीत पाव्हण्याच्या खर्चानं बनारस पानाचा शौक पुरा करण्यात गुंतलेले. हौशेनवशे, गवशे सगळ्यांची झक्कास गर्दी. शामराव लोणकरांच्या सनईचे सूर वातावरणात घुमले आणि तीन रात्रीच्या स्वरांच्या आनंदसोहळ्याला सुरुवात झाली.

गुरुवारची रात्र खऱ्या अर्थानं गाजवली ती सज्जाद हुसेन यानी. एकेकाळचा हा बालदंड संगीत दिग्दर्शक. लतासारख्या स्वरसम्राज्ञीलासुद्धा ज्याची संगीतरचना गाताना दोनदा विचार करावा लागला असा हा बुद्धिमान संगीतकार. तापट स्वभाव, फटकळ तोंड आणि सिनेमाक्षेत्रातलं विचित्र लाचार राजकारण यामुळे गुण असूनही सिनेक्षेत्रातून बहिष्कृत ठरलेला हा गुणी कलाकार ! सगळी वाद्यं सोडून या माणसानं मँडोलीनसारखं तुटकं परदेशी वाद्यं आपल्या कलाविष्कारासाठी निवडलं. या वाद्यावर भारतीय राग कसे काय वाजणार अशी शंका घेणारे सर्वचजण त्या रात्री चकित होऊन ते अद्‌भुत वादन ऐकत होते. आपलं संगीत व्यवस्थित वाजवता यावं म्हणून या कलाकारानं त्या वाद्यात काही फेरबदलपण करून घेतले होते. तरफा लावून घेतल्या होत्या. मंद्र, मध्य, आणि तार सप्तकात मुक्त संचार करता यावा म्हणून चार वाद्यं आळीपाळीनं वाजवत होता. त्याच्या वादनात त्याचा अफाट रियाज, अचाट बुद्धिमत्ता, आणि उत्तुंग प्रतिभा दिसत होती. सतार, सरोद या वाद्याचा आभास तर त्याच्या मँडोलीन वादनात सारखा दिसतच होता. पण रुद्रवीणेचा भास जेव्हा या कलाकारानं निर्माण केला तेव्हा मात्र मी मी म्हणणारे जाणकारसुद्धा चकित झाले. एक दीड सप्तकाची अतूट मींड निर्माण करण्यासाठी या मनस्वी माणसानं वेगळाच मार्ग काढला होता. खुंटी पिळून तो ही मींड काढीत होता ही किती अवघड गोष्ट आहे हे तंतूवाद्याची ओळख असणाराच जाणू शकतो. ही मींडसुद्धा इतकी सुरेल होती की, केवळ खुंटी पिळून ही मींड काढली आहे यावर कुणाचा विश्वासच बसू नये. प्रत्यक्ष समोर दिसत होतं म्हणूनच विश्वास ठेवावा लागत होता. दरबारी कानडासारखा अत्यंत अवघड आणि गंभीर राग या कलावंतानं आलाप, जोड, झाला यासह वाजवून नंतर रूपक तालातली गत पण वाजवली. ती गत ऐकताना वाटलं की, चांगला तबलजी असता तर या गतीचा मजा शतपटीनं वाढला असता. रूपक तालातल्या गतीनंतर सज्जाद हुसेन यांनी मल्हार रागातली तीन तालाची गत वाजवली. या वक्र रागात अतिजलद ताना घेऊन त्यानी पुन्हा एकदा श्रोत्यांना चकित केलं. किंबहुना असं म्हणता येईल की, त्याच्या दीड तासाच्या वादनातला प्रत्येक क्षण हा चकित करणाराच होता. दरबारी आणि मल्हार रागानंतर त्यांनी मिश्र पिलूतली धून वाजवली. या वेळी चंद्रकांत कामत याना ताल धरता येईना. शेवटी सज्जाद हुसेन याना तालाचे बोल सांगावे लागले तेव्हा कुठे चंद्रकात कामत यांनी ठेका धरला. असो पण या कलाकाराच्या या वादनाचे वर्णन 'अद्‌भूत !' याच शब्दात करावं लागेल.

त्या रात्री पद्मावती गोखले यानी नंद रागाचा ख्याल आणि ठुमरी आळवली. त्यांच्या शिष्या कु नाडगीर यांचा नीतल आणि सुरेल आवाज लोकाना विलक्षण आवडला. पं. जसराज याचंही गाणं सुरेल आणि लोकाना भावणारं असंच होत. त्यानी गोरख कल्याण, वसंत आणि लोकाग्रहास्तव खमाज बहार सादर केला. सोनल मानसिंग याच्या नृत्यानं मात्र वैताग आणला. त्यांनी ओडीसी आणि भरतनाट्यम् नृत्यं सादर केली. सुरुवातीला ही नृत्यं बरी वाटली. पण हा कार्यक्रम फार लांबला त्यामुळेच तो कंटाळवाणा वाटला. हा कार्यक्रम लांबल्यामुळे वसंतराव देशपांडे यांचा कार्यक्रम त्या दिवशी होऊ शकला नाही. पहाटे अलीहुसेन यानी सनईवर ललित वाजवून पहिल्या रात्रीची मैफल संपवली.

### न रंगलेले कुमार

दुसऱ्या रात्री म्हणजे शुक्रवारी सात तारखेला खळदकरांच्या सनईने मैफिलीची सुरुवात झाली. त्यानंतर रसिकलाल अंधारिया याचा मालकंस सुंदर झाला. संथ आलापी, ढाला, रुंद आवाज आणि मींडप्रधान सुरेल गायकी यामुळे त्यानी अमीरखाची आठवण करून दिली. पण खरा रंग भरला तो हरिप्रसाद चौरासिया यांनी. झिंझोटीसारखा ठुमरीसारखाच वापरला जाणारा राग. पण त्यानी आपल्या बासरीवर सतारीच्या अंगाने आलाप, जोड झाला वाजवून त्या रागाचं एक वेगळंच गंभीर स्वरूप श्रोत्यांपुढे उभे केले. (हरीजीचा परिचय करून देताना निवेदक श्री. दाजी करंदीकर यांनी धमालच केली. रवीशंकर याच्या पत्नी अन्नपूर्णादेवी याना त्यानी चक्क रवीशंकर यांच्या मातोश्री बनवून टाकलं. केसरीनं पण असंच छापून टाकलं. पुणेकराचा हा चोखंदळपणा.) त्याच्याबरोबर काशीनाथ मिश्रा यानी तबल्याची सुरेख साथ केली. झिंझोटीनंतरची त्याची पिलूची ठुमरी पण सुरेख झाली. अत्यंत मुलायम फूक, माईकचा अचूक अंदाज, आवाजाच्या व्हॉल्यूमचा श्रोत्यांवर होणाऱ्या परिणामाचा निश्चित अंदाज आणि स्वरांचा कर्णमधुर कल्पनाविलास यामुळे हरीजीची प्रत्येक मैफल यशस्वीच होते.

कुमार गधर्वांनी मात्र अगदी निराशा केली. त्याचा विलंबित ख्याल विशेष रंगत नाहीच. पण मध्यलयीचे मात्र ते सम्राट आहेत. पण त्याची या लयीतली चीजही रंगली नाही. त्यानतर त्यानी एक रसिया म्हणून आपलं गाणं संपवलं.

शोभा गुर्टूंनी मात्र पहिल्याच स्वरात मैफल काबीज केली. त्यानी सादर केलेल्या ठुमऱ्या आणि एक गीतवजा दादरा लोकाना

खूपच आवडला. सुरेलपणाबरोबरच गाण्यातली भावविवशता अंतःकरणाला भिडणारी होती त्याच्याबरोबर सरला भिडे यानी गाण्याची सुरेख संगत केली.

उस्ताद रईसखा हे रंगमंचावर आले तेव्हा पहाट झाली होती. त्यानी मियाकी तोडी हा प्रभातकालीन राग आळवला. कल्पक आलाप, गमकयुक्त जोड आणि घरंदाज झाला यामुळे त्याचा पूर्व रंग रंगतदार झाला. त्यानंतर गत वाजवताना काशीनाथ मिश्रा आणि ते याच्यात काही वैचारिक मतभेद झाल्याचे जाणकाराना जाणवले. असो. टाळ्या मिळाल्या ना खूप झाले.

पहाटे रंगमंचावर आले वसतराव देशपांडे. प्रकृती बरी नव्हती. रात्रभर जागरण झालेलं. त्यांचं गाणं कसं काय रंगणार याबद्दल जरा शंका होती. पण पहिला सूर लागला आणि ही शंका दूर झाली. वसंतराव 'भटियार' अगदी नेहमीच्याच दिमाखात गायले. आवाज सुरेख लागला होता. आपल्या गाण्यातला प्रत्येक क्षण कसा चैतन्यमय करावा हे वसतरावांच्याकडून शिकावं. कल्पनाविलास, बुद्धिप्रधान स्वरविन्यास आणि लयीचं खेळणं करण्याची अचाट चमक असलेल्या वसंतरावानी भटियार आणि त्यानंतरचा 'झीलफ' (शोभावरी) खूपच रंगवला. पण नाटचगीताशिवाय वसतरावाच्या गाण्याला गती नाही. त्यामुळे श्रोत्यांच्या आग्रहाला मान देऊन त्यांनी शतजन्म शोधिताना हे दीनानाथाचं पद त्याच ढंगानं आळवलं आणि दुसऱ्या रात्रीच्या मैफलीची सांगता केली.

## गंगूबाईंची अनुपस्थिती

शनिवारच्या रात्री अफाट गर्दी झाली होती. परगावाहून अनेक लोक आले होते. गंगूबाई हनगलांचं गाणं ऐकायला तर शेकडो लोक आले होते. साडेनऊ वाजता कार्यक्रमात भाग घेणाऱ्या कलावंताची यादी वाचण्यात आली. त्यात गंगूबाईंचं नाव जाहीर करण्यात आलं. असं असूनही या तीन रात्रीत गंगूबाई आसपास कुठेच दिसल्या नाहीत. त्या रात्री त्या गायल्यापण नाहीत. चौकशी केल्यावर कळलं की त्या अमरावतीच्या कार्यक्रमाला गेल्या आहेत, कार्यक्रमाच्या संचालकांना जर हे ठाऊक होतं तर त्यांनी गंगूबाई येणार नाहीत हे जाहीर करणं उचित नव्हते काय? त्याऐवजी शनिवारी रात्रीसुद्धा त्या गाणार असा भास का निर्माण करावा? ही श्रोत्यांची फसवणूकच नव्हे का? मुंबई, हैद्राबाद, धुळे अशा ठिकाणाहून केवळ गंगूबाईंसाठी त्याचे चाहते आले होते. त्याची केवढी निराशा झाली. आपल्या गुरूच्या पुण्यतिथीच्या वेळी इतर कार्यक्रम स्वीकारणे कितपत योग्य हा गंगूबाईंचा वैयक्तिक प्रश्न आहे. गुरुभक्तीपेक्षा बिदागी श्रेष्ठ असं मानणाऱ्यापैकी त्या खासच नाहीत. पण कार्यक्रमाच्या संचालकानी मात्र गंगूबाई गाणार नाही हे पक्के ठाऊक असूनही त्याचे नाव वेळोवेळी जाहीर केले ही श्रोत्याची दिशाभूलच होती असे अनेकाचे म्हणणे पडले आणि त्यात खोटे काय आहे? असो.

तर या रात्रीची सुरुवात रमेश खळदकराच्या सनईवादनाने झाली. त्यानतर सदाशिवराव जाधवानी मासबिहाग आणि 'सोच समझ नादान' ही चीज पेश केली. सत्यशील देशपाडे या युवकाचा आवर्जून उल्लेख करायला हवा. त्याचा आवाज सुरेख लागला होता. त्याने मालकंस सुरेख आळवला. या नंतरचं बहादूरखान याच सरोदवादन म्हणजे तारेवरची कसरतच होती सुरुवातीला त्यानी दरबारीचे आलाप, जोड, झाला हे प्रकार बरे वाजवले. पण त्यानंतरच्या कीरवाणी रागातल्या गतीच्या वेळी लतीफ अहमद याचा तबला सुरू झाला आणि त्यानंतर दोघेही चेकाळले. लोकानाही या कसरतीची गंमत वाटली आणि त्याच्या टाळ्या मिळू लागल्या. त्या टाळ्यामुळे दोघे पुन्हा चेकाळले आणि मग मात्रा, स्वर, राग, सौंदर्य इत्यादी सर्व गोष्टीना मोठ्या कौशल्याने टाळून केवळ टाळीसाठी वादन सुरू झाले. लोक टाळ्या वाजवीत होते आणि जाणकार हताश होऊन बसले होते. कीरवाणीनंतर लोकाग्रहास्तव बहादूरखाँ यानी एक धून वाजवली. ही धून ऐकताना एक जाणकार म्हणाले, इतका वेळ जे कमावलं ते हा गमावतो आहे.' असो, संपलं एकदाचं सरोदवादन. याच वेळी अमजादअलीच्या दर्जेदार सरोदवादनाची राहून राहून आठवण येत होती.

पं. फिरोझ दस्तूर याचा षष्टयब्दीनिमित्त सत्कार करण्यात आला. आर्यसंगीत प्रसारक मंडळातर्फे शाल, श्रीफल आणि हार घालण्यात आला. मीपण एक हार घातला. मुबईच्या तीन चार लोकांनीपण हार घातला. पण आश्चर्य याचं वाटतं की पुण्यात संगीताच्या इतक्या संस्था आणि संगीतप्रेमी व्यक्ती असताना आणि हा सत्कार होणार हे बरेच दिवसाआधी जाहीर झालेले असतानाही एकाही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून सत्कारासाठी हार आला नाही. याला अपवाद फक्त भावेबुवा. हार घालणे तर दूरच पण ज्यांनी हार आणले त्याचे हार किती पैशाचे असतील (रुपयाचे नव्हे) यावर जाहीर चर्चा काही सदस्य रसिकांनी केली. असो. दस्तूरांनी आपल्या छोटयाशा भावपूर्ण भाषणात सर्वांचे आभार मानून डॉ नानासाहेब देशपाडे या समारंभाला उपस्थित नसल्याबद्दल खेद व्यक्त केला.

यानंतर डॉ. व्ही. व्ही. पाटणकर गायले. (उगीचच). त्यांनी ख्याल जोगकंस आणि एक नाटचगीत नारायणरावाच्या ढंगाने सादर केलं (हे त्याचं आणि फक्त त्याचं मत).

बडेगुलाम अलीखां याचे सुपुत्र खासाहेब मुनव्वर अलीखा यांनी बैरागीचा ख्याल आणि यादमिया की आये ही ठुमरी चागली पेरी केली. (याचं नाव निवेदकानं मुन्वरअली करून टाकलं. नेहेमीचाच विनोद) त्यानंतर लतीफ अहंमद याचं सुमारे तासभर स्वतत्र तबला वादन झालं. संगमेश्वर गुरव यानी भटियार, एक नाटचगीत आणि एक कन्नड भक्तिगीत सादर केलं. पं फिरोझ दस्तूरानी नेहमीची पठडी सोडून 'सालग वराळी' हा अप्रचलित राग चांगला आळवला. त्यानतर एक दादरा गाऊन ते उठणार होते. पण 'गोपाला' गाईल्याशिवाय त्यांना कोण जाऊ देणार? ते गायले.

## सोनेरी कळस

भीमसेन जोशी रगमंचावर आले तेव्हा ८॥ वाजले होते. मंडप शिगोशीग भरला होता. काही मंडळी पहाटेच घरी जाऊन शुचिर्भूत होऊन परत आली होती. हजारो लोक एका गायकाच्या गाण्यासाठी ताटकळत उभे आहेत हे दृश्यच केवढ विलोभनीय होतं. आणि या मायबाप जनार्दनाची कदर कशी करावी हे त्या प्रभातीच्या भीमसेनजीच्या गाण्यावरून शिकण्यासारखं होतं. माझ्या या चाहत्यांना, या माझ्या देवाला मी तृप्त करणारच अशा जिद्दीनं भीमसेन गायले. प्रत्येक स्वर, प्रत्येक क्षण 'सच्चा' होता. कसलाही तकलादूपणा, कसलाही नकलीपणा त्या गाण्यात नव्हता. आवाजही उत्तम लागला होता. गुजरी तोडी, त्यानतर 'हरिका भेद न पायो' ही जोगियातली चीज आणि शेवटी 'तीर्थ विठ्ठल' गाऊन त्यांनी श्रोत्यांमधल्या प्रत्येक व्यक्तीला खूष करून टाकलं. भीमसेनजीचं गाणं हा या सर्व संगीत सोहळ्यातला सोनेरी कळस होता. त्यानंतर सवाई गंधर्वांची ध्वनिमुद्रिका वाजवून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

आजच्या संत्रस्त समाजाला तीन रात्री सगीताची सजीवनी देऊन पोकळ घोषणा, वरवटलेली भाषणं आणि निलाजरी आश्वासनं याचा मारा सहन करायची शक्ती दिल्याबद्दल या महोत्सवाच्या संचालकाचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. ❑

# ‘ बर्गमनदा ’

अशोक प्रभाकर डांगे

प्रिय बर्गमनदा,

कोटचवधी लोकांच्या एका अथाग जनसमूहातला एक सर्वसामान्य घटक, चित्र प्रेक्षक या नात्याने आपल्याशी शब्दसंपर्क साधताना खरोखरच संकोचल्यासारखे वाटत आहे. बहुताशी दारिद्र्य रेषेखाली हा परंपराप्रधान समाज आज इतक्या प्रकृती आणि विकृतीनी ग्रासला गेला आहे. छिन्न-विच्छिन्न झाला आहे की, स्वत कडेच तटस्थपणे पाहून आपलीच सुखदु:ख कला माध्यमातून मांडण्याची संवेदनाच तो ठरवून बसला आहे. नाही म्हणायला इथेही कोणी सत्यजित रे आहेत, मृणाल सेन, गिरीश कर्नाड, कासारवल्ली आहेत; पण अभिजात आशयाला छिनाल राडा करून रस्त्यावर आणून बसवणारा हा निर्लज्य, गल्लाभरू जमाना त्यानाही यथोचित कलान्याय मिळवून देण्यात अशयस्वीच ठरला आहे.

बर्गमनदा. माणसाच्या मनातल्या अतिगहन गुतागुतीचा सजग शोध हा तर आपला हातखडा खेळ बनून राहिला आहे; पण जेव्हा पाढऱ्या पडद्यावर आपण आपला रंगसमृद्ध खेळ मांडतो तेव्हा त्यात जगणारी, वावरणारी सारीच पात्रं केवळ कळसूत्री बाहुल्या न राहता, कल्पिताहून आगळ्या वेगळ्या वास्तवाचं सामर्थ्यपण दर्शन घडवत जातात. बर्गमनदा, स्त्री स्वभावाचं, त्याच्या प्रकृती-विकृतीचं चित्रण विश्लेषण आपणाला तर कथावस्तू म्हणून नेहमीच खुणावत असतं. टचसारख्या चित्रकृतीतून कधी आपण एकाच स्त्रीच्या स्वभाव विशेषाचे चित्रण करता, सायलेन्समध्ये दोन स्त्रियांतला परस्परविरोध पडद्यावर मांडता तर ‘ क्राईज अॅण्ड व्हिस्पर्स ’सारख्या चित्रातून एकूण तिघा ( नव्हे चौघा ) स्त्रियाच्या विकृतीचा मागोवा घेता. इथेही आपका कॅमेरा कधी देखणं वास्तव चित्रित करतो. कधी उघडंनागडं अतिवास्तव उजेडात आणतो तर कधी मृत्यू मागचं अवास्तव बोलकं करून सोडतो. आपण ‘ क्राईज अॅण्ड व्हिस्पर्स ’मध्ये दाखवता ते एका स्कॅन्डेन्व्हीअन देशातल समृद्ध समाजजीवन. त्या समृद्धीतून चालत येणाऱ्या विकृती, बर्गमनदा, आमच्या ह्या सुसंस्कृत समाजात जगणारी आम्ही माणसही काही कमी विकृत असतं नाही. पण परंपरेच्या पोथ्यात दडवून ठेवलेल्या आमच्या सभ्य विकृती आम्हाला कलेच्या अशा माध्यमातून कधी निधडेपणानं माडाव्याशाच वाटत नाहीत, नीटपणे मांडताच येत नाहीत हेच खरं.

बर्गमनदा, तुम्ही मांडलेल्या त्या तीन स्त्रियाची जातकुळीही नेहमीप्रमाणेच किती निराळी आहे. आणि विशेष म्हणजे त्या तिघी आणि एकाच रक्ताच्या नात्यातही जखडल्या गेल्या आहेत. बर्गमनदा, तुम्हाला प्रश्न पडत असतीलच आणि ते प्रश्नही तुमचे कथा विषय म्हणून पडद्यावर येतही असतात पण कुठलाही चित्रपट पाहिल्यावर आपल्याला भेडसावतात, अस्वस्थ करून सोडतात ते हे प्रश्न तुमच्या प्रश्नाच्या चक्व्यात आम्ही नेहमीच फसतो आणि त्याच प्रश्नाभोवती घिरट्या घालू लागतो. बर्गमनदा, ‘ क्राईज अॅण्ड व्हिस्पर्स ’ पाहिल्यावर असेच किती तरी प्रश्न आम्हाला भेडसावून सोडतात. आजारपणात आपणाला भेटायला आलेल्या दोघी धाकट्या बहिणीबरोबर लॅरीन आणि मारीआबरोबर, मनसोक्त फिरावं, बालपणातल्या आठवणींनी हुरहुराव, पण बागेतल्या झुल्यावर बसल्यावर मात्र ‘ हे काही खरं नाही. स्पर्शाशिवाय आयुष्याला अर्थ नाही. असं निदान करून कुंवार अॅग्नीसनं का म्हणून पिसाटून जावं. वासनेनं पछाडून जावं. आरडावं, ओरडावं, बेभान व्हावं. आणि आपल्याच नोकराणीच म्हणजे अॅनचं शरीर हक्काचं म्हणून वापरावं, उपभोगाव आणि त्या समसंभोगातूनच तिचं मर्त्य शरीर फुलून यावं ? बर्गमनदा, डॉक्टराच्या म्हणण्याप्रमाणे ‘ थोडेच दिवस राहिलेल्या ’ रात्री बेरात्री वेदनानी पिळवटून निघणाऱ्या अॅग्नीसच्या ह्या जगावेगळ्या विकृतीला तरी आम्ही कोणतं नाव द्यावं ? इतकंच नव्हे तर आपल्या मरू घातलेल्या मालकिणीच्या इच्छेपुढे मान तुकवून, अॅननं, आपलं बोजड पण तरणंताठ शरीर तिला समजून उमजून का वापरू द्यावं ? अॅग्नीसचं भयाण कुंवारपण, शरीरातलं पुरुषीपणा ह्यावरून कदाचित अॅग्नीसचं वागणं जाणून घेता आलं तरी, त्या पोरसवदा अॅनच्या कृतीचा तरी कोणता अर्थ लावायचा जो तिला उचित न्याय देऊ शकेल ? बर्गमनदा, अॅनच्याच शरीराआड दडलेल्या विकृतीच तर तुम्ही आम्हाला दाखवून देत नाही ना ?

अॅग्नीसचे राहू द्यात, आता मधल्या बहिणीची म्हणजे कॅरीनचीच गोष्ट घ्या ना ! तिच्या नजरेतून डोकावणारा थंडपणा, तिच्या हाताचा पुरुषीपणा हे तरी दुसरं काय सांगतात ? श्रीमंत पण वयस्क नवऱ्याच्या संबंधातला कॅरीनचा थंडपणा, त्यात जेवणातली सुरी फेकून फोडलेला ग्लास, ‘ आपण आता झोपायला जाणार आहोत ’ हे उच्चारलेले कोरडे, कडवे शब्द, त्यामागोमाग It is just a line of tissue ’ हे स्वत:च्याच इद्रियाबद्दल कॅरीनने काढलेले कडवट उद्गार, आणि नंतर ग्लासाची फुटकी काच योनीमध्ये वळेच सरकवून कॅरीनने त्याला घडवलेले एक रक्ताळ दर्शन, आपणाला विकृतीपेक्षा आणखी कोणत्या निष्कर्षाला आणून सोडतं ?

कॅरीन एक वेळ थड असेल, पुरुष जातीबद्दल तिला एकूण चीडही असेल, शरीरसंबंधाबद्दल तिला घृणाही वाटत असेल, आणि त्या उद्वेगाचा विस्फोट म्हणून तिनं काहीशा कामातुर पुरुषापुढे स्वत.ला रक्तबबाळ करूनही घेतलं असेल पण बर्गमनदा, प्रेमासाठी, संबंधासाठी आसुसलेल्या मारीआचं काय ? तिचं वागणंही आम्ही आणखी एका टोकाची विकृतीच म्हणून सोडायचं ? मरीआ कामांध झालीय. स्पर्शासाठी पछाडतेय आणि अॅग्नीसला तपासायला आलेल्या डॉक्टरलाच कवटाळतेय. आपला नवरा धंद्याच्या कामासाठी बाहेरगावी गेल्याचंही आवर्जून सागते, इतकंच नव्हे तर दुसऱ्या दिवशी त्याला रात्र झालीय, उशीर झालाय असं सांगून जेवायला राहून घेते आणि नंतरच्या एकांतात आपल्या कोण्या एकेकाळच्या प्रेमाची आठवण करून देते आणि अखेर त्याच्याशी उपभोगात दंग होते, ह्या साऱ्याच प्रसंग मालिकेतून आमच्या मनातून अशी कोणती प्रतिक्रिया उमटत जातेय, बर्गमनदा ? एका कामातुर स्त्रीचीच ना ? बर्गमनदा, मारीआचं वागण हे कदाचित एका तरुण शरीराचं स्वाभाविक मागणं ठरत असेल, तरीदेखील बाहेर गावाहून परत आल्यावर मारीआ डॉक्टरशी असलेल्या संबंधानी चिडून संतापून स्वत.च्याच पोटात चाकू खुपसून घेऊन नंतर आपले रक्तबबाळ हात मारीआलाच दाखवणारा तिचा नवरा, आणि तो प्रसंग आधी एका थड नजरेनं पाहणारी आणि मग त्यातलं गांभीर्य जाणून घेऊन किंचाळणारी भावनाप्रधान मारीआ ह्या साऱ्या प्रकारातून एका विलक्षण वेगळ्या प्रसगातून आपण मनुष्य स्वभावात पडून राहिलेल्या द्वेष, असूया, क्रौर्याचं तर दर्शन घडवत नाही ?

बर्गमनदा तुमच्या ह्या तिन्ही स्त्रिया असमाधानानं पछाडल्यात. आणि स्वत:चा तोलच गमावून बसल्याहेत. थोरली अॅग्नीस कुंवारपणात ठरवलेल्या शरीरसुखाचा समसभोगातून शोध घेतेय, मधली कॅरीन, उपभोगालाच विटून, कंटाळून आयुष्यात थंडगार होऊन गेलीय, तर धाकटी सरीआ अतृप्ततेनं झपाटलीय त्याच सुखाच्या प्राप्तीसाठी आयुष्यभर तळमळते. बर्गमनदा—अॅग्नीस आणि कॅरीन वृत्तीतच पुरुषी असल्या तरी

मरीआ मात्र आपलं स्त्रीत्व जपत, जोपासते. बर्गमनदा, पार्श्वसंगीतासारखे प्रभावीपणात आपण वापरलेले घड्याळाचे टोल ह्या साऱ्याच वातावरणाला वरचेवर भेदून जातायत आणि अॅग्नीसच्या पावलापावलांनी जवळ येणाऱ्या मृत्यूची ते आवर्जून आठवण करून देतात.

बर्गमनदा "विलक्षण, विचित्र, भयाण आयुष्याच्या मागोमाग आपल्या चित्रपटात चालून येतोय तो अॅग्नीसचा मृत्यु आणि त्या मागोमागच अवास्तव अॅग्नीसचा मृत्यु तर अटळच असतो. मरीआ आरडते, ओरडते तर कॅरीन जन्मजात थंडपणान ते दुःख बाजूला करते. धर्मगुरू येतात, अॅग्नीसनं भोगलेल्या दुःख वेदनाची उजळणी होते. तिच्या आत्म्याला शाती मिळावी म्हणून प्रार्थना केली जाते. आणि मग अॅग्नीसच्या मृत देहाच्या वाटयाला येत ते वाट पहात पडून रहाणं. मातीआड गाडल जाईस्तो वाट पहाणं.

बर्गमनदा आपल्यामधला दिग्दर्शक इथे वेगळी वाट चोखाळतो. तो अॅग्नीसच्या तोंडून तिच्याच वासना वदवून घेतो. एका प्रेताच्या वासना! कल्पनाच भयाण, शहारे आणणारी असते. त्यात भयाणता असली, तणाव असला, अवास्तवता असली तरी विरूपता असत नाही.

एका रात्री अॅग्नीसचा आत्मा कण्हू लागतो. अॅन जागी होते, दोघीना उठवते. त्या जाऊन पाहातात तर अॅग्नीसच ओरडत असते. तिला आता कॅरीनच्या देहाची उब हवी असते. पण कॅरीन थंड, क्रूर, ती तिथेही फटकारते 'मला जिवंतपणीही तुझ्याबद्दल कधी काडीमात्र प्रेम वाटत नाही. आता मेल्यावर तर नाहीच नाही.' असं म्हणून ती चालती होते. मग अॅग्नीसचा आत्मा मारीआकडे मोर्चा वळवतो. मारीआ हळवी, भावनाप्रधान. ती बिचारी 'तू माझ्या हातांना स्पर्श कर' ही अॅग्नीसच्या आत्म्याची आज्ञा मानत पुढे होते आणि ती एका प्रेताच्या थंडगार कवेत कवटाळली जाते. मग भयंकर घाबरते. धडपडते. कशीबशी सुटका करून घेते, आणि किंचाळतच खोलीबाहेर पळ काढते. आता मागे उरते ती अॅन. 'तुम्ही काही काळजी करू नका. मी अॅग्नीसकडे पाहीन' येवढंच दोघीना सागून ती आपल्या मृत मालकिणीची भोगेच्छा पुन्हा एकदा पूर्ण करते.

हा साराच प्रसंग भयाण आहे. पण आमच्या मनावरचा ताण तो कुठेही सैल होऊ देत नाही. बर्गमन हा तरी देखील एक प्रश्न मात्र आमच्या मनांत उरतोच. मृत अॅग्नीसला बोलायला लावून, तिच्या वासना व्यक्त करून, त्याची परिपूर्ती दाखवण्यात आपल्यातल्या दिग्दर्शकाला अभिप्रेत तरी काय असतं? की विकृती शरीराबरोबर मरत नाहीत, तर त्या अतृप्त आत्म्याच्या रूपात फिरत रहातात असंच तर आपणाला म्हणायचं नाही?

अॅग्नीसचे अन्त्य सस्कार आटोपतात, कॅरीन आणि मारीआच्या परत जाण्याची वेळ येऊन ठेपते. बर्गमनदा, इथे पडद्यावर आपल्यातला दिग्दर्शक अधिक बोलका होतो. अॅग्नीस गेली तरी कॅरीन मरीआशी थंडपणातच वागत रहाते. संबंधातला हा थंडपणा कॅरीन कदाचित आयुष्यभरच वागवत आली असावी. हळव्या मरीआला आता तरी तो अबोला असह्य होतो. ती कॅरीनला विनवते. 'आता तरी एकमेकांशी नीट वागू या, रात्र रात्र बोलून जागवून काढू यात, एकमेकीना मिठीत घेऊ यात, आपली आजवरची सुखदुःख समजून घेण्यात मरीआची हीही प्रेमळ विनंती क्रूर कॅरीन नाकारते. पुन्हा पाघळते. मरीआला जवळ घेते आणि पुन्हा झटका आल्यासारखी दूर लोटते. बर्गमन इथे जाणवते ती कॅरीनच्या स्वभावातली लहरी कठोरता, कोरडेपण, भावना शून्यता येवढंच.

घराची आवराआवर होते. इस्टेट विकून पैसा वाटून घ्यायचा प्रस्ताव कॅरीनपुढे करते. पण अॅनचा प्रश्न अधिक महत्त्वाचा असतो. बर्गमनदा, तो प्रश्न आपण प्रत्येकाच्या स्वभावानुसार सोडवून टाकता; थंड कॅरीन आणि तिचा धूर्त नवरा 'अॅन तरुण आहे. ती कुठे तरी नवीन काम शोधते एवढेच सागून तिचं भवितव्य धुडकावून लावतो. तर मरीआच्या दृष्टीनं तिची किंमत कस्पटासमान असत नाही. इथेही बर्गमनदा, आपण मरीआचं माणूस पण अचूक दाखवून देता. निघताना थोडीफार रक्कम मारीआ अॅनला बक्षीस म्हणून देते. आणि मग रिकाम्या रात्री, त्या रिकाम्या घरात अॅन एकटीच अॅग्नीसची डायरी वाचताना दिसते, पुनः पुन्हा चाळत रहाते.

बर्गमनदा, आपला चित्रपट इथेच संपतो. परिस्थितीत निर्माण केलेला ताण परिस्थितीबरोबरच संपून जातो. बर्गमनदा एक, दोन, तीन नव्हे तर चार स्त्रियाच्या विकृतीचा आपण एक मर्मभेदी शोध घेत रहाता. आपल्यातला दिग्दर्शक परिस्थितीच्या आगे मागे नेहमीच डोकावत असतो. बर्गमनदा, आपल्या ह्या चित्रपटात प्रवृत्ती, दुःख, वेदना, कोलाहल करताना दिसतात तर ह्या साऱ्या आक्रोशाआड दडलेल्या विकृती मनात एकसारख्या कुजबुजत रहातात. बर्गमनदा, आपला चित्रपट सपतो. आमच्या साऱ्यांच्या मनात तो प्रश्नाचं एक झंझावातच उठवून देतो. आणि मग मागे राहते ती एक अनाकलनीय अस्वस्थता. ही अस्वस्थता आपल्या ह्या घोर कलाकृतीचीच परिणती असते. बर्गमनदा, ह्या दारिद्र्यग्रस्त भूमीत कोटयवधी रुपयाचा चक्काचूर करून उठसूट शेकडो कळकट कलाकृती निर्माण करणारे आम्ही करटे नाही का? स्वतःला आणि दुसऱ्यानाही ह्या प्रवाही आणि प्रभावीही कला माध्यमातून नीट 'समजून उमजून न घेणारे आम्ही कर्मदरिद्री नाही का? बर्गमनदा, अंतरीच्या अस्मानात गूढगर्भ प्रश्नाची आवर्त निर्माण करणारे, आशयाच्या शोधासाठी आवर्जून अंतर्मुख व्हायला लावणारे, काळाच्या झरोक्यातून मागे मागे पहायला लावणारे, आणि शाश्वताच्या शोधासाठीच 'कलाजीवनात समृद्धपणे संचार करणारे एक नव्हे तर, अनेक बर्गमन कोटयवधीच्या आमच्या समाजसमूहाला आज हवे आहेत हेच खरं.

□

चित्रपट : क्राईज अॅण्ड व्हिसपर्स
दिग्दर्शक : इंगमार बर्गमन
देश : स्वीडन